CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, १२ डिसेंबर २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक ३६ । पाने १२ । किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### तीन दिवसांनंतर अंशत: परतली तेजी

**मुंबई :** सलग तीन दिवसांच्या घसरणीनंतर बुधवारी बाजार तेजीसह बंद झाला. मात्र, ही तेजी फारशी चमकदार कामगिरी दाखवणारी नव्हती.



निफ्टी ३१ अंकांनी तर निर्देशांक अवघ्या १६ अंकांनी वाढून बंद झाला. निफ्टी शेअर्समध्ये ट्रेंट, बजाज फायनान्स, ब्रिटानिया, श्रीराम फायनान्स आणि हिरो मोटोकॉर्पमध्ये सर्वाधिक वाढ झाली. जेएसडब्ल्यू स्टील, अदानी पोर्ट्स, एनटीपीसी, ॲक्सिस बँक आणि एसबीआयमध्ये घसरण नोंदविण्यात आली. दिवसभरातील व्यवहारात आयटी, ऑटो, ग्राहकी वस्तू, टेलिकॉम शेअर्सची सर्वाधिक खरेदी झाली.

### छत्तीसगडमध्ये नक्षल्याचा खात्मा, स्फोटात दोन जवान जखमी

**बिजापूर :** छत्तीसगडमधील बिजापूरमध्ये बुधवारी झालेल्या चकमकीत सुरक्षा दलाने नक्षल्याचा खात्मा केला. नक्षलवाद्यांनी पेरलेल्या आयईडी स्फोटकांचा स्फोट होऊन दोन जवान जखमी झाले. घटनास्थळावरून पोलिसांनी पिस्तूल, जिवंत आयईडी आणि नक्षली साहित्य जप्त केले आहे. बिजापूर जिल्ह्यातील गांगलूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मुंगा जंगलात ४० नक्षलवादी लपले असल्याची माहिती सुरक्षा दलांना मिळाली. बुधवारी सकाळी या परिसरात शोधमोहीम राबविण्यात आली. मुंग्याच्या जंगलात नक्षलवाद्यांनी जवानांवर अंदाधुंद गोळीबार सुरू केला. जवानांनी दिलेल्या प्रत्युत्तरात एक नक्षली ठार झाला. घटनास्थळावरून पिस्तूल, जिवंत आयईडी आणि नक्षली साहित्य जप्त करण्यात आले आहे.

# देश तोडण्याचा गंभीर कट

## ● धनकड यांचा काँग्रेसवर मोठा आरोप ● नड्डा, रिजिजू यांनीही चढविला हल्ला

◆ **नवी दिल्ली, ११ डिसेंबर**

विरोधी पक्षांनी उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनकड यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव दाखल केल्यानंतर बुधवारी दुसऱ्याच दिवशी संसदेच्या दोन्ही सभागृहांध्ये अभूतपूर्व गोंधळाची स्थिती निर्माण झाली. जगदीप धनकड हे केंद्र सरकारचे प्रवक्ते असल्याप्रमाणे काम करीत असल्याचा आरोप राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनी केल्यानंतर, स्वत: धनकड यांनी देश तोडण्याचा आणि देशाला अस्थिर करण्याचा गंभीर कट विरोधकांनी रचला असल्याचा आरोप केला.

त्याचवेळी काँग्रेसने अमेरिकन उद्योगपती जॉर्ज सोरोस यांच्यासोबत त्यांच्या केंद्रीय नेत्यांचे काय संबंध आहेत, याचा खुलासा करावा, असा हल्लाबोल केंद्रीय



मंत्री जे. पी. नड्डा यांनी केला, तर देशाला अस्थिर करण्याचा कट विदेशात आखणाऱ्या या लोकांची संसदेत बसण्याची पात्रता नाही, अशा शब्दांत केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी विरोधकांवर विशेषत: काँग्रेसवर खरपूस टीका केली.

राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनकड हे सरकारचे प्रवक्ते असल्याप्रमाणे वागत आहेत आणि ते विरोधकांनी बोलण्याची संधी देत नाही, असा आरोप खडगे यांनी केल्यानंतर सत्तापक्षाचे नेते आणि विशेषत: स्वत: धनकड आक्रमक झाले. घटनात्मक संस्था कमजोर करून देशाला अस्थिर करण्याचा कुटील कट काँग्रेसने रचला आणि आणि यात त्यांना जॉर्ज सोरोस आणि विदेशातील भारतविरोधी शक्तींची मदत मिळत आहे, असा थेट आरोप धनकड यांनी केला.

देशाची प्रगती आणि जगात भारताची वाढलेली ताकद व लोकप्रियता विरोधकांना सहन होत नाही, भारत हा शक्तिशाली देश बनावा, अशी या विरोधकांची मुळीच इच्छा नाही आणि म्हणूनच या लोकांनी देशाला अस्थिर करण्याचा कट रचला आहे, असे धनकड यांनी सांगितले. यामुळे काँग्रेस अधिकच चवताळली. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनीही, विदेशी शक्तींच्या हातात देश विकायला निघालेल्या या पक्षाचे नेते संसदेत बसण्यास पात्र नाही, असा हल्ला चढविला. (वृत्तसंस्था)

### दोन्ही सभागृहांमध्ये सोरोस मुद्याची तीव्रता अधिक

संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये आज अदानी मुद्यापेक्षा सोरोस मुद्याची तीव्रता अधिक दिसून आली. अदानी आणि मोदी यांच्यातील संबंधांवरून देशाचे लक्ष विचलित करण्यासाठी भाजपा सोरोस मुद्दा उपस्थित करीत आहे, असा आरोप खडगे यांनी केल्यानंतर, भाजपाने जोरदार पलटवार केला. सोरोस यांच्या कंपनीत सोनिया गांधी सहअध्यक्ष कशा, याचे उत्तर आधी काँग्रेसने देशाला द्यावे, अशी मागणी जे. पी. नड्डा यांनी केली.

# मविआचे आमदार-खासदार आमच्या संपर्कात : बावनकुळे

◆ **मुंबई, ११ डिसेंबर**

महाविकास आघाडीतील काही आमदार-खासदार अस्वस्थ असून, अनेक जण भाजपाच्या संपर्कात आहेत. ते आपली अस्वस्थता आमच्याकडे व्यक्त करीत आहेत, असा दावा भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला.

मुंबईत माध्यम प्रतिनिधींशी बावनकुळे बोलत होते. आमच्या पक्षांचे आमच्याकडे दुर्लक्ष होत असून, पक्षांकडून पाठबळ मिळत नाही, मतदारसंघांतल्या परिस्थितीविषयी बैठकांचे आयोजन केले जात नाही, अशाही तक्रारी संपर्कात असलेल्यांच्या आहेत.

बावनकुळे म्हणाले, तपास यंत्रणा त्यांचे काम करीत असतात. आमचा आणि त्यांचा काही संबंध नाही. ईडी, सीबीआयचा वापर केला जातो, हे महाविकास आघाडीच्या लोकांचे नेहमीचे रडगाणे आहे. मात्र, मोदीजींनी केलेल्या विकसित भारताच्या संकल्पाला साथ देण्यासाठी, देवेंद्रजींच्या नेतृत्वात आमच्या पक्षात कोणी आले तर, त्यांचे स्वागत आहे. (तभा वृत्तसेवा)

### ईव्हीएमबाबत फेक नॅरेटिव्ह!

आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मते मिळवण्यासाठी मविआकडून ईव्हीएमबाबत फेक नॅरेटिव्ह चालवला जात असून, ईव्हीएमला दोष देण्यापेक्षा आपण निवडणुकीत कुठे कमी पडलो, याचा शोध मविआच्या नेत्यांनी घ्यायला हवा, असे बावनकुळे म्हणाले.

## मल्होत्रांनी स्वीकारली आरबीआयच्या गव्हर्नरपदाची सूत्रे

◆ **मुंबई, ११ डिसेंबर**

संजय मल्होत्रा यांनी बुधवारी रिझर्व्ह बँकेचे २६ वे गव्हर्नर म्हणून पदभार स्वीकारला. ते भारताच्या मध्यवर्ती बँकेचे प्रमुख म्हणून तीन वर्षांचा कार्यकाळ सांभाळतील.



मल्होत्रा यांनी मावळते गव्हर्नर शक्तिकांत दास यांच्यानंतर बुधवारी आरबीआय प्रमुख म्हणून पदभार स्वीकारला.

संजय मल्होत्रा हे १९९० च्या तुकडीचे आयएएस अधिकारी आहेत आणि राजस्थानच्या आयएएस अधिकाऱ्यांमध्ये ते चौथ्या क्रमांकावर आहेत. राजस्थानमधून ते जानेवारी २०२० मध्ये प्रतिनियुक्तीवर केंद्रात आले. येथे त्यांची प्रथम ऊर्जा मंत्रालयात अतिरिक्त सचिव म्हणून नियुक्ती झाली. यानंतर ते थेट अर्थमंत्रालयात दाखल झाले. (वृत्तसंस्था)

# साताऱ्यात न्यायाधीशाला लाच घेताना अटक

**सातारा, ११ डिसेंबर**

न्यायपालिकेच्या विश्वासाला हादरा देणारी घटना सातारा जिल्ह्यातून समोर आली आहे. न्यायालय परिसरात न्यायाधीशाला लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे.



साताऱ्यातील एका हॉटेलमध्ये सापळा रचून ही कारवाई करण्यात आली. त्यामुळे या घटनेची आता राज्यभरात चर्चा सुरू झाली आहे. फिर्यादीच्या वडिलांच्या जामिनासाठी लाच मागण्यात आली होती. वास्तविक , आपल्यावर होणाऱ्या अन्याय आणि अत्याचाराच्या विरोधात न्याय मागण्यासाठी सर्वसामान्य नागरिक न्यायालयाचा दरवाजा ठोठावत असतो. अशावेळी पुणे आणि सातारा अँटी करप्शन विभागाने संयुक्तपणे कारवाई केली. जिल्हा व सत्र न्यायाधीश धनंजय निकम यांच्यासह तिघांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे. त्यानंतर यांच्यावर गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे. यामध्ये न्यायाधीश महोदयांसाठी पाच लाख रुपयांची लाच घेताना तिघांना रंगेहात पकडल्याने न्यायपालिका क्षेत्रात खळबळ उडाली आहे. या घटनेतील फिर्यादीच्या वडिलांना जामीन देण्यासाठी लाचेची मागणी करण्यात आली होती. विशेष म्हणजे, जिल्हा सत्र न्यायालयाच्या आवारातच या घडामोडी घडत होत्या. येथील एका हॉटेलमध्ये सापळा रचून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सर्वांना रंगेहात पकडले.

## परभणीत हिंसक निदर्शने, जमावबंदी

◆ **परभणी, ११ डिसेंबर**

परभणी शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातील संविधान प्रतिकृतीची तोडफोड करीत झालेल्या अवमाननेनंतर निषेधासाठी जमलेला जमाव हिंसक झाल्याने आंदोलनाला बुधवारी भलतेच वळण मिळाले.

जिल्ह्यात जमावबंदी लागू असतानाही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची भीती असल्याने जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू केले आहे. शहर व जिल्ह्यात असलेले तणावाचे वातावरण पाहता हे कलम लावण्याची विनंती पोलिस अधीक्षकांनी केली होती. (वृत्तसंस्था)

# राज्यात वाशीमच्या आरोग्य विभागाचा डंका

### सलग तिसऱ्यांदा 'सीएस' प्रथम!

### डॉ. अनिल कावरखे यांची सर्वोत्कृष्ट कामगिरी

◆ **वाशीम, ११ डिसेंबर**

आरोग्य विभागातील निर्देशांकावर आधारित रँकिंगमध्ये सलग तिसऱ्यांदा वाशीम येथील जिल्हा शल्यचिकित्सक अनिल कावरखे राज्यात प्रथम क्रमांकावर आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी पांडुरंग ठोंबरे हे क्रमांक दोनवर आहेत. त्यामुळे राज्यात पुन्हा एकदा वाशीमची मान अभिमानाने उंचावली आहे. ऑक्टोबर



महिन्यातील रँकिंगचा अहवाल १० डिसेंबरला जाहीर झाला.

राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांतर्गत मातृ स्वास्थ्य, मुलांचे आरोग्य, कुटुंबनियोजनासह एकूण ३० निर्देशांकाच्या अनुषंगाने आरोग्य विभागाच्या पथकामार्फत ऑक्टोबरमध्ये सरकारी रुग्णालयांमध्ये पाहणी व पडताळणी केली होती. जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, सरकारी रुग्णालयात माता व बालकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा, लसीकरण, कुटुंब नियोजन कार्यक्रम, साथरोग प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच हृदयरोग, उच्च रक्तदाब, मधुमेहींना पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सेवा सर्वोत्कृष्ट असल्याचा शेरा चमूने दिला.

महिलांची प्रसूती, अद्ययावत डायलिसीस सेवा, कुपोषित बालकांसाठी पोषण पुर्नवसन केंद्र, क्रिटिकल रुग्णांसाठी आयसीयू मोतीबिंदू शस्त्रक्रिया, रक्तपेढी, सोनोग्राफी व सी. टी. स्कॅनसह अन्य आरोग्यसेवांमध्ये केलेली कामगिरी कौतुकास्पद व सर्वोत्कृष्ट असल्यावर पथकाने शिक्कामोर्तब केले आहे. (तभा वृत्तसेवा)



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# नाल्यात अर्भक टाकून देणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-** शहरातील रुपाभवानी मंदीराजवळील नाल्यात पुरूष जातीचे अर्भक टाकून देऊन त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरणाऱ्याविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल




करण्यात आला आहे. याबाबत पोलिस हवालदार विठ्ठल पैकेकरी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १० डिसेंबर रोजी दुपारी तीनच्या सुमारास जुना तुळजापूर नाका येथील रुपाभवानी मंदीराच्या बाजूस असलेल्या महाराष्ट्र विद्युत पारेषण कंपनीच्या ऑफीसच्या शेजारी असलेल्या घाण पाण्याच्या नाल्यातील कचऱ्यामध्ये कुणीतरी पुरुष जातीचे अर्भक टाकून दिले असल्याचे उघडकीस आले होते.

अज्ञात इसमाने एक पुरुष जातीच्या अर्भकास जिवंत जन्मास प्रतिबंध करण्याच्या किंवा त्याच्या जन्मानंतर त्या अर्भकाचा मृत्यू घडवून आणण्याच्या उद्देशाने तसेच अपत्य जन्माची लपवणुक करण्यासाठी त्या अर्भकाच्या प्रेताची गुप्तपणे विल्हेवाट लावण्यासाठी त्यास निर्जन ठिकाणी टाकून दिले. त्या अर्भकाच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक येडे पुढील तपास करीत आहेत.

# बाजारसमितीसह सर्व निवडणुका जिंकण्यासाठी कामाला लागा

## ● आ. सुभाष देशमुख यांचे कार्यकर्त्यांना आवाहन; विजयाबद्दल पदाधिकाऱ्यांसह जनतेचे मानले आभार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-** कार्यकर्त्यांनी अहारोत्र काम केल्याने आपला विजय झाला आहे. आता कार्यकर्त्यांची वेळ आली आहे. बाजार समिती, महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती या कार्यकर्त्यांसाठी असणार्या निवडणुका आहेत. आतापासूनच सर्वांनी कामाला लागावे. सर्वांना मी मदत करतो, या सर्व निवडणूक मायक्रो प्लॅनिंगने लढून निश्चित जिंकू असा आत्म विश्वास आ. सुभाष देशमुख यांनी व्यक्त केला.बुधवारी कार्यकर्त्यांच्या संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी आ. सुभाष देशमुख बोलत होते. यावेळी जिल्हा सरचिटणीस मनिष देशमुख, विधानसभा प्रमुख हनुमंत कुलकर्णी, नियोजन समिती सदस्य डॉ. चनगोंडा हवीनाळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. आ. देशमुख पुढे




म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत स्वपाक्षीय विरोधकांनी विरोधी कारवाया केल्या, मला उमेदवारी देऊ नका असे वरिष्ठांना आव्हान केले होते. मात्र मी सुडाचे राजकारण करणार नाही. ज्यांनी ज्यांनी विरोधी कारवाया केल्या त्यांचे देखील आभारी आहे. नकारात्मक कधीच मी बोलत नाही, सकारात्मक चर्चा करत असतो. प्रत्येक निवडणूक वेगळी असते. यामुळे विजय डोक्यात जाऊ देऊ नका, विजयासाठी कारणे अनेक असतात. अदृश्य हाताने, विरोधी पक्षाच्या लोकांनीपण मदत केली आहे. त्यामुळेच इतके मताधिक्य मिळाले. येणारा काळात सावध राहून काम करायाचे आहे. आता कार्यकर्त्यांसाठी मी लढणार आहे. यावेळी मंडळ प्रभारी हेमंत पिंगळे, दिलीप पतंगे सिद्धेश्वर कोकरे, जयवंत थोरात मंडल अध्यक्ष, राम जाधव, संगप्पा केरके, अर्जुन जाधव, आनंद बिराजदार, महिला मंडल अध्यक्षा वृषाली पवार, अंबिका पाटील, निलिमा शितोळे, निलिमा हिरेमठ यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

### जनतेची उतराई विकासकामातून करणार

जनतेने विक्रमी मताधिक्य दिलेले आहे. देव, देश, धर्मासाठी जे काही करता येईल ते प्रभावीपणे काम करायचे आहे. देश, राज्य, जिल्हा, तालुका व माझे गाव समृद्ध करायचे आहे. मिळालेल्या यशाबद्दल सर्वांचे मनापासून आभार मानतो. आपण दिलेल्या मतांची उतराई म्हणून मी पुढील पाच वर्ष विकासाचे राजकारण करून हा मतदारसंघ राज्यात आदर्शवत करणार असल्याचे आ. देशमुख म्हणाले.

### जिथे लागेल तिथे मदत करायला तयार

मतदारसंघातील सीना भिमा जोड कालवा, वडापूर बॅरेजस, पर्यटन विकास, देगांव कॅनॉल, शिरवळ तलावात पाणी आणणे, मंद्रूप एमआयडीसी हे महत्वाचे विषय तात्काळ मार्गी लावणार आहे. सिंचनातून तालुक्याचा विकास, जलयुक्त शिवारच्या माध्यमातून पडलेल्या पाण्याचा थेंब अडवण्यासाठीच काम करू, रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न करायचे आहेत, असेही आ. देशमुख म्हणाले. शिक्षणातून तालुक्याचा विकास, शासकीय योजनेचा लाभ घ्यावा जिथे लागेल तिथे मदत करायला तयार आहे, असेही ते म्हणाले.



# विश्वासार्ह माहिती पोहचविण्याची जबाबदारी ग्रंथपालांची

## ग्रंथपाल प्रदीप बागल; भारतीय व्यवहार कोश ग्रंथ प्रदान कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. ११ डिसेंबर-** इंटरनेटच्या युगात माहितीचा स्त्रोत म्हणून गुगल सारख्या सर्च इंजिनचा वापर केला जातो. मात्र, विश्वासार्ह आणि सत्य माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याची जबाबदारी ग्रंथपालांची आहे, असे मत पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक ग्रंथपाल संघाचे अध्यक्ष प्रदीप बागल यांनी केले.

भारतीय विचार साधना या संस्थेच्या वतीने आयोजित भारतीय व्यवहार कोश ग्रंथ प्रदान कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे अध्यक्ष माधव राजगुरू, भाविसा फाउंडेशनचे संचालक बिपिन पाटसकर, भाविसाचे कार्यवाह काशिनाथ देवधर उपस्थित होते. कार्यक्रमात प्रदीप बागल यांनी शालेय जीवनात पुस्तकांचे महत्व सांगितले. ते म्हणाले, मुलांना हळूहळू वाचनाची लागलेली सवय त्यांना समृद्ध बनवते. त्यामुळे मुलांना आणि वाचकांना अधिक माहिती देण्याच्या दृष्टीने भाविसाने उचललेले हे पाऊल स्वागतार्ह आहे. कार्यक्रमाच्या सुरूवात प्रसाद भडसावळे यांनी भारतीय व्यवहार कोशाचे जनक विश्वनाथ नरवणे यांची ओळख करून दिली. यावेळी सन १८९४ मध्ये स्थापन झालेल्या १३० वर्षे जुन्या संस्थेचे म्हणजे महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक सभेचे कार्यवाह चाफेकर उपस्थित होते. कार्यक्रमास विविध शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालये येथील ८० ग्रंथपाल उपस्थित होते. बिपिन पाटसकर यांनी आभार मानले.

# लक्ष्मीनगर, दंडाचीवाडी येथील बोगस डॉक्टरविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ११ डिसेंबर-** सांगोला तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अविनाश उत्तम खांडेकर यांनी सांगोला तालुक्यातील लक्ष्मीनगर दंडाचीवाडी येथील बोगस डॉ.प्रविण विरुपक्षपा बडगीरे यांचे विरूद्ध सांगोला पोलिस ठाणे येथे फिर्याद दाखल केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, फिर्यादी डॉ.अविनाश खांडेकर यांनी दि.११ डिसेंबर रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास लक्ष्मीनगर दंडाचीवाडी ता.सांगोला येथे भेट दिली असता येथे ४ ते ५ वर्षापासुन डॉ.प्रविण बडगीरे हे मारुती मंदीराजवळ स्वःताचे घरामध्ये खाजगी वैद्यकिय व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास आले. त्यांच्याकडे महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय करणेसाठी नोंदणी आणि शैक्षणीक पात्रता नसल्याचे आढळून आले. यावरून फिर्यादी डॉ. अविनाश खांडेकर यांनी मागील सुमारे ४ ते ५ वर्षापुर्वीपासुन विनापरवाना, बेकायदेशीरपणे, पात्रता नसताना वैद्यकीय व्यवसाय करुन रुग्णांच्या जिवीतास व आरोग्यास धोका होईल याची जाणीव असतानाही लोकांची फसवणूक केली आहे, म्हणून माझी बोगस डॉ.प्रविण बडगीरे रा.लक्ष्मीनगर दंडाचीवाडी ता. सांगोला जि. सोलापुर यांच्याविरुध्द इंडीयन मेडिकल कौन्सील ॲक्ट १९५६ चे कलम १५ व महाराष्ट्र



मेडीकल प्रक्टीशनर ॲक्ट १९६१ चे कलम ३३(२) व भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) वगैरे प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे असे सांगोला पोलीस ठाणे येथे दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त

### विदर्भ कोकण ग्रामीण बँक शेतकऱ्यांना देणार दोन लाखापर्यंत विनातारण शेती कर्ज

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-** रिझर्व्ह बँकेने नुकत्याच जाहीर केलेल्या धोरणानुसार शेतकऱ्यांना आता दोन लाख रुपयापर्यंत विनाकारण शेती कर्ज मिळणार आहे. सदर योजनेची अंमलबजावणी विदर्भ कोकण ग्रामीण बँकेने त्वरित केली असून आता शेतकऱ्यांना दोन लाखापर्यंत शेती कर्ज विना तारण वितरित करण्यात येत आहे अशी माहिती विदर्भ कोकण ग्रामीण बँकेचे सोलापूर क्षेत्राचे क्षेत्रीय व्यवस्थापक रमेश खाडे यांनी दिली. या योजनेचा फायदा सर्व शेतकऱ्यांनी घ्यावा असेही आवाहन श्री खाडे यांनी केले. तसेच ज्या शेतकऱ्यांनी याआधी दोन लाखापेक्षा कमी कर्ज घेतले आहे, त्यांनाही आता सदर कर्ज रक्कम वाढवून घेता येणार आहे. तरी अशा संबंधित शेतकऱ्यांनी त्वरित आपल्या शाखेस भेट देऊन याचा लाभ घ्यावा असेही श्री खाडे यांनी सांगितले.



### लायन्स क्लबच्या वतीने मोफत दंत आरोग्य तपासणी

**सोलापूर, दि.११ डिसेंबर-** लायन्स इंन्टरनॅशनल अंतर्गत लायन्स क्लब सोलापूर सिटीच्या वतीने आयोजित दंत शिबिर आदर्श माता व्यंकवाबाई बत्तूल माध्यमिक विद्यालय सोमवार पेठ येथे संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष लायन मोहन भूमकर यांनी पाहुण्यांचे स्वागत करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच डॉक्टर विनोद चव्हाण दंत तपासणी केले. प्रमुख पाहुणे म्हणून समाजसेवक पिंटू महाले, उद्योजक बाळकृष्ण पतंगे, मुख्याध्यापक प्रमोद बत्तूल, उद्योजक राजूसा शालगर, उद्योजक चन्नाबसू माळगे, शरणप्पा भुयारे, लायन सोमशेखर भोगडे उपस्थित होते.



### डॉ. वैशंपायन स्मृती महाविद्यालय कास्ट्राईब आंदोलनाच्या तयारीत

**सोलापूर, दि.११ डिसेंबर** डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी अभिवादन करण्यासाठी व त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यासाठी शासनाचा जीआर नाही. त्यामुळे अभिवादन करता येणार नाही, असे प्रशासनाने सांगून डॉ. आंबेडकर यांचा अपमान केला आहे. तरी या विरोधात कास्ट्राईब कर्मचारी संघटनेच्या वतीने आंदोलन करण्याची तयारी दर्शविली आहे. सध्या या प्रकरणाचा सर्व स्तरावरून निषेध व्यक्त केला जात आहे. तेव्हा अशा जातीयवादी मानसिकता ठेवणाऱ्या प्रशासनातील अधिकारी कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबन करावे अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा कास्ट्राईब कर्मचारी महासंघातर्फे अमृत नाटेकर, महसूल उपजिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे देण्यात आले. सदरचे निवेदन कास्ट्राईब कर्मचारी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष गिरीश जाधव, महासंघाचे जिल्हाध्यक्ष मनीष सुरवसे यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी जिल्हा सचिव अरविंद जेटीथोर, कार्याध्यक्ष कल्याण श्रावस्ती, कोषाध्यक्ष विजयकुमार लोंढे, संघटक सचिव लक्ष्मण गायकवाड तसेच जिल्हा परिषद शाखेचे अध्यक्ष अरुणभाऊ क्षीरसागर, महसूल शाखेचे प्रशांत सुरे, सिव्हिल शाखेचे अध्यक्ष सचिन सोनवणे, एन.टी. देशमुख, धीरज साबळे, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### मार्कमेमो गहाळ झाला आहे

**अस्मिता किशोर भोसले** या नावाची,. A.N.M. पहिल्या वर्षाची हॅलो नर्सिंग कॉलेज अणदूरची मार्कमेमो (गुणपत्रक) तुळजापूर ते गौडगाव बस प्रवासादरम्यान हरवली आहेत. तरी कोणास सापडल्यास ती खालील मोबाईलवर संपर्क साधावा.
**मोबाईल नंबर 7666085275**

# सोलर सिस्टीमच्या किंमती वाढणार?

### सोलर पॅनल ग्लासवर २०० टक्के ड्युटी

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. ११ डिसेंबर-** भारतीय वित्त मंत्रालयाने चीन आणि व्हिएतनाममधून आयात केलेल्या टेक्स्चर्ड, टेम्पर्ड, कोटेड आणि अनकोटेड सौर काचांवर २०० टक्के अँटी-डम्पिंग शुल्कांची अधिसूचना जारी केली आहे. त्यामुळे इच्छुक ग्राहकांनी एल्ग्रीस सोलारशी ०२०-७१५३००२७ वर संपर्क साधावा. हा निर्णय या वर्षाच्या फेब्रुवारीमध्ये व्यापार उपायांची महासंचालनालय डीजीटीआरद्वारे सुरू केलेल्या प्राथमिक चौकशीच्या अनुषंगाने घेतला आहे.





ज्यामध्ये डम्पिंग प्रथांचे पुरावे सापडले. प्राथमिक निष्कर्षांनी निष्कर्ष काढला की संबंधित वस्तू चीन आणि व्हिएतनाममधून भरतात डम्प केलेल्या किंमतीवर निर्यात केल्या जात आहेत. डम्पिंगमुळे या वस्तूंच्या आयातीमध्ये या देशांमधून महत्त्वपूर्ण वाढ झाली. दोन्ही संख्यात्मकदृष्ट्या आणि स्थानिक उत्पादन व उपभोगाच्या संदर्भात, ज्यामुळे स्थानिक उद्योगाला भौतिक हानी झाली. वस्तूंचे तपशील, टैरिफ वर्गीकरण, उत्पत्ती, निर्यात करणारे देश, उत्पादक आणि लागू असलेल्या अस्थायी ॲटी-डंपिंग शुल्क सहा महिन्यांसाठी प्रभावी राहील.

शुल्क दर उत्पादक आणि उत्पत्तीच्या देशावर आधारित बदलतात. अँटी-डंपिंग शुल्क भारतीय चलनात भरावे लागेल. शुल्काची गणना करण्यासाठी विनिमय दर वित्त मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेच्या आधारावर निश्चित केला जाईल.

भारतीय सरकारचा हा निर्णय स्थानिक काच उद्योगाला अन्यायकारक व्यापार पद्धतींपासून संरक्षण देणे आणि स्थानिक उत्पादकांसाठी समान स्पर्धात्मक वातावरण सुनिश्चित करणे यासाठी आहे. ही चौकशी बोरोसिल रिन्यूजेबल्सने केलेल्या अर्जाच्या प्रतिसादात करण्यात आली, ज्याममध्ये त्यांच्या देशांतर्गत उत्पादन केलेल्या सौर काच आणि आयात केलेल्या समकक्षांमध्ये साम्य असल्याचा आरोप केला गेला. बोरोसिलने युक्तिवाद केला की या आयात शारीरिक आणि रासायनिक गुणधर्म, उत्पादन प्रक्रिया, कार्ये, किंमत, वितरण ऑणि टैरिफ वर्गीकरणांमध्ये समकक्ष आहेत.

# अल्पवयीन मुले दुचाकी चालविताना दिसल्यास पालकावर भरणार खटले

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.११ डिसेंबर** मंगळवेढा शहर व ग्रामीण भागात अल्पवयीन मुले दुचाकी गाडी चालविण्याचे प्रमाण वाढत असल्याने याला नियंत्रीत करण्यासाठी पोलीस प्रशासन कारवाईसाठी सरसावले असून यापुढे जी अल्पवयीन मुले गाडी चालविताना निदर्शनास येतील त्यांच्या पालकावर खटले दाखल करण्याचा इशारा पोलीस निरीक्षक महेश ढवाण यांनी दिला आहे.

मंगळवेढा शहर व ग्रामीण भागात दिवसेंदिवस अल्पवयीन मुले मोठ्या प्रमाणात दुचाकी चालवितानाचे चित्र आहे. दरम्यान १८ वर्षाच्या आतील मुलांना दुचाकी चालविणे कायद्याने गुन्हा मानला आहे. याची सर्वस्वी जबाबदारी पालकांची असून १८ वर्षाच्या आतील मुलांना गाडी चालविण्यासाठी देवू नये असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे. शाळेमधील बरीचशी

मुले दुचाकीवर येता-जाता दिसत आहेत. परिणामी या मुलांना वाहतूकीचे कुठल्याही नियमाचे ज्ञान नसल्यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. मोटार व्हेईकल ॲक्टप्रमाणे १८ वर्षाच्या पुढील लायसन्स धारक मुले, मुली केवळ गाडी चालवू शकतात असा नियम आहे. आज मंगळवेढा शहरात बरीचशी मुले वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करीत दुचाकी हाकत असल्याचे दिसून येत आहे. यापुढे सर्व पालकांनी आपल्या अल्पवयीन मुलाच्या ताब्यात गाडी देवून कायद्याचे उल्लंघन करु नये अन्यथा संबंधीत पालकावर कायदेशीर कारवाई केल जाईल.

# मोनालिसा : लिखाणातील शायरी मनाला भिडणाऱ्या

**अभेद्य नाट्यकला व बहुउद्देशीय सामाजिक संस्था जेउरवाडी संस्थेतर्फे दि. १० डिसेंबर रोजी मोनालिसा हा नाट्यप्रयोग सादर केला. या नाटकाचे लेखक आणि दिग्दर्शक इम्तियाज मालदार हे होते.**

पडदा उघडताच दिसते एका बाजूला झोपलेली व्यक्ती आणि एक स्त्री. जवळ एक पत्र्याची पेटी, माठ, गरिबी दाखविणाऱ्या वस्तू. पाऊस पडतो आहे. स्त्री फुलं काढते आहे. माय-लेकीच्या बोलण्यातून कळते, त्या दोन दिवसांच्या उपाशी आहेत. मुलीला वडील नाहीत. स्त्री घराबाहेर पडते. इथे नाटक सुरू होते. स्टेशनचा फलाट एक पोलीस, पॅसेंजरची चौकशी पोलिसाचे काम सुरू. अनेकजण येतात एक तरूण, एक स्त्री, एक धंदेवाली, एक म्हातारी आणि गूढ वाटणारा म्हातारा यांच्यातील संवाद इथे नाटक सुरु. काम चोख करत असूनही इतरांना मदत करणारा, कनवाळू पोलीस यातील विनोदी प्रसंग. म्हाताऱ्याच्या आयुष्यातील घटना-मुलगी नाव मोनालिसाचा मृत्यू वेश्येचे मनोगत, तरुणाचे एकटेपणाचे दुःख, शेवटी मास्तरीण वाटणारी स्त्री पोटासाठी धंदा करायला तयार होते पण लग्न न झालेला ४० वर्षांचा तरूण तिला लग्नाबद्दल विचारतो इथे नाटक संपते.

नाटकाच्या मोनालिसाचा नावाचा आणि नाटकाच्या कथानकाचा तसा दूरान्वयाने संबंध. नेपथ्य - मळसिद्ध देशमुख, अजितकुमार साबळे स्टेजवर एका बाजूला दारिद्र्याचे दर्शन घडविले होते. मधोमध रेल्वे फलाट, एक बाक, मोठा ओटा, दुसऱ्या बाजूला म्हातारा बसतो तो ओटा. नेपथ्यात फारसा वेगळेपणा नव्हता. संगीत संयोजन- अनुद सरदेशमुख. फलाट असल्यामुळे ट्रेनची शिट्टी, अनाउन्समेंट हे होते. पाऊस, बासरीचा



केलेला वापर. नाटकास पूरक संगीत. प्रकाश योजना- उमा सुरवातीचा रात्रीचा निळसर प्रकाश, प्रसंगानुरूप वापरलेले स्पॉट हे ठीक होते. रंगभूषा आणि वेशभूषा - नाजमिन मालदार. पोलीस, 'गंमत केली म्हणणारी' म्हातारी, वेश्या, म्हातारा यांच्या वेशभूषा आणि रंगभूषा याकडे लक्ष वेधले जात होते. पोलीस-हवालदार-मुकेश जमादार ने उभा केलेला कनवाळू, कामात दक्ष,स्त्री दाक्षिण्य असणारा आणि स्त्रीचा आदर करणारा पोलीस छान उभा केला.

म्हातारी- दीप्ती इंगळे-सिद्धम यांनी रंगविलेले साधी वाटणारी इब्लिस म्हातारी सुरेख केली. ऐसपैस बसणं,गंमत केली रे म्हणत टाळी देणं, संसारातील दुःख लपवून हसत राहणं या सर्वातून एक लोभस म्हातारी स्मरणात राहील. म्हातारा-प्रतिक तांदळे यांनी वेडसर वाटणारा,पाणी आणायला गेलेल्या मुलीचा रेल्वे पटरी वरील मृत्यू घटनेचा धक्का त्यामुळे पाण्याची भीती. आला आला चं टायमिंग छान साधलं. पाण्याची भीती वाटणारा म्हातारा पावसाचं पाणी हातात घेऊन तोंडावर मारतो हे कसं काय? तरुणी (वेश्या) सई दरेकरने दमदार पणे उभी केली. तिचं, चालणं,बसणं,बोलणं हे सर्वच भूमिकेला उठाव आणणारं होतं. या वाटेला कुणी हौसेने येत नाही हे तिच्या जीवनाचं सूत्र. तिचा बिनधास्त पणा, रंगमंचावरील वावर ठसठशीतपणे दाखवला. तिने जाणीवपूर्वक तिच्या क्षमतांचा (झेींशपींळरश्र ) चा वापर केला तर भविष्यात रंगभूमीला एक दमदार अभिनेत्री मिळेल अशी आशा वाटते.

तरूण-इम्तियाज मालदार यानी जीवनात अपयश आलेला, ज्याचा उपयोग करून घेऊन टिंगल केली जाते असा तरूण विचारपूर्वक उभा केला. आई (तरुणी) यांना भूमिकेत फारसा वाव नव्हता तरी त्यांचा प्रयत्न चांगला होता. लेखक-इम्तियाज मालदार यांनी मोनालिसाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. लिखाणातील शायरी छान त्यांच्या जागाही योग्य मनाला भिडणाऱ्या. पण मोनालिसा म्हणजेच फ्लॉरेंन्समधील जोकोन्दा या व्यापाऱ्यांची पत्नी म्हणून मोनालिसा ऊर्फ जोकोन्दा मी म्हटले जाते. तिचे डोळ्यातील किंचित उदास छटा, गूढ हास्य याचे रहस्य अजूनही उलगडलेले नाही. पण म्हणून प्रत्येकाच्या जीवनात मोनालिसा असते हे दाखविण्याचा केलेला प्रयत्न खटकत होता. तरीपण एक विषय मांडताना रेखाटलेल्या व्यक्तिरेखांची नाटकात लक्षात राहील, अशी मजा आणली.करता येत नाहीत. पेलवत नसतील तर एकाच वेळी मोठी भूमिका आणि दिग्दर्शनाचा हव्यास करू नये, असे नम्रपणे नमूद करावेसे वाटते.

६३ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा २०२४-२५

**नाट्य समीक्षण**
**विद्या काळे**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी नवी दिल्ली येथे केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी महाराष्ट्र भाजपाचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे ही उपस्थित होते

# छत्तीसगडमध्ये नक्षल्यांकडून भाजपा कार्यकर्त्याची हत्या

**बिजापूर, ११ डिसेंबर**

पोलिस खबऱ्या असल्याचा आरोप करीत छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी भाजपा कार्यकर्त्याची हत्या केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी बुधवारी दिली.

मागील आठवडाभरात नक्षलवाद्यांनी सामान्य नागरिकाची केलेली ही सातवी हत्या आहे. ही हत्या मंगळवारी रात्री करण्यात आली. कुडियाम माडो, असे त्याचे नाव असून, तो फारसेगड पोलिस ठाणे हद्दीतील सोमनपल्ली गावचा रहिवासी होता, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

मंगळवारी रात्री नक्षलवाद्यांचे पथक माडोच्या घरी धडकले. त्यांनी माडोला खेचून बाहेर नेले आणि गळा आवळून त्याची हत्या केली. त्याच्या मृतदेहाशेजारी नक्षलवाद्यांनी पत्रक सोडले. त्याच्या हत्येची जबाबदारी माओवाद्यांच्या नॅशनल पार्क कमिटीने स्वीकारली. माडो पोलिसांचा खबऱ्या म्हणून काम करायचा, असा दावा त्यात केला आहे. बुधवारी सकाळी हत्येची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली आणि मृतदेह विच्छेदनासाठी पाठवला. परिसरात शोधमोहीम सुरू करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. (वृत्तसंस्था)

# भारताने ७५ नागरिकांना सीरियातून काढले

## दमास्कस, बैरूत दूतावासाची मोहीम

**नवी दिल्ली, ११ डिसेंबर**

बंडखोर सैन्याने राष्ट्राध्यक्ष बशर असद यांच्या हुकूमशाही सरकारचा पराभव केल्यानंतर दोन दिवसांनी भारताने आपल्या ७५ नागरिकांना सुरक्षितरीत्या सीरियातून बाहेर काढले.

दमास्कस आणि बैरूतमधील भारतीय दूतावासाने सीरियातून नागरिकांना बाहेर काढण्याची मोहीम यशस्वी केली. त्यांनी तेथील सुरक्षा परिस्थितीचे मूल्यांकन केल्यानंतर ही मोहीम पार पाडण्यात आली, अशी माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने दिली.

सीरियात अलिकडेच झालेल्या घडामोडींच्या पृष्ठभूमीवर भारत सरकारने आज ७५ नागरिकांना सुरक्षितरीत्या या देशातून बाहेर काढले, असे मंगळवारी रात्री उशिरा जारी करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे. सुटका करण्यात आलेल्यांत ४४ जण जम्मू-काश्मिरातील असून, ते सैदा झैनाब येथे अडकले होते. सर्व भारतीय नागरिकांनी सुरक्षितरीत्या सीरियाची सीमा पार करीत लेबनॉनमध्ये पोहोचले. ते व्यावसायिक विमानाने भारतात परततील, असे या निवेदनात म्हटले आहे.

विदेशात असलेल्या भारतीयांची सुरक्षा आणि सुरक्षिततेला सरकारचे सर्वोच्च प्राधान्य आहे, असे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले. सीरियातील भारतीय नागरिकांनी दमास्कस येथील भारतीय दूतावासाच्या संपर्कात राहावे, असे आवाहन परराष्ट्र मंत्रालयाने केले. सीरियातील परिस्थितीवर सरकार बारीक नजर ठेवून आहे, असे स्पष्ट करण्यात आले.

सीरियातील काही महत्त्वाची शहरे ताब्यात घेतल्यानंतर बंडखोरांनी दमास्कसमध्ये प्रवेश केल्यानंतर असद सरकार रविवारी कोसळले होते. हयात तहरीर अल-श्याम या बंडखोर संघटनेने सीरियाचा ताबा घेतल्यानंतर असद यांनी रशियात पळ काढला होता. या माध्यमातून असद कुटुबीयांची ५० वर्षांची सत्ता संपुष्टात आली.

असद हे रशियात आले असून, ते मॉस्कोत आहेत. त्यांना राजकीय आश्रय देण्यात आला, असे रशियातील सरकारी माध्यमांनी स्पष्ट केले. त्यांची कारकीर्द यादवी, रक्तपात आणि विरोधकांवरील अत्याचारांमुळे गाजली होती. (वृत्तसंस्था)


लेबनॉनमधील भारताचे राजदूत नूर रहमान शेख यांनी सीरियातून सुटका केलेल्या ७५ भारतीयांचे बैरूत येथे स्वागत केले

## भजनलाल शर्मा यांच्या ताफ्याला कारची धडक

**जयपूर, ११ डिसेंबर**

राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्या ताफ्याला कारने धडक दिल्याने पाच सुरक्षा कर्मचाऱ्यांसह ९ जण जखमी झाले, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली. जखमींपैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असून, त्यांना अतिदक्षता विभागात हलवण्यात आले.

ताफ्याच्या हालचालीदरम्यान सामान्य लोकांना थांबवू नये, अशा सूचना भजनलाल शर्मा यांनी वाहतूक पोलिसांना दिल्या होत्या. अशा परिस्थितीत मुख्यमंत्री जात असताना विरुद्ध बाजूने येणाऱ्या वाहनाने त्यांच्या ताफ्यातील सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या वाहनाला धडक दिली. (वृत्तसंस्था)

# मालेगाव 'व्होट जिहाद' प्रकरण एटीएसकडे

**मुंबई, ११ डिसेंबर**

मालेगाव व्होट जिहाद प्रकरणाचा तपास दहशतवादविरोधी पथक अर्थात् एटीएसकडे देण्यात आला आहे. किरीट सोमय्या यांनी त्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले आहे. मालेगाव व्होट जिहाद फडिंग घोटाळ्याचा तपास महाराष्ट्र एटीएसकडे हस्तांतरित केल्याबद्दल सोमय्या यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले आहेत.

मालेगाव येथील नामको बँकेच्या शाखेत बेरोजगार तरुणांच्या खात्यांवरून १२५ कोटी रुपयांचा आर्थिक व्यवहार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला होता. हे पैसे 'व्होट जिहाद'साठी वापरल्याचा आरोप भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी केला होता.

सिराज मोहम्मद, नागनी अक्रम मोहम्मद, वसीम वली मोहम्मद, शेख शाहबाज, जाफरभाई नाबिवाला, आमिर वधारिया, अब्दुल कादिर भागड हे मेहमूद भगाड याचे साथीदार असून, ते या घोटाळ्यात सहभागी आहेत. मेहमूद भागड या टोळीचा प्रमुख आहे तसेच या घोटाळ्यातील एक हजार कोटींपैकी ६०० कोटींपेक्षा जास्त रुपयांचा निधी दुबईला पाठविण्यात आला. निवडणुकांच्या काळात १०० कोटी रुपये 'व्होट जिहाद'साठी वापरण्यात आल्याचा आरोप सोमय्यांनी केला.

या प्रकरणाचा तपास व्हावा यासाठी ईडी, एनएआय, सीबीआय, आयकर विभाग, एफआययू, जीएसटी, सीजीएसटी या प्रमुख यंत्रणांशी समन्वय साधण्यास, मदत घेण्यासाठी महाराष्ट्राच्या मुख्य सचिवांना विनंती करावी, अशी विनंती सोमय्या यांनी पत्राद्वारे केली आहे. (वृत्तसंस्था)

### दहशतवादी निधीसाठी वापर

मेहमूद भागडला सुमारे १००० कोटी मिळाले आणि मुंबई, नाशिक, अहमदाबाद, सुरत येथील हवाला ऑपरेटर्सना हस्तांतरित करण्यात आले. त्यातील ६०० कोटींहून अधिक रक्कम दुबईला हस्तांतरित करण्यात आले. मेहमूद भागड हा या टोळीचा एक प्रमुख असल्याचे समजते. अशा अनेक टोळ्या या घोटाळ्यात सक्रिय असून, व्होट जिहाद मोहिमेसाठी वरीलपैकी १०० कोटी रोख स्वरूपात काढले आणि ऑक्टोबरमध्ये मालेगाव मार्गे विविध संघटना, नेत्यांना वितरित करण्यात आले. तसेच या सिंडिकेट्सचा वापर दहशतवाद निधी, मादकपदार्थ तस्कर, व्होट जिहाद प्रकारच्या हालचालींसह पैशाच्या व्यवहारांसाठी केला जात असल्याचा आरोप सोमय्या यांनी केला आहे.

चित्रपट वार्ता

# भारत २०३५ पर्यंत स्वतःचे अंतराळ स्थानक उभारणार

## केंद्रीय मंत्री जितेंद्रसिंह यांची माहिती

**नवी दिल्ली, ११ डिसेंबर**

भारत २०३५ पर्यंत स्वतःचे अंतराळ स्थानक उभारणार असून, २०४० पर्यंत भारतीय अंतराळवीर चंद्रावर उतरवेल, अशी घोषणा केंद्रीय विज्ञान, तंत्रज्ञान आणि अंतराळ राज्यमंत्री जितेंद्रसिंह यांनी बुधवारी केली.



अंतराळ क्षेत्रात भारत एकापाठोपाठ एक नवीन कामगिरी करीत आहे. केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्रसिंह यांनी एक मोठी घोषणा केली आहे. विज्ञान मंत्रालयाच्या कामगिरीवर दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलताना सिंह यांनी सरकारच्या महत्त्वाकांक्षी अंतराळ उपक्रमांवर प्रकाश टाकला.

२०३५ पर्यंत आपले स्वतःचे अंतराळ स्थानक असणार आहे. अमेरिका आणि एक किंवा दोन इतर देशांनंतर भारताचे अंतरिक्ष स्थानक म्हणून ओळखले जाईल. २०४० पर्यंत चंद्राच्या पृष्ठभागावर एक भारतीय उतरेल, असे त्यांनी सांगितले.

भारताचा पहिला मानवी अंतराळ उड्डाण कार्यक्रम गगनयान मिशन याबद्दल बोलताना सिंह यांनी २०२५ च्या अखेरीस किंवा २०२६ च्या सुरुवातीला गगनयान मोहिमेअंतर्गत पहिला भारतीय अंतराळवीर अंतराळात जाणार असल्याचे सांगितले. त्याचबरोबर, भारताने खोल समुद्र मोहिमेचा भाग म्हणून सहा हजार मीटरपर्यंत खोली शोधून समुद्रतळावर मानव पाठवण्याची योजना आखली असल्याचे सांगितले. (वृत्तसंस्था)

### पंतप्रधान मोदी यांनी केली होती घोषणा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २७ फेब्रुवारी रोजी तिरुअनंतपुरम येथे गगनयान मोहिमेतील अंतराळवीरांच्या नावांची घोषणा केल्यानंतर २०३५ पर्यंत भारताचे स्वतःचे अंतराळ स्थानक असेल, असे सांगितले होते. आता त्यांचे स्वप्न लवकरच पूर्ण होणार असल्याचे दिसत आहे. आतापर्यंत जगात फक्त दोनच अंतराळ स्थानके आहेत. भारताने स्वतःचे अंतराळ स्थानक तयार केले, तर ती केवळ ऐतिहासिक कामगिरीच नाही तर भारत स्वतःचे अंतराळ स्थानक असणारा जगातील तिसरा देशही बनेल.

# काँग्रेससोबत आघाडीची कोणतीही शक्यता नाही

## अरविंद केजरीवालांनी पुन्हा स्पष्ट केली भूमिका

**नवी दिल्ली, ११ डिसेंबर**

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेससोबत कोणतीही आघाडी करणार नसल्याचे आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी पुन्हा एकदा बुधवारी स्पष्ट केले. केजरीवाल यांनी 'एक्स' हॅण्डलवर पोस्ट करीत याबाबत माहिती दिली.

आम आदमी पार्टी ही निवडणूक स्वबळावर लढणार आहे. काँग्रेससोबत कोणत्याही आघाडीची शक्यता नाही. दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या आघाडीसाठी काँग्रेस आणि आपची चर्चा अंतिम टप्प्यात असल्याच्या वृत्तानंतर हे विधान आले आहे.

यापूर्वी ७ डिसेंबर रोजी दिल्ली प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष देवेंद्र यादव यांनी आम आदमी पार्टी (आप) आणि राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांच्यावर राष्ट्रीय राजधानीतील कायदा आणि सुव्यवस्थेच्या बिघडलेल्या परिस्थितीला जबाबदार असल्याची टीका केली होती. केजरीवाल यांनी ज्याप्रमाणे निर्भया प्रकरणाच्या वेळी माजी मुख्यमंत्री शीला दीक्षित यांचा राजीनामा मागितला, त्याचप्रमाणे दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी यांचा राजीनामा मागितला पाहिजे, अशी मागणीही यादव यांनी केली. दिल्ली काँग्रेस अध्यक्षांनी आरोप केला की, महिलांना टोळीयुद्ध, गोळीबार, खून, बलात्कार, छळ आणि छेडछाडीच्या घटनांसह वाढत्या गुन्ह्यांचा सामना करावा लागत आहे.

दरम्यान, आपने सोमवारी दिल्ला विधानसभा निवडणुकीसाठी २० उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली, ज्यामध्ये सिसोदिया यांना त्यांच्या मागील जागेऐवजी पटपरगंजमधील जंगपुरा येथून उमेदवारी देण्याचा निर्णय घेतला आहे. अवध ओझा यांना पटपरगंजमधून उमेदवारी देण्यात आली आहे. अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील पक्षाने माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांची पटपरगंजमधील जागा बदलली. ते आता जंगपुरा मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. अवध ओझा यांना सिसोदिया यांच्या जुन्या पटपडगंज मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)


भारताचे लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी बुधवारी दिल्लीतील साऊथ ब्लॉक येथे भारत दौऱ्यावर असलेले नेपाळचे लष्करप्रमुख सुप्रबल जनसेवाश्री जनरल अशोक राज सिंग्देल यांचे स्वागत केले

## इस्रायलचा उत्तर गाझावर हल्ला, १९ ठार

**कैरो, ११ डिसेंबर**

उत्तर गाझापट्टीमध्ये विस्थापितांनी आश्रय घेतलेल्या घरावर इस्रायलने केलेल्या हल्ल्यात १९ जण ठार झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

इस्रायल ऑक्टोबरच्या सुरुवातीपासून गाझाच्या उत्तर भागात हमासच्या दहशतवाद्यांविरुद्ध नव्याने कारवाई करीत आहे. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासच्या नेतृत्वाखाली अतिरेक्यांनी इस्रायलमध्ये घुसून सुमारे १,२०० लोकांना ठार केले तसेच जवळपास २५० लोकांचे अपहरण केले. त्यानंतर इस्रायलने सुरू केलेल्या कारवाईत ४४ हजारांपेक्षा जास्त पॅलेस्टिनी ठार झाले आहेत. (वृत्तसंस्था)

## सनी देओलही झळकणार 'रामायण'मध्ये

**मुंबई :** सनी देओल नितेश तिवारीच्या 'रामायण' चित्रपटात दिसणार आहे. बऱ्याच दिवसांपासून अभिनेता या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटात तो हनुमानाची भूमिका साकारणार असल्याच्या अफवा सोशल मीडियावर पसरल्या होत्या. दरम्यान, अभिनेत्याने एका मुलाखतीदरम्यान चित्रपटाबाबत अनेक खुलासे केले आहेत. नितीश तिवारी दिग्दर्शित रामायण हा चित्रपट रिलीज होण्यापूर्वीच चर्चेत आहे. सनी देओलने संवाद साधताना रामायण चित्रपटाबाबत काही खुलासे केले. तो या चित्रपटाचा एक भाग असल्याची पुष्टी स्वतः अभिनेत्याने केली. मात्र, त्याने अद्याप त्याच्या व्यक्तिरेखेबद्दल कोणतीही माहिती शेअर केलेली नाही.



## मृणाल ठाकूर पंजाबी गायकाच्या प्रेमात?

**मुंबई :** भारतीय कॅनेडियन ए.पी. ढिल्लन हा लोकप्रिय पंजाबी गायक आहे. जगभरात त्याचा चाहतावर्ग आहे. आता त्याचे नाव एका मराठी अभिनेत्रीसोबत जोडले जात आहे. मृणाल ठाकूर आणि ए. पी. एकमेकांना टॅग करीत इन्स्टावर स्टोरी शेअर करीत असतात. हे पाहून दोघांचे नाते आकाराला येत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. नुकतीच ए. पी. ने पोस्ट मृणालला टॅग केली होती. त्याने पोह्यांनी भरलेली एक पोस्ट शेअर करीत कॅप्शनमध्ये लिहिले, 'मी खाल्लेले आतापर्यंतचे सर्वांत चविष्ट पोहे. थँक्यू मृणाल ठाकूर'. ही स्टोरी पाहिल्यानंतर आता यांचा कार्यक्रम पोह्यांपर्यंत पोहोचल्याची थट्टामस्करी नेटकऱ्यांनी सुरू केली आहे.



## प्राजक्ताने सांगितले हसण्याचे महत्त्व

**मुंबई :** आजकालच्या धावपळीच्या जगात ताणतणाव मोठी समस्या बनली आहे. म्हणूनच अशा स्थितीत आरोग्य चांगले ठेवणे आव्हानात्मक ठरले आहे. आरोग्य चांगले ठेवण्यासाठी हसणे हा सुंदर व्यायाम आणि उपचार असल्याचे प्राजक्ता माळी सांगते. तिने एक व्हिडीओ शेअर करीत हसण्याचे महत्त्व सांगितले. ती लिहिले, तुम्हाला माहिती नसेल, आपल्या मेंदूमध्ये हसण्याने जे हार्मोन्स निर्माण होतात, ते आपल्या मानसिक आरोग्यासाठी खूप गरजेचे असतात. आयुष्यात सतत हसत राहिले पाहिजे. परिस्थिती कशीही असली, तरी त्यावर मात करण्यासाठी मानसिकदृष्ट्या खंबीर राहणे आवश्यक आहे. म्हणून हसत चला, कोणासाठी नाही तर स्वतःसाठी, आपल्या आरोग्यासाठी ते खूप गरजेचे आहे.



## दाक्षिणात्य अभिनेत्री श्रीलीला बॉलिवूडमध्ये येणार

**मुंबई :** सामंथा रूथ प्रभू ज्या प्रमाणे 'पुष्पा'च्या 'उ अंटावा'ने प्रसिद्धीझोतात आली, त्याचप्रमाणे 'पुष्पा-२'मुळे श्रीलीला सर्वांना परिचित झाली आहे. तिच्या 'किसिक' या आयटम साँगला बऱ्यापैकी लोकप्रियता मिळते आहे. आता श्रीलीला लवकरच बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. विशेष म्हणजे, ती एका स्टार कीडसोबत बॉलिवूड पदार्पण करणार आहे. सैफ अली खानचा मुलगा इब्राहिम अली खानसोबत ती 'दिलर'मध्ये दिसणार आहे. हा एक स्पोर्ट्स ड्रामा आहे, जो एका मॅराथॉनपटूची कथा सांगतो. इब्राहिमचा हा दुसरा चित्रपट आहे.



# सुनील पालनंतर अभिनेते मुश्ताक खानचे अपहरण

## विमानतळावरून उचलले, १२ तास छळ

**मुंबई, ११ डिसेंबर**

विनोदी कलावंत सुनील पाल यांचे अलिकडेच अपहरण झाले, त्यानंतर मनोरंजन विश्वात खळबळ उडाली होती. आता सुनील पाल यांच्या ऑडिओमुळे हे प्रकरण आणखी गंभीर झाले आहे. दरम्यान, बॉलिवूड अभिनेता मुश्ताक खानचेही अपहरण झाल्याचे वृत्त आहे. या बातमीनंतर विनोदी कलाकारांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



अभिनेते मुश्ताक खान यांचे अपहरण करून खंडणी मागण्यात आली होती. ही घटना मागील महिन्यात दिल्ली विमानतळावरून सुरू झाली. यावेळी मुश्ताक खान यांना मेरठमध्ये एका सत्कार समारंभात सहभागी होण्यासाठी कार पाठवून बोलावण्यात आले होते. पण, हा सगळा या कारस्थानाचा भाग होता. कारण, वाहन मेरठऐवजी दिल्लीच्या बाहेर वळले. इतकेच नाही तर, अपहरणकर्त्यांनी अभिनेत्याला ओलिस ठेवले आणि तब्बल १२ तास अत्याचार केले.

**समोर आले धक्कादायक सत्य**

मुश्ताक खान यांचे व्यावसायिक भागीदार शिवम यादव यांनी या घटनेची माहिती दिली आणि अभिनेत्याला १२ तास कशाप्रकारे ओलिस ठेवले होते, हे सांगितले. अपहरणकर्त्यांनी त्याच्याकडे एक कोटी रुपयांची खंडणी मागितली. मात्र, ते संपूर्ण रक्कम देऊ शकले नाहीत. तेव्हा, त्यांच्या आणि त्यांच्या मुलाच्या बँक खात्यातून २ लाख रुपये ट्रान्सफर करण्यात आले.

या संपूर्ण घटनेबाबत शिवम यादव यांनी सांगितले की, मुश्ताक खान यांच्याकडे विमानाचे तिकीट, बँक हस्तांतरणाची माहिती आणि विमानतळाचे सीसीटीव्ही फुटेज असे पुरावे आहेत. (वृत्तसंस्था)

# तीन बांगलादेशी घुसखोरांना पाच वर्षांची शिक्षा

**मुंबई, ११ डिसेंबर**

तीन बांगलादेशींना भारतात अवैध घुसखोरी आणि बनावट कागदपत्रे बाळगल्याप्रकरणी पाच वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे. मुंबईतील राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) विशेष न्यायालयाने हा निकाल दिला.

मोहम्मद हबीबुर रहमान हबीब, हन्नान अन्वर हुसेन खान आणि मोहम्मद अजराली सुभानल्ला अशी त्यांची नावे आहेत. ते मूळचे बांगलादेशचे नागरिक आहेत. या तिघांनी भारतात अवैध घुसखोरी केली. या प्रकरणी एनआयएने आरोपींना ताब्यात घेतले होते. एनआयए विशेष न्यायालयाने तिघांना दोषी ठरवले होते. आज आरोपींना पाच वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा आणि दोन हजार रुपये दंड ठोठावण्यात आला आहे.

मोहम्मद हबीबुर रहमान हबीब, हन्नान अन्वर हुसेन खान आणि मोहम्मद अजराली सुभानल्ला या तिघांनी भारतात अवैध घुसखोरी केल्याचे २०१८ मध्ये उघडकीस आले होते. पुणे पोलिसांनी वैध कागदपत्रांशिवाय पुण्यात राहणाऱ्या अनेक बांगलादेशी नागरिकांवर गुन्हा दाखल केला होता. हे तिघेही दहशतवादी संघटना अल कायदाला मदत करीत असल्याचा आरोप होता. एनआयएने ७ सप्टेंबर २०१८ रोजी या तिघांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले होते. (वृत्तसंस्था)

# तत्काळ तिकीट बुकिंगची वेळ बदलली

**नवी दिल्ली, ११ डिसेंबर**

भारतीय रेल्वेने तत्काळ तिकीट बुकिंगच्या वेळेत बदल केला आहे. रेल्वेच्या माहितीनुसार, प्रवाशांना आता बुकिंग प्रक्रिया अधिक सुलभ होण्यास मदत मिळणार आहे. नव्या नियमांतर्गत एसी क्लाससाठी तत्काळ तिकीट बुकिंग सकाळी १० वाजल्यापासून सुरू होणार आहे. नॉन एसी क्लाससाठी ही प्रक्रिया ११ वाजल्यापासून सुरू होणार आहे.

ज्यांना अचानक प्रवास करावा लागू शकतो किंवा आपत्कालीन स्थितीत तिकीट बुक करावे लागू शकते, त्यांच्यासाठी ही सुविधा खूप उपयोगी आहे. तत्काळ तिकीट बुक करण्यासाठी प्रवाशांना आयआरसीटीसीच्या संकेतस्थळावर नोंदणी करावी लागेल. नोंदणी केल्यानंतर 'प्लॅन माय जर्नी' सेक्शनमध्ये जात प्रवासाबाबत माहिती द्यावी लागेल. कधी प्रवास करणार, स्थानक कोणते ही सगळी माहिती भरावी लागेल. नंतर बुकिंग टॅबमध्ये तत्काळचा पर्याय निवडून हवी असलेली ट्रेन आणि क्लासचा (एसी किंवा नॉन एसी) पर्याय निवडावा लागेल. त्यात माहिती, नाव, वय आणि ओळखपत्राची माहिती आवश्यक आहे.

बुकिंगची माहिती दिल्यानंतर क्रेडिट-डेबिट कार्ड, यूपीआय, नेट बँकिंग किंवा डिजिटल वॉलेटचा वापर करु शकता. पैसे भरल्यानंतर तिकिटाची माहिती एसएमएस किंवा ई-मेलच्या माध्यमातून तुम्हाला पाठवण्यात येईल. कन्फर्म तत्काळ तिकीटचा तुम्हाला रिफंड मिळत नाही. जर ट्रेन रद्द झाली, तरच रिफंड मिळते. (वृत्तसंस्था)



## अग्रलेख...

# काँग्रेसची आणखी एक घोडचूक

कोणतीही व्यक्ती असो की संस्था, संघटना प्रत्येकालाच चर्चेत राहावेसे वाटते. कुठली तरी चांगली कामे, कृती आपल्याकडून व्हावी त्याकरिता आपली समाजाच चर्चा व्हावी, असे वाटण्यात काहीच गैर नाही. पण असे चर्चेत राहण्यासाठी काही सत्कृत्ये आपल्या हातून घडावी लागतात. देशभक्तीचे प्रकटीकरण करावे लागते, तेव्हा कुठे आपले नाव रोशन होते. काँग्रेस पक्षाचे मात्र तसे नाही. या पक्षाला आणि पक्षाच्या नेत्यांना कायम चर्चेत राहण्याची हौस तर आहे, पण त्यासाठी सत्कार्ये करण्याची मात्र कुणाची तयारी नाही. त्यामुळे हा पक्ष विघातक, वादग्रस्त कामे अथवा कृत्ये करून चर्चेत राहण्याचा प्रयत्न करतो. परिणामी त्याचे अनेक प्रयत्न वाया जातात आणि कौतुकाचे दोन चांगले शब्द कानी पडण्याऐवजी पक्षश्रेष्ठींवर शिव्यांच्या लाखोल्या ऐकण्याची वेळ येते. अशाने पक्षश्रेष्ठी तोंडघशी पडतात अन् अनेकदा काँग्रेस पक्षाची पाठ भाजून निघते. सनातनच्या मुद्यावर तर काँग्रेसला अनेकदा तोंडावर ठोसे बसलेले आहेत. नुकत्याच महाराष्ट्र आणि हरयाणा राज्यात झालेल्या निवडणुकीत 'एक है तो सेफ है' आणि 'बटेंगे तो कटेंगे' या नाऱ्यांनी काँग्रेसची वाट लावली, या पक्षाला पराभवाचा जबरदस्त झटका सहन करावा लागला. पण हिंदू समाजात फूट पाडण्याचे कट-कारस्थान अपयशी ठरूनही पक्ष त्यातून काही शिकलेला दिसत नाही. या निवडणुकीत त्यांच्या नेत्यांनी हिंदू देवी-देवतांची उडविलेली खिल्ली त्यांना प्रचंड महागात पडली. आता परत तसलेच कृत्य काँग्रेसच्या हातून शेजारच्या कर्नाटक प्रांतात घडले आहे. कर्नाटकमधील सिद्धरामय्या यांच्या नेतृत्वातील काँग्रेस सरकार आधीच अंतर्गत वादात हेलकावे खात असताना या सरकारने बेळगावच्या सुवर्ण सौधा विधानसभेत आदरपूर्वक लावण्यात आलेले स्वातंत्र्यवीर सावरकरांचे छायाचित्र हटवण्याचा निर्णय घेतला आहे. यावरून पुन्हा एकदा नव्या वादाला तोंड फुटले आहे. राज्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे कर्नाटकसाठी कोणतेही योगदान नाही असे सरकारला वाटत असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आलेला आहे. भारतीय जनता पक्षाचे तत्कालीन मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्या नेतृत्वातील सरकारने विधानसभेत सावरकरांचे हे छायाचित्र त्यांच्या गौरवार्थ लावले होते. ते हटविण्याची कुणकुण लागताच भारतीय जनता पक्षासह राज्यातील जनतेत संतापाची लाट उसळली आहे. कर्नाटकातील काँग्रेस नेत्यांनी जाहीरपणे या निर्णयाचे समर्थन केल्याने आगीत तेल टाकण्याचे काम झाले आहे. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत योगदान देणाऱ्या व्यक्तींची महती नाकारणे हा कृतघ्नपणाच असून, तो काँग्रेसच्या हातून घडला आहे. सावरकरांचे छायाचित्र सुवर्ण सौधा विधानसभेतून हटविण्याचा निर्णय साधासुधा नसून, अस्तित्वात नसलेल्या इतिहासाचे लेखन करण्याचा हा प्रकार आहे. सावरकरांची बदनामी, त्यांची निंदा-नालस्ती काँग्रेसकडून काही प्रथमच झालेली नाही. या निर्णयाद्वारे पक्षश्रेष्ठींना खूश करून करून अस्थिर सिद्धरामय्यांनी आपली खुर्ची अधिक बळकट केली आहे, असे बोलले जात आहे. अत्यंत निंदनीय आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा अपमान करणारा निर्णय, अशा शब्दात भारतीय जनता पार्टीने यावर तीव्र टीका केली आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी भोगलेल्या यातनांकडे काँग्रेसने दुर्लक्ष केले आहे, त्यांचे बलिदान आणि त्यांचे विचार यांची अवहेलना करण्याचा काँग्रेसचा हा डाव आहे, असे मतही भाजपने व्यक्त केले आहे. सावरकरांचे पणतू रणजित सावरकर यांनी काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला आहे. काँग्रेसकडून यापेक्षा वेगळी अपेक्षा नव्हती. मात्र या निर्णयाची त्यांना मोठी किंमत चुकवावी लागेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

स्वातंत्र्य चळवळीतील सहभागाचा इतिहास असलेला काँग्रेस पक्ष नेहमीच राष्ट्रपुरुषांची निंदा-नालस्ती करण्यात आघाडीवर असतो, त्यामुळे कर्नाटकातील विधानसभेतून सावरकरांचे छायाचित्र हटविण्याच्या त्यांच्या कृतीत काहीच नावीन्य नाही. यापूर्वी काँग्रेसने राजस्थानमधील शालेय अभ्यासक्रमातील वीर सावरकरांच्या धड्यामधून 'वीर' शब्द काढून टाकला होता. त्यामुळे तेथे ते फक्त विनायक दामोदर सावरकर राहिले. सावरकरांच्या कार्याबद्दल आणि एकूणच इतिहासातील त्यांच्या स्थानाबद्दल दरवर्षी नव्याने चर्चा उपस्थित होत असते. २००४ साली अंदमान बेटांवरील स्वतंत्र ज्योती स्मारकावरील सावरकरांच्या कवितेच्या ओळी काँग्रेसचे वरिष्ठ नेते मणिशंकर अय्यर यांनी काढण्याचा निर्णय घेतला होता. त्यावर तत्कालीन विरोधी पक्षातील शिवसेना, भाजपाने प्रखर विरोधाची भूमिका घेतली होती. मणिशंकर अय्यर यांच्याविरोधात 'जोडे मारा' आंदोलनही मुंबईत करण्यात आले होते. सावरकरांची प्रतिमा संसदेत लावण्यावरही अनेक वाद निर्माण झाले होते. सावरकर यांच्याबाबतीत काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी केलेल्या विधानांमुळेही वाद निर्माण झाला होता. भारत जोडो यात्रेदरम्यान एका जाहीर सभेत राहुल बाबांनी 'मैं राहुल सावरकर नहीं, राहुल गांधी हूँ' असे म्हणत सावरकरांबद्दलच्या त्यांच्या हीन भावना प्रकट केल्या होत्या. काँग्रेचे नेते तर आजही त्यांनी भोगलेली काळ्या पाण्याची शिक्षा मान्य करण्यास तयार नाहीत. त्यांचे नेते मंडळी वारंवार 'माफीवीर' म्हणून त्यांची खिल्ली उडवीत असतात. सेल्युलर जेलमधून सुटण्यासाठी सावरकरांनी अनेकवार इंग्रज अधिकाऱ्यांची माफी मागितल्याचा दाखला काँग्रेसतर्फे दिला जातो. त्याची सत्यता पटवून घेण्यात त्यांनी एकदाही स्वारस्य दाखविलेले नाही.

मुळात काँग्रेसला गांधी घराण्यातील नेत्यांशिवाय पक्षातील इतर कुठल्याही नेत्यावर फुले उधळली जाणे अमान्य आहे. म्हणूनच काँग्रेसमध्ये नेहरू-गांधी परिवाराखेरीज दुसऱ्या कुठल्याही नेत्याला फारसा मान दिला जात नाही. काँग्रेसने त्यांच्या किती माजी अध्यक्षांना सन्मानित केले, त्यांचे विचार प्रसारित करण्यासाठी आंदोलने केली, त्यांचे पुतळे उभारण्यासाठी पुढाकार घेतला, या प्रश्नांची उत्तरे नकारार्थीच येतील. सरदार वल्लभभाई पटेल, ज्यांना सारा भारत देश लोहपुरुष म्हणून संबोधतो, त्यांचाही काँग्रेसने उचित सन्मान केलेला नाही. पण या गुजरातपुत्राचा अतिभव्य असा 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' उभारून भारतीय जनता पक्षाचे नेते नरेंद्र मोदी यांनी त्यांचा गौरव केला. बाळ गंगाधर टिळक, गोपाळकृष्ण गोखले अशा कितीतरी काँग्रेस नेत्यांची नावे घेता येतील, ज्यांना काँग्रेसने मोठे करायला हवे होते, त्यांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवायला हवे होते. पण त्याबाबत काँग्रेस मुळीच सजग राहिली नाही. काँग्रेसने संविधान बचावचा नारा देत डॉ. आंबेडकरांचे नाव रोशन करण्याचा प्रयत्न केला. पण प्रत्यक्षात त्यांनी दिलेल्या राज्यघटनेची वारंवार दुरुस्ती करण्यात काँग्रेस पक्षच आघाडीवर राहिलेला बघायला मिळाला. वीर सावरकर हे भारतीय इतिहासातील अलौकिक व्यक्तिमत्त्व होते. पूर्वापार चालत आलेल्या रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, अस्पृश्यता यांच्या विरोधात त्यांनी आवाज उठवला. आधुनिकीकरण, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सैनिकीकरणाचा पुरस्कार त्यांनी केला. समाज प्रबोधनासाठी सावरकरांनी नाटकं लिहिली, लावण्या लिहिल्या आणि पोवाडे-फटकेही लिहिली. अनेक विषयांच्या संस्कृत, मराठी, इंग्रजी ग्रंथांचे तसेच केसरी, काळ, पुणे वैभव अशा वृत्तपत्रांचे ते नियमित वाचन करीत असत. मंगल पांडे, नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, राणाकुंवर सिंह, अझीमुल्ला खान, बहादूरशहा जफर अशा अनेकांनी १८५७ मध्ये जो लढा दिला ते 'शिपायांचे बंड' नव्हतं तर ते एक 'स्वातंत्र्यसमर' होते, असा निष्कर्ष स्वातंत्र्यवीरांनीच काढला आणि त्या उठावाचा साद्यंत इतिहासही लिहिला. तोच ग्रंथ पुढे ऐतिहासिक आणि क्रांतिकारकांची गीता ठरला. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या देशभक्तीचे किती दाखले द्यावे, म्हणजे काँग्रेस त्यांचे मोठेपण मान्य करेल, हे कळायला मार्ग नाही. आज पुन्हा एकदा काँग्रेसने सावरकरांचे छायाचित्र काढण्याचा निर्णय घेऊन, त्यांचे मोठेपण अमान्य केले आहे. तथापि, भविष्यात काँग्रेसला ही खेळी महागात पडल्याशिवाय राहणार नाही. देवाची काठी दिसत नाही मात्र ती लागली की कुठे आपली चूक झाली ते कळते. तशाच प्रकारची काठी काँग्रेसच्या कपाळावर देवाने हाणावी, ही प्रार्थना!

## इतस्तत:

**डॉ. विवेक राजे**

# धर्मवीर डॉ. मुंजे शुद्धीकरण चळवळ

स्वातंत्र्यपूर्व काळात या देशाच्या स्वातंत्र्यासाठी, सैनिकीकरणासाठी हिंदू संघटन तसेच हिंदू धर्मातून बाहेर गेलेल्या लोकांना परत हिंदू धर्मात प्रवेश मिळावा म्हणून ज्या काही थोड्या नेत्यांनी प्रयत्न केले त्यात डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे हे अग्रणी नेते होते. इ. स. १९२१ च्या मोपला मुसलमानांच्या धार्मिक आक्रमणानंतर हिंदू समाज संघटित आणि बलवान व्हावा यासाठी डॉ. बाळकृष्ण मुंजे यांनी शुद्धीकरण म्हणजे 'घरवापसी' तसेच हिंदू संघटन करण्यावर भर द्यायला सुरुवात केली. मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्माचे हिंदू धर्मावर आणि हिंदू संस्कृतीवर आक्रमण होण्याला हिंदू समाजाची दुर्बल मानसिकता आणि विखुरलेपण कारणीभूत आहे. हिंदू समाजाने संघटितपणे बलवान होणे हाच या समस्येचा एकमेव उपाय आहे. त्यासाठी हिंदू समाजाचे कणखर संघटन झाले पाहिजे, असे डॉ. मुंजे नेहमीच हिंदू समाजाला सांगत असत. तसेच हे अस्पृश्यता निवारण केल्याशिवाय शक्य नाही, असेही ते आग्रही प्रतिपादन करीत. मुसलमानांचा द्वेष करण्याऐवजी त्यांना हिंदू धर्मात परत आणले पाहिजे. कारण मुळात जुलूम जबरदस्तीने ते परधर्मात गेलेले हिंदूच आहेत, असे ते सातत्याने सभांमध्ये आपल्या भाषणात सांगत असत.

मलबारातील मोपल्यांच्या धार्मिक आक्रमणानंतर काँग्रेसबरोबर केवळ राजकीय चळवळीत कार्य करीत राहण्यापेक्षा हिंदू महासभेसारख्या सांस्कृतिक आणि सामाजिक संघटनेत राहणे त्यांनी पसंत केले. हिंदू महासभेच्या कामाकडे पूर्ण लक्ष दिल्यामुळे डॉ. मुंजे यांना शुद्धीकरण आणि हिंदू संघटन या दोन्ही गोष्टींवर लक्ष केंद्रित करता आले. ख्रिश्चन प्रलोभनाने तर मुसलमान जबरदस्तीने धर्मांतरे घडवून आणतात म्हणून हिंदूंनीही शुद्धिकार्य घडवले पाहिजे, असा ते प्रचार करीत. शुद्धिकार्याची सुरुवात केल्यावर देशभरातून त्यांना हिंदू महासभा आणि शुद्धिसभांची निमंत्रणे येऊ लागली. त्यामुळे काँग्रेसचे पुढारी महंमद अल्ली यांनी शुद्धिकार्य करणाऱ्यांना जीवे मारले पाहिजे, असे वक्तव्य केले. या वक्तव्याची परिणती स्वामी श्रद्धानंद यांच्या खुनात झाली. डॉ. मुंजे यांना खुनाच्या धमकीची पत्रे नागपूरच्या मुसलमानांनी पाठवली. डॉ. मुंजे यांना वारंवार अशी खुनाच्या धमकीची पत्रे येत राहिली तरी त्यांनी शुद्धीकरण आणि हिंदू संघटनांचे कार्य आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत चालू ठेवले.

शुद्धीकरणाबाबत आपली भूमिका विशद करताना ते म्हणत की, स्वतःच्या योग्य हक्काकरिता झगडणे हे आमचे कर्तव्यच आहे. हिंदू धर्म हा कधीच आक्रमक धर्म प्रसार करणारा नव्हता. खुनाची धमकी दिल्यावरही त्यांचे शुद्धिकार्य धडाडीने चालूच राहिले. त्यामुळे मुसलमानांनी अनेक ठिकाणी आक्रमक पवित्रा घेत दंगे घडवून आणायला सुरुवात केली. या दंगलीसाठी सरकारने मुसलमानांची बाजू घेऊन हिंदूंना दोषी धरले. जुलै १९२६ मध्ये डॉ. मुंजे प्रचारासाठी कोलकात्याला जाणार होते. बंगालमध्ये हिंदू-मुस्लिम दंगे झाल्याने सरकारने डॉ. मुंजेंना कोलकात्यात येण्यास मनाई केली. मात्र, डॉ. मुंजे हा हुकूम मोडून कोलकात्याला गेले. कोलकाता रेल्वे स्टेशनवर मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला. त्यांच्या स्वागताला प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. रेल्वे स्टेशनवरच डॉ. मुंजे यांनी जनसमुदायासमोर मोठे भाषण केले. शासन आदेशाचे उल्लंघन करूनही पोलिसांनी त्यांना पकडले नाही. दोन दिवस कोलकात्यात मुक्काम ठोकून डॉ. मुंजे नागपूरला परतले.



डॉ. मुंजे यांच्या निर्भयपणे प्रचार करण्याच्या हातोटीमुळे त्यांना देशभरातून निमंत्रणे यायला लागली. गुजरातच्या दौऱ्यात ते सुरतला जाणार होते. सुरतच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटने त्यांना सुरत किंवा त्याच्या जवळपास जाहीर सभा घेण्यास मज्जाव केला; तो मोडून डॉ. मुंजे यांनी तेथे जाहीर सभेत भाषण केले. पुढे दिल्ली, दरभंगा, कोलकाता येथील हिंदू महासभेच्या अधिवेशनात शुद्धीकरण, संघटन आणि अस्पृश्यता निवारण याच विषयांवर त्यांनी भाषणे केली. त्यांच्या कार्यामुळे १५ ते १७ एप्रिल १९२७ ला पाटणा येथे झालेल्या अखिल भारतीय हिंदू महासभेच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली. पाटणा शहरात त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. त्यांनी पाटणा येथे आपल्या विस्तृत भाषणात त्या काळातील राजकीय, सामाजिक आणि धार्मिक प्रश्नांचा ऊहापोह केला.

विदर्भ प्रांताची दुसरी हिंदू धर्म परिषद १ व २ जून १९२८ रोजी डॉ. मुंजे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. मुंजे यांनी अस्पृश्यता निवारण आणि शुद्धीकरणावर भर दिला. या भाषणात डॉ. मुंजे यांनी धर्मांतरित अहिंदूंचेसुद्धा शुद्धीकरण करायला सुरुवात केली पाहिजे तसेच शुद्धीकरण ही हिंदूंची जुनीच प्रथा आहे, मध्यंतरी खंड पडल्याने आपल्याला ती नवीन वाटते, अशी आग्रही भूमिका मांडली. या परिषदेत गोवा प्रांतातील शुद्धीकरण चळवळीस पाठिंबा देणे, अहिंदूंचे हिंदूकरण करणे हे ठराव केले गेले तसेच या परिषदेच्या मांडवात पाच धर्मांतरितांना शुद्ध करून परत हिंदू धर्मात घेतले गेले.

इ. स. १९२८ मध्ये गोवा प्रांतात शुद्धीकरणाचे कार्य दडपण्याचा पोर्तुगीज सरकारने प्रयत्न सुरू केला. तेव्हा १९२८ मध्ये जबलपूर येथे भरलेल्या अखिल भारतीय हिंदू महासभेच्या अधिवेशनात ठराव होऊन डॉ. मुंजे आणि न. चिं. केळकर आदी लोकांचे गोव्यात शुद्धीकरण झालेल्या लोकांना मदत करण्यास पाठविले गेले. त्यावेळी डॉ. मुंजे आणि इतरांचा गोव्यात मानपत्र देऊन सत्कार केला गेला. त्यानंतर या शिष्टमंडळाने गोव्याच्या गव्हर्नर जनरलची भेट घेऊन काही अटींवर शुद्धीकरणाला कायदेशीर मान्यता घेतली. पुढे जेव्हा गोलमेज परिषदेनंतर डॉ. मुंजेंनी पोर्तुगालला भेट दिली, तेव्हा यांनी गोव्यातील शुद्धीकरणाच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्न केला.

इ. स. १९३३ मध्ये झालेल्या तिसऱ्या गोलमेज परिषदेला आमंत्रण नसतानाही विलायतेस जाऊन हिंदू महासभेची बाजू मांडायची, असे त्यांनी ठरवले. त्यानुसार डॉ. मुंजे, भाई परमानंद आणि इतरांच्या एका शिष्टमंडळाने इंग्लंडला जाण्याचे ठरवले. गोलमेज परिषदेच्या जॉईंट सिलेक्ट कमिटीपुढे डॉ. मुंजे यांनी १८ जुलै १९३३ ला भाषण केले. तेव्हा हिंदू-मुस्लिम प्रश्नात सरकार पक्षपाती असल्याने दोन समाजातील ऐक्य शक्य नाही, हे त्यांनी निर्भयतेने मांडले.

हिंदू महासभेने ७ आणि ८ ऑक्टोबर १९४४ ला दिल्लीत अखंड हिंदुस्थान परिषद घेतली होती. हिंदुस्थानच्या अखंडत्वाचा ठराव डॉ. मुंजे यांनी मांडला. या देशाला बलशाली हिंदू राष्ट्र करण्याचा ध्यास घेतलेल्या हिंदू तरुणांनी सैनिकी शिक्षणाची कास धरावी म्हणून स्वातंत्र्यपूर्व काळात भोसला मिलिटरी स्कूलची स्थापना करणाऱ्या, अस्पृशांना मंदिर प्रवेश मिळावा, अस्पृश्यता निवारणासाठी आणि परधर्मात गेलेल्या लोकांचे शुद्धीकरण करून त्यांना हिंदू धर्मात परत प्रवेश मिळावा म्हणून आयुष्यभर झटणाऱ्या डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे यांची आज म्हणजे १२ डिसेंबर रोजी १५२ वी जयंती आहे. शुद्धीकरण, घरवापसी, अस्पृश्यता निवारण आणि हिंदू समाज संघटनेचा आयुष्यभर ध्यास घेऊन झटणाऱ्या या देशभक्ताला शतशः प्रणाम!

९८८१२४२२२४

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# अर्ध्यापेक्षा जास्त राज्यांत भाजपाचे मुख्यमंत्री

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतल्यामुळे देशभरात भाजपाच्या मुख्यमंत्र्यांची संख्या १४ झाली आहे. भाजपाच्या मित्रपक्षांचे म्हणजे रालोआतील घटक पक्षांचे मुख्यमंत्री पकडले तर ही संख्या २० होते. देशात २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेश आहेत. देशात आतापर्यंत २९ राज्ये आणि ७ केंद्रशासित प्रदेश होते, पण जम्मू-काश्मीरचा राज्याचा दर्जा काढून त्याला केंद्रशासित केल्यामुळे एक राज्य कमी झाले. यातील ३१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशात मुख्यमंत्री आहेत. ३१ मुख्यमंत्र्यांत भाजपासह रालोआच्या मुख्यमंत्र्यांची संख्या २० होते, म्हणजे देशातील दोन तृतीयांश राज्यांत मुख्यमंत्री भाजपा आणि मित्रपक्षांचे आहेत. फक्त राज्यांचा विचार केला तर देशातील अर्ध्या म्हणजे २८ पैकी १४ राज्यांत आता भाजपाचे मुख्यमंत्री आहेत.

गोवा, आसाम, ओडिशा, त्रिपुरा, हरयाणा, गुजरात, राजस्थान, मणिपूर, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगड, उत्तराखंड, उत्तरप्रदेश आणि अरुणाचल प्रदेश अशा १४ राज्यांत भाजपाचे मुख्यमंत्री आहेत. बिहार, सिक्कीम, मेघालय, मिझोरम, नागालॅण्ड आणि आंध्र प्रदेशात भाजपाच्या मित्रपक्षांचे मुख्यमंत्री आहेत.

महाराष्ट्रात कोणाच्याही मंत्रिमंडळात आधी मंत्री न राहता फडणवीस हे थेट मुख्यमंत्री झाले, असे करत त्यांनी नरेंद्र मोदी यांची बरोबरी केली. मोदीही गुजरातचे थेट मुख्यमंत्री झाले. त्याआधी ते गुजरातमध्ये कोणाच्याही मंत्रिमंडळात मंत्री काय, साधे आमदारही नव्हते. गुजरातच्या मुख्यमंत्रिपदासारखे मोदी राष्ट्रीय राजकारणात आले आणि थेट पंतप्रधानच झाले. पंतप्रधान होण्याआधी मोदी कधी खासदारही झाले नव्हते. त्यामुळे त्यांनी केंद्रात मंत्री होण्याचा प्रश्नच नव्हता. नंतर मोदी यांच्यामुळे अनेक जणांना मंत्री न राहता थेट राज्याचे मुख्यमंत्रिपद भूषविण्याची संधी मिळाली.

देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी तिसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. २०१४ मध्ये फडणवीस पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले. २०१९ मध्ये त्यांनी दुसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली; पण यावेळी त्यांचा कार्यकाळ सर्वांत छोटा होता. मुख्यमंत्रिपदाचा पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणारे फडणवीस हे महाराष्ट्राचे आतापर्यंतचे दुसरे मुख्यमंत्री होते.

गोव्यात डॉ. प्रमोद सावंत, आसाममध्ये हेमंता बिस्व सरमा, ओडिशात मोहनचरण मांझी, त्रिपुरात माणिक साहा, हरयाणात नायबसिंह सैनी, गुजरातमध्ये भूपेंद्र पटेल, राजस्थानात भजनलाल शर्मा, मणिपूरमध्ये बीरेनसिंह, महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस, मध्यप्रदेशात मोहन यादव, छत्तीसगडमध्ये विष्णुदेव साय, उत्तराखंडमध्ये पुष्करसिंह धामी, उत्तरप्रदेशात योगी आदित्यनाथ आणि अरुणाचल प्रदेशमध्ये पेमा खांडू भाजपाचे मुख्यमंत्री आहेत.

गेल्या अनेक वर्षांपासून बिजू जनता दलाच्या ताब्यात असलेले ओडिशा राज्य भाजपाने नुकतेच जिंकले आहे. नवीन पटनायक प्रदीर्घ काळापासून ओडिशाचे मुख्यमंत्री होते. राजस्थान आणि मध्यप्रदेशात भाजपाने नव्या चेहऱ्यांना मुख्यमंत्रिपदाची संधी दिली आहे. यामुळे राजस्थानात भजनलाल शर्मा आणि मध्यप्रदेशात मोहन यादव यांना मुख्यमंत्रिपदाची लॉटरी लागली, असे म्हणायला हरकत नाही. राज्यात मंत्रिपद न भूषवताच हे नेते थेट मुख्यमंत्री झाले. बिहारमध्ये भाजपाचा मित्रपक्ष असलेल्या जदयूचे नितीशकुमार, आंध्र प्रदेशात तेलगू देसमचे चंद्राबाबू नायडू, सिक्कीममध्ये सिक्कीम क्रांतिकारी मोर्चाचे प्रेमसिंग तमांग, मेघालयात नॅशनल पीपल्स पार्टीचे कॉनरॉड संगमा, मिझोरममध्ये झोराम पीपल्स मुव्हमेंटचे पी. यु. लालडुहोमा आणि नागालॅण्डमध्ये नॅशनलिस्ट डेमोक्रटिक प्रोग्रसिव्ह पार्टीचे नियुफियु रियु हे नेते मुख्यमंत्री आहेत.

देशातील फक्त तीन राज्यांत सध्या काँग्रेसचे मुख्यमंत्री आहेत, कर्नाटकात सिद्धरामय्या, तेलंगणात ए. रेवंत रेड्डी आणि हिमाचल प्रदेशमध्ये सुखविंदसिंग सुक्खू हे काँग्रेसचे मुख्यमंत्री आहेत. दिल्ली आणि पंजाब या दोन राज्यांत आम आदमी पक्षाचे म्हणजे आपचे मुख्यमंत्री आहेत. दिल्लीत आपच्या आतिशी तर पंजाबमध्ये भगवंत मान मुख्यमंत्री आहेत. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी, तामिळनाडूत द्रमुकचे एम. के. स्टॅलिन आणि झारखंडमध्ये झारखंड मुक्ती मोर्चाचे हेमंत सोरेन हे मुख्यमंत्री आहेत. जम्मू-काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्सचे उमर □अब्दुल्ला मुख्यमंत्रिपद सांभाळत आहेत. केरळमध्ये डाव्या आघाडीचे पिनाराई विजयन् तसेच पुद्दुचेरीत ऑल इंडिया एन. आर. काँग्रेसचे एन. रंगास्वामी मुख्यमंत्री आहेत.

देशात फक्त दोनच राज्यांत महिला मुख्यमंत्री आहेत, यात पश्चिम बंगालच्या ममता बॅनर्जी आणि दिल्लीच्या मार्लिना आतिशी यांचा समावेश आहे. देशातील सर्व विद्यमान मुख्यमंत्र्यांत ममता बॅनर्जी या सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिल्या आहेत. मुख्यमंत्रिपदाची १३ वर्षे त्यांनी पूर्ण केली आहेत. केरळचे ७९ वर्षीय पिनाराई विजयन् हे देशातील सर्वांत जास्त वयाचे मुख्यमंत्री आहेत. बिहारचे मुख्यमंत्री आणि जदयू नेते नितीशकुमार देशात सर्वाधिक वेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणारे एकमेव मुख्यमंत्री आहेत. नितीशकुमार यांनी सर्वाधिक म्हणजे नऊ वेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे.

ममता बॅनर्जी यांच्या खालोखाल नितीशकुमार मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीत दुसऱ्या स्थानावर आहेत. नितीशकुमार यांच्या मुख्यमंत्रिपदाची १० वर्षे पूर्ण होत आहेत. नितीशकुमार यांच्या मुख्यमंत्रिपदाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी बिहारमध्ये परस्परविरोधी विचाराच्या आघाड्यांचे मुख्यमंत्रिपद भूषविले आहे. तिसऱ्या स्थानावर केरळचे पी. विजयन् आठ वर्षांपेक्षा जास्त काळापासून मुख्यमंत्री आहेत. गोरखपूर पीठाचे महंत योगी आदित्यनाथ भगवे वस्त्रधारी देशातील एकमेव मुख्यमंत्री आहेत.

२०१४ च्या आधी हाताच्या बोटावर मोजता येतील एवढ्या मोजक्या राज्यात भाजपाची सरकारे होती. यात प्रामुख्याने गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश आणि उत्तरप्रदेशचा समावेश असायचा. आज भाजपाने जवळपास संपूर्ण देश पादाक्रांत केल्यासारखे दिसते. कधीकाळी देशातील बहुतांश राज्यात काँग्रेसचीच सरकारे होती. अपवाद फक्त तामिळनाडू आणि पश्चिम बंगालचा होता. तेव्हा तामिळनाडूत कधी द्रमुक तर कधी अण्णाद्रमुकचे सरकार असायचे तर पश्चिम बंगालमध्ये डाव्या पक्षांचे म्हणजे माकपचे. आज देशातील फक्त तीन राज्यांत काँग्रेसचे मुख्यमंत्री आहेत. म्हणजे काँग्रेस पक्षाची स्थिती तीन सवारीच्या ऑटोरिक्षासारखी झाली, असे म्हणायला हरकत नाही. तर, भाजपा २० आसनी टेम्पो ट्रॅव्हलरसारखा झाला आहे. भाजपाच्या दृष्टीने ही गौरवाची बाब म्हटली पाहिजे. भाजपावर मनापासून प्रेम करणाऱ्यांची कॉलर ताठ होण्याचा आणि मान अभिमानाने उंचावण्याचा हा क्षण आहे.

९८८१७१७८१७

## वेध

**विजय कुळकर्णी**

# जातीयवाद मोडून झालेली विधानसभा निवडणूक!

महाराष्ट्र विधानसभा २०२४ ची निवडणूक झाली. निकाल जाहीर झाले. महायुतीला मतदारांनी पुन्हा सत्ता स्थापनेचा प्रचंड जनादेश दिला. ५ डिसेंबरला महायुती सरकारचा शपथविधी झाला. पण, महाविकास आघाडी अजूनही या निवडणुकीत झालेल्या पराभवाच्या महाधक्क्यातून बाहेर आलेली नाही. आपल्या पराभवाची नेमकी कोणती कारणे आहेत? आपण सहा महिन्यांपूर्वीच झालेल्या लोकसभा निवडणुकीत मिळविलेल्या यशानंतर विधानसभा निवडणुकीत एवढा मोठा पराभव कसा काय झाला? या प्रश्नाचे उत्तर त्यांना सापडत नाही किंवा ते शोधण्याचा प्रयत्नच करीत नसावेत. त्यामुळे महाविकास आघाडीचे नेते आता ईव्हीएमला दोष देत आहेत.

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने भाजपा भटजी शेठजीचा पक्ष आहे. हा पक्ष पुन्हा सत्तेत आल्यास आरक्षण संपवेल. देशाची घटना बदलविण्याचा यांचा अजेंडा आहे इत्यादी खोटे नॅरेटिव्ह मोठ्या प्रमाणात पसरविले होते. मराठा-मराठेतर वादाचेही भांडवल केले होते. त्याला काटशह देण्यात भाजपा आणि रालोआ कमी पडले. तसेच, मतदारांनी देखील भाजपाचे सरकार पुन्हा सत्तेत येणार आहेच, असा विश्वास बाळगून मतदानापेक्षा आपल्याकडील व आपल्या नातेवाईकांकडील लग्न समारंभ व इतर कामांना अधिक महत्त्व दिले होते. त्यामुळे मतदानाची टक्केवारी घसरली होती. त्यामुळेही भाजपा आणि रालोआला लोकसभेत फटका बसला होता. मात्र, या अनुभवातून भाजपा आणि महायुतीने धडा शिकून विधानसभा निवडणुकीत या सर्व चुका सुधारण्यावर भर दिला. लोकसभेत झालेल्या व्होट जिहादला देखील काटशह देण्याची जोरदार तयारी करण्यात आली. मतदानाची टक्केवारी कशी वाढेल याकडे विशेष लक्ष देण्यात आले. त्यानुसार महायुतीतील सर्व पक्षांचे नेते आणि कार्यकर्ते कामाला लागले होते. सरकारचा कार्यकाळ संपण्यापूर्वी मुख्यमंत्री लाडकी बहीण, शेतकऱ्यांना कृषिपंपाचे वीज देयक माफ करणे, शेतकऱ्यांना पंतप्रधान किसान सन्मान निधी देणे, सर्वच जाती धर्मातील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ पोहोचविणे, यामुळे महायुती शासनाबद्दल जनतेच्या मनात सकारात्मक विचार निर्माण झाला होता. तसेच, वर्ष दीड वर्षात मनोज जरांगेंच्या नेतृत्वात पेटविण्यात आलेले मराठा आरक्षण आंदोलन निवडणूक काळात थंड करण्यात महायुतीला यश आले. विशेषत: मराठा आरक्षण आंदोलनामुळे मराठा व मराठेतर हा वाद निर्माण झाला होता. मात्र, निवडणूक प्रचारात भाजपा आणि देवेंद्र फडणवीस यांनी मराठा विरुद्ध ब्राह्मण, मराठा विरुद्ध मराठेतर हा वाद मोडून काढण्यात यश मिळविले. आपण कसे मराठ्यांना आरक्षण दिले व न्यायालयात टिकविले होते. मात्र महाविकास आघाडीला न्यायालयात ते कसे टिकविता आले नाही, हे मतदारांना पटवून देण्यात त्यांना यश आले. तसेच, शहरातच नव्हे तर, ग्रामीण भागात सर्व जाती धर्मातील मतदारांना कोणत्या ना कोणत्या शासकीय योजनेचा लाभ मिळाला आहे. अनेक आमदारांनी बुद्ध विहारांना कोट्यवधींचा निधी दिल्यामुळे आंबेडकरी जनतेच्या मनात असलेला भाजपाविषयीचा गैरसमज दूर झाला होता. त्यामुळे कधी नव्हे ते आंबेडकरी जनतेने देखील महायुतीच्या पारड्यात मते टाकल्याचे आता आंबेडकरी जनताच सांगत आहे. त्यामुळे या समाजाची मते महायुती, महाविकास आघाडी आणि वंचित बहुजन आघाडी, अशा तीन ठिकाणी विभागल्या गेली. त्याचाही फायदा महायुतीला झाला. तर, आमदार गोपीचंद पडळकर यांनी परवा मारकडवाडी येथील जाहीर सभेत बोलताना महाविकास आघाडीतील प्रस्थापितांना संपविण्यासाठी आता देवाभाऊ आला आहे. त्यामुळेच आम्हला आज ही पदे आणि आमदरकी मिळाल्याचे ठासून सांगितले. याचा अर्थ या निवडणुकीपर्यंत महाराष्ट्रातील प्रस्थापितांनी कशाप्रकारे समाजातील कमजोर घटकातील नेतृत्वाला दाबून ठेवले होते, ते लक्षात येते. पण, महायुती आणि देवाभाऊंनी त्या उपेक्षितांना सत्तेची फळे चाखायला दिली. त्याचा परिणाम म्हणून या निवडणुकीत गावगाड्यातील जातिपातीच्या राजकारणाला थारा न देता मतदारांनी विकासाला मतदान केले आणि राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार प्रचंड मताधिक्क्याने स्थापन केले.



८८०६००६१४९

## वाचक पत्रे

### किती काळजी आहे शासनास जनतेच्या प्राणाची?

मोटारवाहन कायदा १९८८, कलम १२८ व १२९ मध्ये समाविष्ट तरतुदीनुसार दुचाकी चालविणाऱ्यास व त्याच्या मागच्या सीटवर बसणाऱ्या व्यक्तीलाही सुरक्षे (?) च्या दृष्टीने हेल्मेट घालणे आवश्यक आहे, असा सक्तीचा आदेश नागपूरसह राज्यात पुन्हा देण्यात आला आहे. यासाठी '२०२३' च्या रस्ते अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या देण्यात आली. 'वा! किती काळजी आहे म्हणावी सरकारला राज्यातील जनतेच्या जिवाची. नागपूरपासून काही किमी. दूर अंतरावर शाळेच्या विद्यार्थ्यांची सहल बस उलटली. त्यात एका कोवळ्या वयाच्या विद्यार्थिनीचा जीव गेला व ३० च्या वर विद्यार्थी जखमी झालेत. गोंदिया मार्गावर 'शिवशाही'ला भीषण अपघात होऊन त्यात १३ लोक दगावले. त्यापूर्वी दोन दिवस आधी यवतमाळ मार्गावरही अपघात झाला. समृद्धी महामार्गावर होणाऱ्या सततच्या अपघाताकडे शासनाचे किती लक्ष आहे? की आता या व इतरही माहामार्गावर अपघात होतात म्हणून बस प्रवाशांना, चारचाकीमध्ये बसणाऱ्यांनाही 'हेल्मेटसक्ती' करणार आहात? केवळ कायद्याचा धाक दाखवून शासन करता येत नाही, तर संबंधित कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्याच्या जनतेचा प्रत्यक्ष सहभागही महत्त्वाचा असतो. दोन वर्षांपूर्वी समृद्धी महामार्गावर खाजगी बसच्या अपघातात २६ प्रवासी होरपळून मेले. त्यांचे शरीरही ओळखता आले नाही. यासाठी दोषी असणाऱ्यांचे काय झाले?

**गजेंद्र डोळके**/८०१०६०३७८९

### बांगलादेशला त्याची जागा दाखवून द्या

मागील काही महिन्यांत बांगलादेशात हिंदूंवरील हल्ल्यांच्या ३०० घटना घडल्या आहेत. यात काही नागरिकांना जीव गमवावा लागला आहे. हिंदूंच्या मंदिरांवर आणि घरांवर जाणीवपूर्वक हल्ले केले जात आहेत. हिंदूंनी बांगलादेश सोडून जावे असे जाहीरपणे इशारे दिले जात आहेत. या कट्टरपंथीय हल्लेखोरांना रोखण्यात तेथील डॉ. मोहम्मद युनूस यांचे सरकार अपयशी ठरत आहे किंबहुना या हल्लेखोरांना तेच पाठीशी घालत आहेत. बांगलादेशातील अल्पसंख्यक हिंदूंचे संरक्षण करणे हे तेथील सरकारचे कर्तव्यच आहे मात्र आपले कर्तव्य विसरून तेथील सरकार कट्टरपंथीयांना मोकळीक देत आहे. इतकेच नाही तर बांगलादेशात भारतविरोधी वातावरण निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न करत आहे. डॉ. मोहम्मद युनूस हे नोबेल पारितोषिक विजेते आहेत. त्यांच्याकडून न्याय आणि समानतेची अपेक्षा होती मात्र आता ती अपेक्षा फोल ठरली. बांगलादेश नॅशनलिस्ट पक्षाच्या नेत्याने आपल्या पत्नीची साडी जाळून भारतीय मालावर बहिष्कार घालण्याचे आवाहन केले. इतकेच नाही तर प्रसार माध्यमांवर देखील बंदी घालण्याचे आवाहन केले. भारताने देखील या प्रकरणात बघ्याची भूमिका सोडून एहसान फरामोश बांगलादेशला त्यांची जागा दाखवून द्यावी.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### शिक्षकांची कधी होणार अशैक्षणिक कामातून मुक्तता

शाळा आणि महाविद्यालयांमध्ये शासनाद्वारे विविध उपक्रम राबवले जातात, जे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असतात. सरकारी शाळांमध्ये दिले जाणारे मध्यान्ह भोजन, सर्व शिक्षा अभियान, डिजिटल शाळा अशा विविध शैक्षणिक उपक्रमांचा समावेश आहे. या उपक्रमांचा उद्देश गरीब आणि वंचित वर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामील करून त्यांना याचा जास्तीत जास्त लाभ मिळावा, असा शासनाचा हेतू आहे. परंतु, नाण्याची दुसरी बाजू लक्षात घेतल्यास असे दिसते की, याच शाळांमधील शिक्षकांवर या अतिरिक्त कामांचा मोठ्या प्रमाणात ताण येतो. निवडणुकांमध्ये मतदान अधिकारी किंवा पर्यवेक्षक म्हणून काम करणे, जनगणना आणि इतर सरकारी सर्वेक्षणांमध्ये सहभाग घेणे, मतदार ओळखपत्र तयार करण्यासाठी माहिती गोळा करणे, लोकसंख्येची माहिती गोळा करणे, पाळीव प्राणी जनगणना आणि इतर अशा कितीतरी अतिरिक्त कामांत शिक्षक गुंतलेले असतात. आता या यादीत अजून एका कामाची भर पडली आहे, ती म्हणजे विद्यार्थ्यांची अपार आयडी तयार करणे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा लिखित मागोवा घेण्यासाठी आणि त्यांची शैक्षणिक नोंद सुरक्षित ठेवण्यासाठी निश्चितच ही आयडी उपयुक्त आहे. मात्र, शिक्षकांकडून हे काम करून घेणे कितपत योग्य आहे, याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा. विशेषतः ग्रामीण भागातील शाळांचा विचार केला तर, तेथे तांत्रिक अडचणी आणि आवश्यक संसाधनांची कमतरता यांचा मोठ्या प्रमाणात सामना करावा लागतो. या अतिरिक्त जबाबदाऱ्यांमुळे शिक्षकांवर मानसिक आणि शारीरिक ताण येतो, ज्याचा त्यांच्या कार्यक्षमतेवर थेट परिणाम होतो. शिक्षकांचा बहुमूल्य वेळ अशा कामांमध्ये गेला तर विद्यार्थ्यांना शिकवणे आणि घडवणे या त्यांच्या मुख्य जबाबदाऱ्यांवर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे अशा कामांसाठी सहायक कर्मचाऱ्यांची नेमणूक केली पाहिजे. यामुळे अनेकांना रोजगार मिळेल आणि शिक्षकांना त्यांचे अध्यापन कार्य निर्विघ्नपणे पार पाडता येईल आणि विद्यार्थ्यांच्या खऱ्या अर्थाने शिक्षणाचा दर्जा सुधारेल.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# मध्य रेल्वेकडून ५१ लाख ७३ हजार टन मालवाहतुकीची नोंद

## नोव्हेंबर महिन्यात दररोज ३४६ गाड्यांची अदलाबदल

## मालगाड्यांचा सरासरी वेग १२.६ किमी प्रतितास वरून १४.६ पर्यंत वाढला



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर. दि. ११ डिसेंबर -**

मध्य रेल्वेने या आर्थिक वर्षात आतापर्यंत ५१ लाख ७३ हजार दशलक्ष टन इतकी प्रभावी मालवाहतूक केली आहे. ज्यामध्ये नोव्हेंबर महिन्यातील ६ लाख ७२ हजार दशलक्ष टन मालवाहतुकीचा समाविष्ट आहे.

मध्य रेल्वेने अन्नधान्य, साखर, कंटेनर आणि पेट्रोलियम उत्पादने यांसारख्या वस्तूंच्या लोडिंग क्षेत्रात कामगिरी सुधारली आहे. ज्यामुळे मागील वर्षीच्या याच महिन्याच्या तुलनेत वाढीव लोडिंगचे उद्दिष्ठ साध्य करता आले आहे. नोव्हेंबर २०२४ मध्ये दररोज एकूण ३४६ गाड्यांची अदलाबदल करण्यात आली आहे. मागील वर्षी याच कालावधीत ३३४ गाड्यांची दररोज अदलाबदल करण्यात आली होती. यामध्ये ३.५९% ची वाढ नोंदवली गेली. तसेच मालगाड्यांचा सरासरी वेग १२.६ किमी प्रतितास वरून १४.६% पर्यंत वाढला. ज्यामध्ये १५% ची सुधारणा आहे. मध्य रेल्वे आपली कामगिरी सुधारण्यासाठी सतत प्रयत्नशील असते आणि आपले यश अधिक चांगले करण्याचा प्रयत्न करत असल्याचे रेल्वे विभागाकडून सांगण्यात आले.

### मध्य रेल्वेने नोव्हेंबर महिन्यात केलेली लोडिंगची नोंद

* नोव्हेंबर -२०२४ मध्ये ८४ रेक्स अन्नधान्याचे लोड केले गेले, तर नोव्हेंबर-२०२३ मध्ये ३६ रेक होते, ज्यामध्ये १३३.३% ची प्रभावी वाढ आहे.
* नोव्हेंबर -२०२३ मधील ३१ रेकच्या तुलनेत नोव्हेंबर-२०२४ मध्ये साखरेचे ३८ रेक लोड करण्यात आले, ज्यामध्ये २२.६% ची वाढ झाली आहे.
* नोव्हेंबर -२०२४ मध्ये कंटेनरच्या ७७१ रेकची लोडिंग नोव्हेंबर-२०२३ मधील ७१८ रेकच्या तुलनेत, ७.४% ची वाढ नोंदवली गेली.
* नोव्हेंबर -२०२४ मध्ये पेट्रोलियम उत्पादनांचे १९४ रेक नोंदवले गेले, जे नोव्हेंबर-२०२३ मध्ये १८५ रेक होते, यामध्ये ४.७% ची वाढ नोंदवली गेली.

# काँग्रेस तालुकाध्यक्षपदाचा शंकर म्हेत्रेंनी दिला राजीनामा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि.११ डिसेंबर**

काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांच्या मनमानी कारभाराला कंटाळून आणि यंदाच्या विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारून तालुकाध्यक्षपदाचा राजीनामा सोमवारी जिल्हा काँग्रेस भवन सोलापूर येथून प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे पाठविल्याचे शंकर म्हेत्रे यांनी सांगितले.



यावेळी शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे, माजी उपसभापती सिद्धार्थ गायकवाड, सलगरचे उपसरपंच काशिनाथ कुंभार, शाकीर पटेल, विनीत पाटील, नागराज पाटील, रमेश चव्हाण, लक्ष्मण चितळे आदींची उपस्थिती होती. अनेक वर्षापासून मतदारसंघात एक निष्ठेने काम करणारे म्हेत्रे घराणा आज काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांना कंटाळले आहेत. याचे कारणही तसेच आहे. गेल्या अनेक वर्षापासून पक्ष फंडाची अपेक्षा न करता केवळ जनसेवा म्हणून स्वखर्चाने मतदारसंघ सांभाळणारे शंकर म्हेत्रे हे आज काँग्रेस वरिष्ठांच्या मनमानी कारभारामुळे तालुका अध्यक्ष पदाचा राजीनामा देत असल्याने तालुक्यात खळबळ माजली आहे. आजपर्यंत जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, विधानसभा, नगरपालिका, लोकसभा, बाजार समिती, सेवा सोसायटी अशा कुठल्याही निवडणुका असल्या तरी नेहमीच शंकर म्हेत्रे हे स्वखर्चाने निवडणुकीचा भार ते सोसत असत. आजपर्यंत स्वतःच्या बळावर ते निवडणुका लढवत आले आहेत.

## संक्षिप्त वृत्त

### सिध्देश्वर कॉलनीतून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर -**

होटगी रोडवरील सिध्देश्वर कॉलनीतून चोरट्याने १५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत श्रीशैल विठ्ठल सातपुते (वय ५१) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ८ डिसेंबर रोजी श्रीशैल सातपुते यांनी त्यांची एमएच १३ डीजे ८२६७ क्रमांकाची दुचाकी ही घरासमोर पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद एमआयडीसी पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस नाईक गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

### समृध्दी ग्रीन्समधून लाखाची बुलेट चोरीस

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर -**

शहरातील उमा नगरी येथील समृध्दी ग्रीन्स या अपार्टमेंटच्या पार्किंगमधील १ लाख रुपयांची बुलेट दुचाकी चोरट्याने चोरून नेली. याबाबत शिवाजी विश्वास शिंदे (वय ५१) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिवाजी शिंदे यांनी ९ डिसेंबर रोजी रात्री त्यांची एमएच ०९ ईबी ४९१७ क्रमांकाची दुचाकी ही अपार्टमेंटच्या पार्किंगमध्ये पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस हवालदार चुंगे पुढील तपास करीत आहेत.

### बैलाने आपटल्याने वृध्द शेतकरी जखमी

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर -**

बैलाने उचलून आपटल्याने मैंदर्गी (ता. अक्कलकोट) येथे वृध्द शेतकरी जखमी झाला. शिवशरण म्हांतप्पा विभुते (वय ६०) असे जखमी शेतकऱ्याचे नाव आहे. ११ डिसेंबर रोजी सकाळी ११ च्या सुमारा शिवशरण विभुते हे शेतात बैलास पाणी जात होते. त्यावेळी बैलाने शिवशरण यांना उचलून आपटले. त्यामध्ये शिवशरण यांच्या सर्वांगास मुका मार लागल्याने त्यांना मुलगा चंद्रकांत विभुते यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### वाहनाच्या धडकेत अनोळखी व्यक्तीचा मृत्यू

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर -**

अक्कलकोट ते वागदरी रस्त्यावरील किणीमोड तांडा येथे अज्ञात वाहनाच्या धडकेने अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाला. ही घटना ११ डिसेंबर रोजी ८ च्या सुमारास घडली. अक्कलकोट ते वागदरी या रस्त्यावरील किणीमोड तांडा येथे अज्ञात वाहनाने बुधवारी सकाळी आठच्या सुमारास धडक दिल्याने ५० वर्षीय अनोळखी व्यक्ती गंभीर जखमी अवस्थेत मिळून आला. त्यामुळे त्या जखमीस अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार जी एस राठोड यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी उपचारादरम्याने त्या अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे डॉ. दुशाल गाडेकर यांनी घोषित केले. याबाबत सिव्हिल पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### अंगावरील शॉल पेटल्याने वृध्द जखमी

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर -**

पानगाव (ता. बार्शी) येथे घरी पाणी चुलीवर गरम करताना अचानक अंगावरील शॉलने पेट घेतल्याने वृध्द जखमी झाला. भागवत सूर्यभान निंबाळकर (वय ८३) असे जखमी वृध्दाचे नाव आहे. ११ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ च्या सुमारास घरी भागवत निंबाळकर हे चुलीवर पाणी गरम करीत होते. त्यावेळी अचानक अंगावरील शॉलने पेट घेतल्याने त्यामध्ये निंबाळकर हे भाजून गंभीर जखमी झाले. जखमी अवस्थेत निंबाळकर यांना नातू संतोष गायकवाड यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल के. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### तरूणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर -**

अज्ञात कारणावरून पिराची कोरवली (ता. पंढरपूर) येथे विषारी औषध प्राशन करून तरूणाने आत्महत्येचा प्रयत्न केला. अनिल सदाशिव नाईकनवरे (वय २५) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्याचे नाव आहे. १० डिसेंबर रोजी रात्री राहत्या घरी अज्ञात कारणावरून अनिल नाईकनवरे याने पिकावर फवारण्याचे विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे अनिल यास त्रास होऊ लागल्याने त्यास उपचारासाठी भाऊ गणेश यांनी पंढरपूर येथील रुग्णालयातून सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### वैराग येथे तरूणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर -**

वैराग (ता. बार्शी) येथे तरूणाने गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. अभिजित रामभाऊ पतंगे (वय ३१) असे आत्मह्येचा प्रयत्न करणाऱ्याचे नाव आहे. १० डिसेंबर रोजी राहत्या घरी अज्ञात कारणावरून अभिजित पतंगे याने कापडी रेबीनच्या सहाय्याने रुममधील लोखंडी बारला गळफास घेण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्याच्या गळयास त्रास होत असल्याने त्यास भाऊ नामदेव पतंगे यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### मार्कंडेय हॉस्पीटलसमोरून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर -**

शहरातील मार्कंडेय हॉस्पीटलसमोरून चोरट्याने ८० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबत अनिल अंबाजी साकीनाल (वय ५१, रा. नवीन घरकुल, कुंभारी रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनिल साकीनाल यांनी ६ डिसेंबर रोजी सायंकाळी त्यांची एमएच १३ ईडी ६६०८ क्रमांकाची दुचाकी ही मार्कंडेय हॉस्पीटलसमोरील शिवभोजन समोर रस्त्यावर हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जेलरोड पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार गंगावणे पुढील तपास करीत आहेत.

### अमोल देशपांडे यांचे निधन

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**



अमोल अशोक देशपांडे (वय ३६, रा. बॉम्बे पार्क, जुळे सोलापूर, सोलापूर) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, भावजय, पत्नी, मुलगा आहेत. अमोल यांचे अवयवदान करण्यात आले. त्यांच्यावर मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. 'लोकमत'चे सेवानिवृत्त कर्मचारी अशोक देशपांडे यांचे ते चिरंजीव होत.

# कॉन्ट्रॅक्टरचे घर फोडून ३ लाखांची रोकड लंपास

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर -**

शहरातील महेश थोबडे नगरातील कॉन्ट्रॅक्टरचे बंद घर फोडून चोरट्याने ३ लाखांची रोकड चोरून नेली.




याबाबत अक्षयकुमार ज्ञानेश्वर अंजीखाने (वय ३०) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंजीखाने हे कॉन्ट्रॅक्टर आहेत. १० डिसेंबर रोजी अंजीखाने हे घराला कुलूप लावून परगावी गेले होते. ते ११ डिसेंबर रोजी पहाटे परत घरी आले असता त्यांना घरामध्ये चोरी झालेले दिसून आले. चोरट्याने अंजीखाने यांच्या बंद घराचे कुलूप तोडून घरामध्ये प्रवेश करून घरातील हॉलमध्ये ठेवलेल्या लोखंडी कपाटाचे कुलूप तोडून कपाटातील लॉकरमध्ये ठेवलेली ३ लाख रुपयांची रोकड चोरून नेली. त्यामुळे याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाआहे. सहायक पोलिस निरीक्षक महाडीक पुढील तपास करीत आहेत.

# जुनी पोलिस लाईन येथील श्री स्वामी समर्थ मंदीरात विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर -**

शहरातील मुरारजी पेठ परिसरातील जुनी पोलिस लाईन येथील श्री स्वामी समर्थ मंदीर येथे श्री दत्त जयंतीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १४ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता गुलालाचा कार्यक्रम होणार असल्याचे श्री स्वामी समर्थ समाजसेवी न्यासाच्यावतीने सांगण्यात आले आहे.



दरवर्षीप्रमाणे जुनी पोलिस लाईन येथील श्री स्वामी समर्थ मंदीर येथे शनिवार, दि. १४ नोव्हेंबररोजी श्री दत्त महाराज जयंती सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. दुपारी भजन, सायंकाळी ह. भ. प. पंकज महाराज गुंड (डोणगाव) यांचे प्रवचन होणार असून सायंकाळी ७ वाजता आ. विजयकुमार देशमुख, आ. सुभाष देशमुख, आ. देवेंद्र कोठे, आ. राजाभाऊ खरे यांच्या उपस्थितीत गुलालाचा कार्यक्रम होऊन महाआरती होणार आहे. याप्रसंगी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, रायगडचे सह. जिल्हाधिकारी भारत वाघमारे, नेत्ररोग तज्ञ डॉ. शुभ्रा अग्रवाल, माजी नगरसेवक अमोल शिंदे, मंदाकिनी पवार, अंजली चौगुले, अभिजित ढोबळे, किरण पवार, गजानन देशपांडे, सचिन तळेकर आदी उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यक्रमास भक्तांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मंदीराचे संस्थापक गोरखनाथ डोंगरे आणि श्री स्वामी समर्थ समाजसेवी न्यासाच्या वतीने करण्यात आले आहे.

# मंगळवेढ्याच्या निवासी नायब तहसिलदारपदी शुभांगी जाधव

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ११ डिसेंबर-**

मंगळवेढ्याच्या निवासी नायब तहसिलदारपदी शुभांगी जाधव यांची नियुक्ती नुकतीच झाली असून त्यांनी आपल्या पदाचा भार स्वीकारला असून गोरगरीब लोकांच्या कामांना आपण अधिक प्राधान्य देणार असल्याचे त्यांनी सांगितले.



मंगळवेढयाचे तत्कालीन निवासी नायब तहसिलदार चंद्रकांत हेडगिरे यांची बदली मागील दोन महिन्यांपूर्वी सोलापूरला झाल्याने त्यांच्या रिक्त जागेवर सांगोला येथून शुभांगी जाधव या आल्या आहेत. त्यांनी दक्षिण सोलापूर व सांगोला येथे काम केले आहे. जाधव यांनी कार्यभार स्वीकारताच येथील अडीअडचणी जाणून घेतल्या. महसूल कर्मचारी संघटनेने त्यांचे स्वागत केले.

# दत्त जयंतीनिमित्त गौडगाव जागृत मारूती मंदिरात धार्मिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ११ डिसेंबर-**

दत्त जयंती निमित्त गौडगांव बु।।(ता.अक्कलकोट) येथील दक्षिण मुखी श्री जागृत मारुती मंदिरात धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून १०१ दिवे प्रज्वलित केले जाणार आहे.तरी मारुती भक्तांनी दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन गौडगाव मारुती ट्रस्टचे अध्यक्ष श्रीकांत खानापुरे यांनी केले आहे.

१४ डिसेंबर २०२४ रोजी दत्त जयंती तर पौर्णिमा सायंकाळी ४ वाजेनंतर सुरू होत आहे. मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी मृग नक्षत्रावर सायंकाळी दत्ताचा जन्म झाला, म्हणून त्या दिवशी दत्ताचा जन्मोत्सव साजरा केला जातो.दत्त जयंतीच्या निमित्ताने मारूतीस महारूद्राभिषेक, अभषेक, नवग्रह पूजा, शनिपूजा व होमहवन केल्यास मनातील इच्छा, आकांक्षा,मनोकामना पूर्ण होतो अशी भाविकांची जुनी श्रद्धा आहे.दत्त जयंतीनिमित्त विविध प्रांतातील भाविक भक्तानी मोठ्या संख्येने गौडगाव येथे दाखल होणार आहे. १३ डिसेंबर २०२४ रोजी मारूती मंदीरात सायंकाळी ६ ते रात्री २ वाजेपर्यन्त भजन,किर्तन व विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले असुन१४ तारखेला,शनिवारी श्री दत्तात्रयास अभिषेक व आरती केले जाणार आहे.त्यानंतर मारूतीस महारूद्राभिषेक, नवग्रह पुजा,शनिपुजा,होमहवन व यज्ञचा कार्यक्रम होणार आहे.त्यानंतर दर्शनास येणाऱ्या सर्व भाविक भक्तांना मंदिर समितीच्या वतीने हानुमान चाळीसा देण्यात येणार आहे.तसेच दुपारी १२ वाजेच्या महाआरतीचा मान प्रथम रांगेत उभे असणाऱ्या भक्तांना मिळणार आहे.दत्त जयंती निमित्त मारुती मंदिरात मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याचा संभव आहे. भक्तांना कोणतीही अडचण होऊ नये यासाठी मंडळाकडून सूक्ष्म नियोजन केले जात आहे. दत्त जयंतीच्या निमित्ताने श्री मारुतीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना शत्रुघ्न गोवर्धन फावडे,शिशिर शत्रुघ्न फावडे,रा. पुणे व प्रविणकुमार प्रकाश मेंथे यांच्या कडून श्री मारुती अन्नछत्र मंडळात महाप्रसादाचे आयोजन केले आहे. अशी माहिती अध्यक्ष श्रीकांत खानापुरे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली आहे.

## सोलापुरात सर्व्हिस सुविधेचे उद्‌घाटन

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

इसुझू मोटर्स लिमिटेड, जपान यांची उपकंपनी असलेल्या इसुझू मोटर्स इंडिया या कंपनीने आपली सेवा महाराष्ट्रातही सुरू केली आहे. येथील नव्या इसुझू ऑथोराइझ्ड सर्व्हिस सेंटरचे उद्घाटन झाले. सेवा व ग्राहक अनुभव यांची व्याप्ती विस्तारण्यावर लक्ष केंद्रीत करून इसुझू मोटर्स इंडियातर्फे रिया मोटर्स यांची महाराष्ट्रातील ८ वे ऑथोराइझ्ड सर्व्हिस पार्टनर म्हणून नियुक्ती केली आहे. पुणे महामार्गावरील गणेश नगर येथे ही सुविधा आहे. इसुझू मोटर्स इंडिया आणि रिया मोटर्समधील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ग्राहकांच्या उपस्थितीत एएससी सुविधेचे उद्घाटन केले.

**CHANGE IN NAME**

I hereby declare that my old name **Mule Sager Ramesh** has been changed to new name **Mule Sagar Ramesh**

**चुकीची दुरूस्ती**

दै तरूण भारत मध्ये दि २ डिसेंबर २०२४ रोजी रे.मु.नं १२९/२०२१ हि जाहीर समन्स प्रसिध्द झाली होती त्या मध्ये नजर चुकीने पुढील नेमलेली तारीख २०/१२/२०२३ असे प्रसिध्द झाले त्या ऐवजी पुढील नेमलेली तारीख २०/१२/२०२४ असे वाचावे

**जाहिरात व्यवस्थापक**

केनरा बैंक Canara Bank
भारत सरकार का उपक्रम — A Govt. of India Undertaking
सिंडिकेट Syndicate
**ARM BRANCH :** Circle Office Building, Balmatta Road, Mangaluru - 575001.
**(A GOVERNMENT OF INDIA UNDERTAKING)**

**विक्री सूचना**

आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत जंगम आणि स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना नियम 6 (2) च्या नियम 8 (6) आणि 9 (1) च्या तरतुदीसह वाचली. सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, 2002. याद्वारे सर्वसाधारणपणे लोकांना आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदारांना की खाली वर्णन केलेल्या जंगम आणि जंगम मालमत्ता सुरक्षित कर्जदाराकडे गहाण ठेवलेल्या/ आकारल्या गेल्या आहेत, ज्याचा भौतिक ताबा कॅनरा बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे ते म्हणून विकले जाईल. रु.च्या वसुलीसाठी 27.12.2024 रोजी कुठे आहे, जसे आहे तसे, आणि जे काही आहे 34,76,86,263.59 (रुपये चौतीस कोटी शाहत्तर लाख शहाऐंशी हजार दोनशे त्रेसष्ट आणि पैसे एकोणसाठ फक्त) 30/11/2024 रोजीचे दायित्व अधिक व्याज 01/12/2024 पासून करारानुसार व्याज दराच्या तारखेपर्यंत , प्रासंगिक खर्च, इतर शुल्क आणि कॅनरा बँकेच्या .R.M शाखा, सर्कल ऑफिस बिल्डिंग, मंगळुरु 575001 कडून मे. शिवप्रियदर्शिनी कास्टिंग्स प्रायव्हेट लि., त्याचे व्यवस्थापकीय संचालक श्री. अण्णासाहेब सदाशिव चौगुला यांनी प्रतिनिधित्व केले. ज्ञात भारांसह जंगम आणि स्थावर मालमत्तेचे तपशील आणि संपूर्ण वर्णन, जर असेल तर.

| लॉट नं. | मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत | बयाणा रक्कम ठेव |
|---|---|---|---|
| **मालमत्ता 1: मालमत्ताधारकाचे नाव: M/s. शिवप्रियदर्शिनी एंटरप्रायझेस** | | | |
| लॉट 1. | Sy मध्ये स्थित होनागा औद्योगिक क्षेत्राचा भूखंड क्रमांक 48- म्हणून ओळखला जाणारा तो सर्व जमिनीचा तुकडा. होनागा गाव, काकती होबळी, बेळगाव तालुका, बेळगाव जिल्ह्यातील क्रमांक 536, विक्री विपत्र 9642/13-14 नुसार दिनांक 08/11/2013 नुसार 2121.89 चौ.मी. ताबा प्रमाणपत्र दि 03/11/1997 कर्नाटक औद्योगिक क्षेत्र विकास मंडळ, बंगलोर.) सीमा: पूर्व: भूखंड क्रमांक 48/B; पश्चिम: 60 रुंद रस्ता; उत्तर: भूखंड क्रमांक 47/-2; दक्षिण: भूखंड क्रमांक 49/A. | रु. 3,42,25,000.00 | रु. 34,22,500.00 |
| लॉट 2: | होनागा औद्योगिक क्षेत्र होनागा, काकती तालुका आणि जिल्हा बेळगावी येथे स्थित RS No.536 मधील भूखंड क्रमांक 48, KIDB, बेळगाव येथील औद्योगिक इमारतीमध्ये स्थापित उपकरणे, प्लांट आणि मशिनरी यांचा समावेश असलेली गृहित जंगम मालमत्ता. | रु. 60,32,000.00 | रु. 6,03,200.00 |
| लॉट क्रमांक 1 ची विक्री फक्त लॉट 2 च्या आयटमच्या बाबतीत वेगळी वैध बोली प्राप्त झाली आणि यशस्वी झाली तरच केली जाईल. तथापि, पक्ष लॉट - 1 आणि लॉट - 2 दोन्हीसाठी बोली लावू शकतात आणि दोन्ही आयटम घेऊ शकतात. | | | |
| **मालमत्ता 2: मालमत्ताधारकाचे नाव: M/s. शुभम इंडस्ट्रीज (भागीदारी फर्म)** | | | |
| 2 | मालमत्ता (पुढील भाग कार्यालय आणि मागील बाजूस औद्योगिक शेड/गोदाम आणि इतर सुविधांचा समावेश आहे) भूखंड क्रमांक 49/A (भाग) R.S.No.536 आकारमान 900 चौ.मीटर, KIDB होनागा औद्योगिक क्षेत्र होनागा, बेलागावी येथे आहे. सीमा: पूर्व: भूखंड क्रमांक 49/B; पश्चिम: 60 रुंद रस्ता; उत्तर: भूखंड क्रमांक 49/A चा भाग; दक्षिण: भूखंड क्रमांक 50. | रु. 1,17,29,000.00 | रु. 11,72,900.00 |
| **मालमत्ता 3: मालमत्ता मालकाचे नाव: M/s. शिवप्रियदर्शनी कास्टिंग प्रा. लि** | | | |
| 3 | KIDB औद्योगिक क्षेत्र, होनागा, बेळगावच्या R.S.No.536 मध्ये, भूखंड क्रमांक 49-A (उत्तर भाग), 869.75 चौ.मी. सीमा: पूर्व: भूखंड क्रमांक 49/B; पश्चिम: रस्ता क्रमांक 4 म्हणजेच 60 फुट रुंद रस्ता; उत्तर: भूखंड क्रमांक 48/E; दक्षिण: भूखंड क्रमांक 49 (भाग) म्हणजे 49/A (भाग) | रु. 87,21,000.00 | रु. 8,72,100.00 |

बयाणा रक्कम जमा 26.12.2024 रोजी किंवा त्यापूर्वी संध्याकाळी 5.00 वाजता जमा केली जाईल. वरील मालमत्तेवर आमच्या माहितीनुसार लिलाव खरेदीदाराच्या शीर्षकाला प्रभावित करणारे कोणतेही भार नाहीत. अधिक तपशिलांसाठी श्रीमती शिमना हरिदास, मुख्य व्यवस्थापक, कॅनरा बँक, एआरएम शाखा, सर्कल ऑफिस बिल्डिंग, मंगळुरू (फोन नं. 0824-2863367, 9361996755, 0824-2440469) ई-मेल आयडी: cb6296@canarabank.com पीएसबी अलायन्स प्रा. Ltd), (संपर्क नं.7046612345/6354910172/8291220220/9892219848/8160205051, ईमेल:support.ebkray@psballiance.com/support.ebkray@procure247.com).

दिनांक : 07/12/2024
ठिकाण : मंगळुरू

सही/-
अधिकृत अधिकारी, कॅनरा बँक,

**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
SJSB Multi-State Scheduled Coop.Bank
मल्टी स्टेट शेड्युल्ड को.ऑप बँक
'गगनभरारी' शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर - ४१३००७
फोन क्र.: 0217- 274 1101 ते 05 ई-मेल : info@sjsbbank.com वेबसाईट : www.sjsbbank.com

**जाहीर ताबा नोटीस**

नियम ८(२)

**(दि सेक्युरिटायझेशन & रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस & इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये)**

तमाम लोकांस, कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना सदर जाहीर ताबा नोटीसीने कळविण्यात येते की, ज्या अर्थी सोलापूर जनता सहकारी बँक लि. मुख्य कार्यालय, सोलापूर या संस्थेचे अधिकारी यांना उक्त अध्यादेशाच्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त झालेल्या प्राधिकृत अधिकारी या अधिकारानुसार मी उपरोक्त कायद्याचे कलम १३ (२) अन्वये खालील नमूद कर्जदार, जामीनदार व गहाणकार -

| शाखा, कर्जदाराचे नाव, पत्ता व जामीनदारांचे नाव | १३(२) नोटीस & रक्कम ताबा दिनांक | तारण मालमत्ता तपशील |
|---|---|---|
| **शाखा - नवी पेठ, सोलापूर -** **श्री. उमाकांत तुळशीराम बनसोडे** पत्ता-६५, सम्राट चौक, चंडक हायस्कूलजवळ, न्यू बुधवार पेठ, उत्तर सोलापूर, सोलापूर मार्केट, सोलापूर. **जामीनदार -** **१) श्री. अंकुर अनिल पंधे, २) श्रीमती रोहिणी अनिल पंधे** | १३(२) नोटीस दि.२१/०९/२०२४ रु.८,०७,८२७/- + दि.०१/०९/२०२४ पासूनचे व्याज व इतर खर्च **प्रतिकात्मक ताबा- दि.१०/१२/२०२४** | श्री. उमाकांत तुळशीराम बनसोडे यांचे मालकीची जिल्हा व उपजिल्हा सोलापूर, ता.उत्तर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकत यासी जुना सर्व्हे नं. ४८९ नवीन सर्व्हे नं.५०५, प्लॉट नं.१३ वसंत विहार, फेज नं. III या इमारतीमधील, T-2 टॉवरमधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं.१११ यांचे क्षेत्र २९.५६ चौ.मी. ही मिळकत तारण आहे. |
| **शाखा - नवी पेठ, सोलापूर -** **श्री. अभिजित अशोक मागाडे** पत्ता-घर नं.१, आंबेडकर हौसिंग सोसायटी कुमठा नाका सोलापूर. **जामीनदार -** **१) श्री. अंकुर अनिल पंधे, २) श्रीमती रोहिणी अनिल पंधे** | १३(२) नोटीस दि.२१/०९/२०२४ रु.८,१५,४८९/- + दि.०१/०९/२०२४ पासूनचे व्याज व इतर खर्च **प्रतिकात्मक ताबा- दि.१०/१२/२०२४** | श्री. अभिजित अशोक मागाडे यांचे मालकीची जिल्हा व उपजिल्हा सोलापूर, ता.उत्तर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकत यासी जुना सर्व्हे नं. ४८९ नवीन सर्व्हे नं.५०५, प्लॉट नं. १३ वसंत विहार फेज नं. III या इमारतीमधील, T-2 टॉवरमधील दुसऱ्या मजल्यावर फ्लॅट नं.२०७ यांचे क्षेत्र २९.५६ चौ.मी. ही मिळकत तारण आहे. |
| **शाखा - मोहोळ -** **श्री. अविनाश विद्याधर होमकर,** रा.मु.पो. कामती बुद्रुक, मंगळवेढा रोड, ता. मोहोळ, जि. सोलापूर. **जामीनदार -** **१) श्री. रमेश गणपती बोराळे २) श्री. भैरवनाथ निवृत्ती अंकुशराव ३) श्री.धनंजय प्रकाश होमकर** | १३ (२) नोटीस दि. ०८/०९/२०२३ रु.७,९०,२११/- + दि.०१/०९/२०२३ पासूनचे व्याज व इतर खर्च **प्रतिकात्मक ताबा- दि.११/१२/२०२४** | श्री. अविनाश विद्याधर होमकर यांच्या मालकीचे मु.पो. कामती बुद्रुक, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील सि.स.नं.२८२, घर नं. १३६ याचे क्षेत्र ६८.५ चौ.मी. ही मिळकत तारण आहे. |

वरीलप्रमाणे कर्जदार व जामीनदार यांना मागणी नोटीस पाठवून संपूर्ण रक्कम नोटीस मिळाल्या पासून ६० (साठ) दिवसाच्या आत भरणा करण्याचे कळविले होते. परंतु नोटीसीनंतर आलेला भरणा वजा जाता उपरोक्त कर्जदार / गहाणकार व जामीनदार यांनी उर्वरित रक्कम आमच्याकडे भरण्यास कसूर केलेली आहे. त्या अर्थी सदर कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना कळविण्यात येते की, खाली सही करणार यांनी वर परिशिष्ठात नमूद केलेल्या स्थावर मिळकतीचा दि सेक्युरिटायझेशन & रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस & इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ चे कलम १३ (४) नियम ९ अन्वये प्रतिकात्मक ताबा घेतलेला आहे.

सबब उपरोक्त कर्जदार / गहाणकार / जामीनदार आणि तमाम लोकांना कळविण्यात येते की, वरील परिशिष्ठात नमूद केलेल्या मिळकती बाबत कोणीही कोणाशीही कोणत्याही प्रकारे हस्तांतर, विल्हेवाट, गहाण, विक्री, बोजा, तारण वाटणी, वहिवाट, बक्षिस अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतर करार करू नये. या उपरही तसा व्यवहार अथवा करार केल्यास तो बेकायदेशीर आहे, असे ठरवून आमच्या बँकेवर अथवा सदर मिळकतीवर सदर व्यवहार अथवा करार कायद्याने बंधनकारक राहणार नाही. याची नोंद उपरोक्त कर्जदार / गहाणकार / जामीनदार व तमाम लोकांनी घ्यावी.

**दिनांक : १२/१२/२०२४**
**ठिकाण : सोलापूर**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
**(मल्टी स्टेट शेड्युल्ड को ऑप बँक)**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त



### सेवासदच्या केतकी चौगुलेची राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

देवास मध्यप्रदेश येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी सेवासदच्या केतकी नागेश चौगुले हिची निवड झाली. बारामती येथे झालेल्या राज्य स्पर्धेतून तिची निवड झाली. केतकीने टीम इव्हेंटमध्ये सुवर्ण व एकेरीत ब्राँझ पदक प्राप्त झाले. इयत्ता सहावीपासून केतकी सॉफ्ट टेनिसचा सराव करीत आहे. केतकीला ज्ञानेश्वर काळे, महेश झांबरे शिवाजी वसपटे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे सेवासदन संस्थेच्या अध्यक्षा शीला मिस्त्री, शालेय समिती अध्यक्ष ॲड. उमेश मराठे, सचिवा विना पत्की, संचालक पद्माकर कुलकर्णी, मुख्याध्यापिका राजश्री रणपिसे, उपमुख्याध्यापिका नंदिनी बारभाई, पर्यवेक्षिका स्वाती पोद्दार, आदींनी अभिनंदन केले.



### शिवालय शिक्षण संकुलात क्रीडा सप्ताह उत्साहात

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

शिवालय शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ संचालित शिवालय प्राथमिक माध्यमिक आश्रम शाळा व ओम वैष्णव कनिष्ठ महाविद्यालय, तळे हिप्परगा (ता. उ. सोलापूर) येथे क्रीडा सप्ताह सुरु झाला. प्रथमतः राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. योच उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय गणेशकर यांनी केले. यावेळी प्राचार्या के. एल. वाघचवरे यांनी क्रीडा सप्ताहाची रुपरेषा सांगितली. या सप्ताहात कबड्डी, खो-खो, लंगडी, क्रिकेट या सांघिक स्पर्धा सोबतच धावणे, लांब उडी, उंच उडी, गोळा फेक आणि थाळीफेक, दोरीवरच्या उड्या या वैयक्तिक सामन्यांचे आयोजन केले आहे. त्याचबरोबर बुद्धिबळ, कॅरम आणि संगीत खुर्ची पोत्यात पाय घालून धावणे यासारख्या फनी गेमचे देखील आयोजन केले आहे. क्रीडा सप्ताह यशस्वी होण्यासाठी क्रीडा शिक्षक अभिमान जाधव, देवानंद कोळेकर, रघुनाथ पवार, बाळासाहेब भोसले मदनगौडा चौगुले, शिवशंकर माने आदी परिश्रम घेत आहेत



### राष्ट्रीय खुल्या तायक्वांदो स्पर्धेसाठी युनिक इंग्लिश मेडियम स्कूलच्या तिघांची निवड

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

गोव्यातील पेडल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स इनडोअर स्टेडियम मापुसा येथे होणाऱ्या चौथ्या राष्ट्रीय खुल्या तायक्वांदो स्पर्धेसाठी युनिक इंग्लिश मीडियम स्कूलच्या तिघांची निवड झाली. सचिन बिद्री, पृथ्वीसिंग हजारे व निवेदिता गंजाळकर हे निवडलेले खेळाडू आहेत. या विद्यार्थ्यांना शाळेचे क्रीडा शिक्षक अमर पाटील व प्रशिक्षक मंजूर शेख यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे चेअरमन राजशेखर शिवदारे, विश्वस्त भीमाशंकर शेटे, सल्लागार अंजली तिवारी व मार्गदर्शिका डॉ. शुभदा उपासे व मुख्याध्यापिका पूजा बाजपेयी यांनी सर्व अभिनंदन केले.




### बी. एफ. दमाणी प्रशालेत क्रीडा सप्ताहाचा समारोप उत्साहात

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ, पुणे संचलित बी. एफ. दमाणी प्रशालेत क्रीडा सप्ताह समारोप व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. क्रीडाज्योत मालवून क्रीडा सप्ताहाची औपचारिक सांगता करण्यात आली. मार्शल आर्ट प्रशिक्षिका संगीता जाधव, संस्थेचे राजगोपालजी मिणियार यांच्या हस्ते क्रीडा सप्ताह अंतर्गत विविध वैयक्तिक व सांघिक स्पर्धेतील विजेते विद्यार्थी खेळाडू व संघ तसेच शालेय क्रीडा स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी खेळाडूंना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यावेळी संस्थेचे स्थानिय अध्यक्ष कालिदासजी जाजू, सचिव मंगलजी काबरा, सहसचिव उज्ज्वलजी तापडिया, मुख्याध्यापिका रेखा पेंबर्ती, पर्यवेक्षक राहुल इंगळे व पालकवृंद उपस्थित होते. प्रास्ताविक लक्ष्मण दळवी यांनी केले. प्रमुख पाहुणे व अध्यक्षांचा परिचय श्री. प्रभानंद पाटील यांनी करुन दिला. बक्षीस प्राप्त विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन शिरीन इंडीकर व वंदना राऊत यांनी केले. सूत्रसंचालन सीमा मोहोळकर यांनी केले तर आभार समीर कुलकर्णी यांनी मानले.

# हॅरी ब्रुक, जसप्रीत बुमराह अव्वल

## कसोटी क्रमवारी

◆ **दुबई, ११ डिसेंबर**

आयसीसी कसोटी फलंदाजांच्या क्रमवारीत बुधवारी इंग्लंडच्या प्रतिभावान फलंदाज जो रूटचे वर्चस्व संपुष्टात अले असून त्याचाच संघमित्र हॅरी ब्रुकर याने त्याचे अव्वल स्थान बळकावले आहे. गोलंदाजांच्या व अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत अनुक्रमे भारताचे वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह व फिरकीपटू रवींद्र जडेजाने अव्वल स्थान मिळविले आहे.

गत आठवड्यात न्यूझीलंडविरुद्ध आपले आठवे शतक झळकावल्यानंतर २५ वर्षीय हॅरी ब्रुकने जो रुटला मागे टाकले. ताजा फलंदाजी क्रमवारीत उजव्या हाताच्या फलंदाजाने एका गुणाच्या फरकाने आघाडीचे स्थान मिळविले आहे. ब्रुकचे एकूण रेटिंग गुण ८९८ असून जो रूटपेक्षा एक गुण जास्त आहे. हॅरी ब्रुकने मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरच्या आयसीसी क्रमवारीतील ३४ व्या सर्वोच्च रेटिंगच्या कामगिरीशी बरोबरी साधली आहे.



जसप्रीत बुमराह



हॅरी ब्रुक

जो रूट यावर्षी जुलै महिन्यापासून अव्वल स्थानावर होता, तेव्हा त्याने न्यूझीलंडचा कर्णधार केन विल्यम्सनकडून अव्वल स्थान बळकावले होते.

न्यूझीलंडविरुद्धच्या ३२३ धावांनी मिळविलेल्या विजयात इंग्लंडच्या बॅरी ब्रुकने १२३ व ५५ धावांची भरीव कामगिरी केली होती. त्याच कसोटी सामन्यात जो रूटने ३ व १०६ धावांची खेळी केली होती.

सद्यस्थितीत हॅरी ब्रुक हा जगातील सर्वोत्तम खेळाडू आहे, असे जो रूट म्हणाला.

आयसीसी कसोटी गोलंदाजांच्या क्रमवारीत ८९० रेटिंग गुणांसह जसप्रीत बुमराह अव्वल स्थानावर आहे. भारताच्या बुमराहचा दक्षिण आफ्रिकेचा कॅगिसो रबाडा (८५६) व ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड (८५१) यांच्याशी संघर्ष आहे.

आयसीसी अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत रवींद्र जडेजाने ४१५ गुणांसह आपले अव्वल स्थान कायम राखले असून त्याच्या पाठोपाठ बांगलादेशचा कर्णधार मेहदी हसन मिराझचा (२८५) क्रम लागतो. वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटी सामन्यात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे त्याने क्रमवारीत दोन स्थानांची झेप मारली.◀ *(वृत्तसंस्था)*

# ऑस्ट्रेलियाने जिंकली वन-डे मालिका

## भारतावर ८३ धावांनी विजय

**पर्थ, ११ डिसेंबर -**

ॲनाबेल सदरलॅण्डचे (११०) दमदार शतक व ॲशले गार्डनरच्या (५० धावा व ३० धावांत ५ बळी) चमकदार अष्टपैलू कामगिरीच्या बळावर ऑस्ट्रेलियाने तिसऱ्या व अंतिम वन-डे सामन्यात भारतावर ८३ धावांनी विजय नोंदविला. या विजयाबरोबरच ऑस्ट्रेलियाने तीन सामन्यांची वन-डे मालिकेत भारताचा ३-० ने सफाया केला. भारताची सलामीवीर स्मृती मंधानाची (१०५) शतकी खेळी व अरुंधती रेड्डीची प्रभावी गोलंदाजी व्यर्थ ठरली.



ऑस्ट्रेलियाच्या २९८ धावांच्या प्रत्युत्तरात भारताला ४५.१ षटकांत २१५ धावा काढता आल्या. भारतीय संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवित अरुंधती रेड्डीने सामन्याच्या प्रारंभी चार जबरदस्त हादरे दिले. त्यामुळे ऑस्ट्रेलियाची १६.१ षटकांत ४ बाद ७८ धावा अशी अवस्था झाली. अरुंधतीने जॉर्जिया व्हॉल (२६), फोबे लिचफिल्ड (२५), एलिस पेरी (४) व बेथ मूनीला (१०) नियमित अंतराने तंबूत परत पाठवले. मात्र त्यानंतर ॲनाबेल सदरलॅण्डने ॲश्लेग गार्डनर व कर्णधार तहलिया मॅकग्राच्या (नाबाद ५६) सहकार्याने ऑस्ट्रेलियाला अडचणीतून बाहेर काढले व संघाला मर्यादित षटकांत ६ बाद २९८ धावांचा टप्पा गाठून दिला.

भारताकडून अरुंधती रेड्डीने २६ धावांत ४ बळी टिपलेत. दीप्ती शर्माने एक बळी टिपण्यात यश मिळविले. विजयासाठी २९९ धावांचा पाठलाग करताना भारताची सलामीवीर स्मृती मंधानाने एकाकी झुंज देत १०५ धावांची शतकी खेळी केली. भारतीय संघ दबावाखाली आला व भारताने शेवटचे सात फलंदाज २६ धावांत आपले शेवटचे सात विकेट गमावले.

# श्रीराम स्पोर्टस्, कमलादेवी करमाळा संघास विजेतेपद

## ▶▶टकारी समाज संघाच्या कुमार जिल्हा निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

जिल्हा अजिंक्यपद कुमार कबड्डी स्पर्धेत कुमार गटात श्रीराम स्पोर्टस् क्लब व कुमारी गटात कमळादेवी करमाळा संघाने विजेतेपद पटकावित टकारी चषक पटकाविला.




अंतिम सामन्यात कुमार गटात श्रीराम स्पोर्टस क्लबने शंभूराजे स्पोर्टस वर मात केली. उपविजेता ठरला. कुमारी गटात कमळादेवी करमाळा संघाने येथील रूकमाई स्पोर्टस क्लबला हरिवले. सोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने टकारी समाज संघ सोलापूरच्या वतीने ही स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेचे उद्घाटन शंकर भवन मंगल कार्यालयात समाजातील प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. विजेत्या संघास जेष्ठ टकारी समाज संघाचे सरपंच नारायण जाधव, टकारी समाज संघ महाराष्ट्र प्रदेश माजी अध्यक्ष प्रा. नामदेव जाधव यांच्या हस्ते ट्रॉफी प्रदान करण्यात आली. मुलांना अंबादास गायकवाड यांच्या मातोश्री कै. सुलोचनाबाई मारुती गायकवाड यांच्या स्मरणार्थ तर मुलींच्या संघास अनिल अशोक जाधव यांच्या मातोश्री कै. हिराबाई अशोक जाधव यांच्या स्मरणार्थ ट्रॉफी भेट देण्यात आली. यावेळी टकारी समाज संघ प्रदेशाध्यक्ष विद्यापीठ खेळाडू अंबादास गायकवाड, शहराध्यक्ष सुनील जाधव, जिल्हाध्यक्ष अनिल जाधव, युवक अध्यक्ष अनिल जाधव, महिला अध्यक्ष अश्विनी जाधव , कार्याध्यक्ष युवराज जाधव, माजी युवक अध्यक्ष श्रीकांत जाधव, प्रदेश सचिव रमेश जाधव, प्रकाश जाधव, एस.टी स्टँडिंग चेअरमन सुनील जाधव, ओ.एस बाप्पा जाधव आदी उपस्थित होते.



# ए. जी. पाटील अभियांत्रिकीच्या ॲथलेटिक्स रिले संघाची आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

ए. जी पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या पुरुष संघाने सोलापूर विभागीय अथलेटिक्स स्पर्धेत प्रथम तर महिला संघाने द्वितीय क्रमांक मिळविला. या कामगिरीवर संघाची समर्थ इन्स्टिट्यूट,बेल्हे, जि. पुणे येथे होणाऱ्या आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशांत्र विद्यापीठ लोणेरे अंतर्गत या स्पर्धा कर्मयोगी इंजिनिअरिंग कॉलेज शेळवे पंढरपूर येथे झाल्या. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक शिवशरण एस. कोरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, सचिव शिवानंद पाटील, कॅम्पस डायरेक्ट डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांनी अभिनंदन केले.

**कामगिरी केलेला संघ : ४ बाय १०० रिले :** पुरुष : शशांक खवेकर, प्रथमेश जाधव, मल्लिकार्जुन सुंटे, महादेव धारेराव, चंद्रकांत हन्नूरे. महिला : प्रियांका व्हनमाने, अमृता लोहार, सरस्वती माळी, पूजा स्वामी, ऋतुजा पवार.

# जिल्ह्यातील एक हजार दिव्यांग विद्यार्थी आज दाखविणार क्रीडा नैपुण्य

## उद्या सांस्कृतिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १० डिसेंबर-**

जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून गुरुवार दि.१२ रोजी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा व शुक्रवार दि. १३ रोजी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून जिल्ह्यातील एक हजार दिव्यांग विद्यार्थी क्रीडा नैपुण्य आणि कलाविष्कार दाखविणार असल्याची माहिती जिल्हा समाज कल्याण अधिकारी सचिन कवले यांनी दिली.



दिव्यांग कल्याण आयुक्तालयाच्या वतीने राज्यस्तरीय तर त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाच्या अधिनस्त असलेल्या दिव्यांग कल्याण विभागाच्या वतीने जिल्हास्तरीय दिव्यांग विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकविलेल्या दिव्यांग खेळाडूंना राज्यस्तरावर क्रीडा नैपुण्य दाखविण्याची संधी मिळत असल्याचे सांगून कवले म्हणाले की, गुरुवार दि.१२ रोजी विकास नगर येथील नॅशनल असोसिएशन फॉर द् ब्लाईंड, जिल्हा शाखा, यलगुलवार प्रशाला येथे सकाळी नऊ वाजता क्रीडा स्पर्धेला प्रारंभ होईल. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संदिप कोहिनकर यांच्या हस्ते क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन होईल. तर सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील या अध्यक्षस्थानी असतील. शुक्रवार दि. १३ रोजी दहा वाजता रंगभवन सभागृहात विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम होईल. जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होईल. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील.नागरिकांनी या दोन दिवस चालणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कार्यक्रमाला उपस्थित राहून त्यांना प्रोत्साहन द्यावे, त्यांचे कौतुक करावे, असे आवाहन श्री. कवले व दिव्यांग विभागाचे वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता शशिकांत ढेकळे यांनी केले आहे.

# क्रिकेट स्पर्धेत अर्जुन संघास विजेतेपद

## निमा वुमेन्स फोरम क्रीडा महोत्सव : डॉ. अश्विनी देगांवकर सर्वोत्कृष्ठ खेळाडू

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

आयुर्वेद व योग यांचा प्रसार करीत निमा वुमेन्स फोरम सोलापूर तर्फे आयोजि क्रीडा महोत्सवातील क्रिकेट स्पर्धेत अर्जुन संघाने तुलसी संघावर मात करीत विजेतपद पटकाविले.

या स्पर्धेत ३० महिला डॉक्टरांनी भाग घेतला होता. यात डॉ. अश्विनी देगांवकर यांना सर्वोत्कृष्ट गोलंदाज, मलिकावीर व सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. डॉ. अश्विनी यांनी २८ धावा, ६ विकेट, १ कॅच व ३ स्टंपिंग केले.

सर्वोत्कृष्ट गोलंदाजाचा पुरस्कार डॉ. आनंदी गायकवाड यांनी मिळविला. डॉ. लक्ष्मी पिंगळे यांना उदयोन्मुख खेळाडू म्हणून गौरविण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. विवेक अग्रवाल यांचे मार्गदर्शन तसेच निमा राष्ट्रीय माजी अध्यक्ष डॉ. विनायक टेंभुर्णीकर, राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य डॉ, नितीन बलदवा, एनपीलचे चेअरमन डॉ. बगले, कोषाध्यक्ष डॉ. धप्पाधुळे, सेक्रेटरी डॉ.उटगीकर यांचे सहकार्य लाभले.




**अंतिम निकाल (विजेते, उपविजेते)**


**बॅडमिंटन :** एकेरी : डॉ. शितल कुलकर्णी, डॉ. किर्ती गोळवलकर. दुहेरी : डॉ शितल कुलकर्णी व डॉ पल्लवी भांगे, डॉ अश्विनी देगांवकर व डॉ. आनंदी गायकवाड. **लॉन टेनिस :** डॉ तबस्सुम शेख, डॉ. शितल कुलकर्णी. **टेबल टेनिस :** डॉ. प्रतिभा टेकाडे, डॉ किर्ती गोळवलकर. यांना देण्यात आले.

# रशिमका, बहारमुस, नित्तूरे, कल्लुरी यांचा दुसऱ्या फेरीत प्रवेश

## ओॲसिस सोलापूर ओपन २५ हजार डॉलर महिला आयटीएफ टेनिस स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, ११ डिसेंबर -**

ओॲसिस, प्रिसीजन, इलिझियम- जामश्री व बालाजी अमाईन्स पुरस्कृत ओॲसिस सोलापूर ओपन एमएसएलटीए -एसडीएलटीए २५ हजार डॉलर महिला आयटीएफ टेनिस स्पर्धेत एकेरीत मुख्य ड्रॉमध्ये श्रीवल्ली रश्मिका भामिदीप्ती, हुमेरा बहारमुस, आकांक्षा नित्तूरे, लालित्या कल्लुरी या भारतीय खेळाडूंनी दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.



व्हॅलेंतिनी (जर्मनी)



एकतेरिना (रशिया)



हुमेरा (भारत)



श्रीवल्ली (भारत)

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस असोसिएशन व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एम. एस. एल. टी. ए. टेनिस सेंटर जिल्हा क्रीडा संकुल कुमठा नाका, येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत एकेरीत पहिल्या फेरीत पाचव्या मानांकित भारताच्या श्रीवल्ली रश्मिका भामिदीप्ती हिने रशियाच्या एकतेरिना रेयानगोल्डचा ६-४, ६-१ असा पराभव करून दुसरी फेरी गाठली. वाईल्ड कार्डद्वारे प्रवेश केलेल्या भारताच्या हुमेरा बहारमुस हिने सोहा सादिकचे आव्हान ६-२, ६-४ असे मोडीत काढले. क्वालिफायर भारताच्या लालित्या कल्लुरीने वाईल्ड कार्डद्वारे प्रवेश केलेल्या भारताच्या सेजल भुतडाचा ६-३, १-६, ६-० असा तीन सेटमध्ये पराभव केला. आकांक्षा नित्तूरे हिने पात्रता फेरीतून मुख्य फेरीत प्रवेश केलेल्या स्म्रिती भसीनचे आव्हान ७-५, ६-४ असे संपुष्टात आणले. संघर्षपूर्ण लढतीत रशियाच्या एकतेरिना काझिओनोव्हाने पोलंडच्या झुझाना पावलिकोव्स्काचा टायब्रेकमध्ये ३-६, ७-६(६), ६-१ असा पराभव करून दुसऱ्या फेरीत धडक मारली. लात्वियाच्या आठव्या मानांकित डायना मार्सिन्केविकाने भारताच्या झील देसाईचा ६-२, ०-६, ६-४ असा कडवा प्रतिकार केला. दुहेरीत आडकर, यमलापल्ली यांची आगेकूच दुहेरीत भारताच्या वैष्णवी आडकर व सहजा यमलापल्ली या जोडीने नेपाळच्या अभिलाषा बिस्त व भारताच्या पवनी पाठकचा ६-३, ६-१ असा पराभव केला. भारताच्या हुमेरा बहरामूस व पूजा इंगळे या जोडीने चौथ्या मानांकित रिया भाटिया व झील देसाई यांचा ६-४, ४-६, १३-११ असा पराभव करून दुसऱ्या फेरीत धडक मारली.

**अन्य निकाल पहिली फेरी**

**एकेरी :** व्हॅलेंटिनी ग्राममतीकोपौलो (ग्रीस) ७ वि.वि. आकृती सोनकुसरे (भारत) ६-१, ६-२; एकतेरिना याशिना(रशिया) ६ वि.वि.मारिया मिखाइलोवा (रशिया) ६-१, ६-३; इवा गरकुशा (रशिया)वि.वि.तनिषा कश्यप (भारत) ६-२, ७-५; **दुहेरी :** थासापोर्न नाकलो (थायलंड) / बुन्यावी थामचैवत (थायलंड) वि.वि.एकतेरिना काझिओनोव्हा ३ / एकतेरिना रेयानगोल्ड (रशिया) ७-५, ६-२

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# विठ्ठलराव शिंदे कारखान्याच्या वजन काट्यांची भरारी पथकाकडून तपासणी

**दोन्ही ठिकाणचे वजनकाटे अचूक असल्याचे निष्पन्न**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ११ डिसेंबर-**

माढा तालुक्यातील पिंपळनेर येथील विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नंबर-१ व पंढरपूर तालुक्यातील करकंब येथील युनिट नंबर -२ येथील वजनकाट्यांची वैधमापन विभागाच्या भरारी पथकाच्या अधिका-यानी अचानक तपासणी केली असता दोन्ही साखर कारखान्याचे सर्व ऊस वजनकाटे योग्य व अचूक असल्याचे निष्पन्न झाले असून कारखान्याकडे गाळपास आलेल्या ऊसाचे वजन वजनकाट्यावर झाल्यानंतर लगेचच संबंधित ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या मोबाईलवर ऊसाचे वजनाचा तातडीने मेसेज जात असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष माजी आ. बबनराव शिंदे यांनी दिली आहे.



विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं.१ पिंपळनेर व युनिट नं.२ करकंब येथील सन २०२४-२५ चा ऊस गाळप हंगाम जोमाने सुरू आहे. वैधमापनशास्त्र विभागाकडील श्री.शेजवळ,निरीक्षक वैधमापन शास्त्र (वजनमापे), वाघोली विभाग, जि. पुणे व यादव, निरिक्षक वैधमापन शास्त्र, पुणे विभाग क्र. २ यांचे भरारी पथकाने दि. ५ डिसेंबर रोजी दुपारी १ वा. च्या सुमारास अचानक विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे पिंपळनेर युनिटला भेट देवून ऊस वजनकाट्यांची तपासणी केली. तसेच उपनियंत्रक वैधम ापनशास्त्र (वजनमापे) पुणे येथील ए. वाय. अभंगे, उपनियंत्रक, वैधमापनशास्त्र पुणे जिल्हा क्र.४, निरिक्षक वैधमापनशास्त्र पुणे क्र.५, निरिक्षक वैधमापन शास्त्र इंदापूर विभाग व निरिक्षक वैधमापन शास्त्र खेड विभाग प्र.रा. बागडे यांचे भरारी पथकाने दि.१० डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५ वा. चे सुमारास अचानक विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे करकंब युनिटला भेट देवून ऊस वजनकाट्यांची तपासणी केली. तसेच या पथकाने ऊस उत्पादकांचे ऊसाने भरलेल्या वाहनाचे कारखान्याचे ऊस वजन काट्यावर वजन केले असता कारखान्याचे वजन काट्यामध्ये कोणतीही तफावत आढळून आली नसून वजनकाटे योग्य व अचूक असल्याचे सिध्द झाले आहे. यावेळी वैधमापनशास्त्र विभागाचे पथकाने सर्वांचे समोर पंचनामा करून सर्व ऊस वजन काटे बरोबर असल्याचे अहवालात नमुद केले आहे. सदरप्रसंगी कारखान्याचे कार्यकारी संचालक संतोष डिग्रजे, युनिट नं.२ चे जनरल मॅनेजर सुहास यादव, केन मॅनेजर संभाजी थिटे, इन्स्टुमेंट इंजिनिअर अजित माने, केनयार्ड सुपरवायझर नामदेव गायकवाड, युनिट नं.२ चे शेती अधिकारी रामचंद्र पाटील,बाबुराव इंगवले, इन्स्टुमेंट इंजिनिअर अतुल देंबरे, ऊस पुरवठा अधिकारी गणेश खेडेकर, केनयार्ड सुपरवायझर महादेव गायकवाड, ऊस पुरवठादार शेतकरी उपस्थित होते.

### पंचनामा करुन दिला अहवाल

या पथकाने ऊस उत्पादकांचे ऊसाने भरलेल्या वाहनाचे कारखान्याचे ऊस वजन काट्यावर वजन केले असता कारखान्याचे वजन काट्यामध्ये कोणतीही तफावत आढळून आली नसून वजनकाटे योग्य व अचूक असल्याचे सिध्द झाले आहे. यावेळी वैधमापनशास्त्र विभागाचे पथकाने सर्वांचे समोर पंचनामा करून सर्व ऊस वजन काटे बरोबर असल्याचे अहवालात नमुद केले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### निमगाव येथे शुक्रवारी आंबा उत्पादकांसाठी कार्यशाळा

**पिलीव, दि ११ डिसेंबर-**

निमगाव (ता. माळशिरस) येथे आंबा उत्पादकांसाठी शुक्रवार दि. १३ डिसेंबर २०२४ रोजी निमगाव पिलीव रोड येथे निनाद पाटील यांच्या केशर आंबा बागेत आंबा उत्पादकांसाठी कार्यशाळा आयोजित केली असल्याची माहिती महादेश फार्मस फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सचिन नलावडे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. नलावडे म्हणाले की, माळशिरस तालुका कृषी विभाग व महादेश फार्म फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा सोलापूर आत्मा अंतर्गत आंबा उत्पादकांसाठी कार्यशाळा आयोजित केली असून या कार्यशाळेसाठी तालुका कृषी अधिकारी आबासाहेब रुपनवर, कृशिभूषण आंबा उत्पादक शेतकरी डॉ. केशव सरगर, प्रभारी मंडळ अधिकारी सुरेश देवकाते, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक आत्मा ,माळशिरस कुलदीप ढेकळे हे विविध विषयांवर मार्गदर्शन करणार असून यामध्ये फळबाग लागवडीसाठी शासनाच्या विविध योजना, अतिसघन आंबा लागवड, आंबा लागवडीपासून छाटणी, विरळणी आणि जोपासना, आंबा संगोपन चतुसूत्री, मोहर संरक्षण आणि खत व्यवस्थापन, आंबा काढणे ते पिकविण्यासाठी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन ,आंबा विक्री व्यवस्थापन प्रश्न उत्तरे आणि समाधान आदी विषयांवर मार्गदर्शन होणार आहे. माळशिरस तालुक्यात दिवसेंदिवस आंबा लागवडीचे क्षेत्र वाढत असून शास्त्रोक्त पद्धतीने जास्तीत जास्त उत्पादन घेण्यासाठी तालुक्यासह आसपासच्या गावातील जास्तीत जास्त आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी सदर आंबा कार्यशाळेत उपस्थित राहावे असे आवाहन महादेश फार्मस फाउंडेशन व तालुका कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.





### ओंकार साखर कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांचा सत्कार

**पिलीव, दि. ११ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील ओंकार साखर कारखान्याच्या प्रतिदिन गाळप क्षमता अतिशय कमी होती.नुकतीच या कारखान्याची गाळप क्षमता ६५०० मेट्रिक टन एवढी करणयात आली आहे. सदरचा नवीन प्रकल्प नुकताच कार्यान्वित करणयात आला. यामुळे शेतकऱ्यांनची गाळपाबाबत होणारी गैरसोय टळली आहे. लवकरच इतर उपपदार्थ निर्मिती प्रकल्प सुदधा कार्यान्वित होणार आहेत. यामुळे शेतकऱ्यांना दर चांगला मिळणार आहे. तसेच या भागातील सुशिक्षित बेरोजगारांना काम उपलब्ध होणार आहे. हा ओंकार साखर कारखाना चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली सुरु आहे. नुतन प्रकल्प कार्यान्वित केल्याबद्दल ऊस उत्पादक शेतकरी, वाहतुकदार व कर्मचारी यांच्या वतीने चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जनरल मॅनेजर भिमराव वाघमोडे, चिफ इंजिनिअर तानाजी देवकते, धन्यकुमार जमदाडे, मेजर मोहन घोडके, केन मॅनेजर शरद देवकर, इंजिनिअर धनाजी पवार, रमेश आवताडे, शेतकरी सर्जेराव पिंगळे, प्रगतशील बागायतदार रामचंद्र मगर, नितीन जाधव, गणेश धायगुडे, राहुल मगर, शहाजी शिंदे यांच्या सह अनेक कर्मचारी, शेतकरी बांधव या सत्कार समारंभाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दत्तजयंतीनिमित्त प्रशासन सतर्क

**अक्कलकोट दि . ११ डिसेंबर**

श्री दत्तजयंती (१४ डिसेंबर ) उत्सव निमित्त श्रीतीर्थक्षेत्र अक्कलकोटी दत्तअवतार श्री स्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनार्थ राज्यातुन मोठया प्रमाणात भक्तगण येतात. गाणगापूर दत्तजयंती उत्सव परतीच्या प्रवासातील यात्रीही मोठया प्रमाणत अक्कलकोट तीर्थक्षेत्री दर्शनार्थ येतात. भाविकाना सुलभ सोयी वाहने पार्किंग व्यवस्था बाबत प्रशासन सतर्क झाले आहे शहरातील विविध मंदिर व्यवस्थापन नगरपालिका प्रशासन पोलीस प्रशासन अधिकारी यांची समन्वयाने विविध सोयी सुविधा बाबत प्रशासन सतर्क झाले असून नियोजन चालू आहे . दत्तजयंती निमित्य होणारी गर्दी चे नियोजन आखले जात आहे. श्री दत्त जयंती उत्सव निमित्य अक्कलकोट तीर्थक्षेत्री दत्त अवतार श्री स्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनार्य उत्सवा दरम्यान प्रत्येक दिवशी १ लाखापेक्षा अधिक भाविक दर्शनार्थ येण्याची शक्यता आहे. भाविकाची वाहने बाह्य वळण रस्त्याने मैंदर्गी रोडकडून येणारी वाहने मैंदर्गी रस्त्यावरील रुग्णालय येथे तसेच विद्युत वितरण कार्यालय चौक ते मंगरुळे चौक मार्ग येणारी वाहने बासलेगाव रोड कडे वाहन पार्किंग करण्याचे नियोजन आहे. कमला राजे चौकपासून तीन चाकी चार चाकी वाहने थांब विणयत येतील. कमला राजे चौक येथे वाहने थांबा विण्यात येणार आहेत . पोलीस निरिक्षक राजेद्र टाकणे मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी मंदिर परिसरात बुधवारी पाहणी केली. मंदिर परिसरात भाविकांना सुलभ वावर होणे कामी प्रशासन नियोजन करीत आहे.

### मतदान प्रक्रियेस गैरहजर; २३ कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल

**पंढरपूर, दि.११ डिसेंबर -**

पंढरपूर विधानसभा मतदारसंघाची निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी मुख्याध्यापक शिक्षक विविध कर्मचाऱ्यांना बोलाविण्यात आले होते. प्रशिक्षणास २३ कर्मचारी गैरहजर राहिले. त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. मात्र योग्य उत्तर आले नसल्याने २३ जणांविरुद्ध पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा केला आहे. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. कर्मचारी प्रशिक्षणास उपस्थित राहण्याचे कर्मचाऱ्यांना नोटीस देण्यात आली होती तरीही २३ कर्मचारी गैरहजर राहिले यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. मात्र त्यांचे कडून समाधानकारक उत्तर आले नसल्याने जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या आदेशाने नायब तहसीलदार बालाजी पुदलवार यांनी पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात २३ जाणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे गुन्हा दाखल केलेले मुख्याध्यापक शिक्षक विविध कर्मचाऱ्यांची नावे मंगेश शिंदे, नागनाथ सोरेगावकर, उस्मान तांबोळी, रामेश्वर सोलापूर, अर्जुन प्रक्षाळे, सुरेश उदगीकर, नामदेव कुचेकर, जी. एस.गोरे, संतोष मुंगडे, उदय कुंभरजे, मोहन अहिवळे, उस्मान चंदा, विजयनाथ हत्तुरे, शिवानंद बिराजदार, पांडुरंग झेंडे, खंडू साळवे ,गुरुनाथ सुतार, मनोज वाल्हेकर, विजय गोडसे, लक्ष्मण भोसले, विकास साळुंखे यांचा या मध्ये समावेश आहे.

# अणदूरकर सामाजिक संस्थेचे कार्य उल्लेखनीय



## डॉ. सिद्रामप्पा खजुरे : आदर्श सेवानिवृत्त शिक्षक पुरस्काराने जळकोटे सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ११ डिसेंबर-**

सेवानिवृत्त शिक्षकांना परत शैक्षणिक कार्याकडे वळवण्यासाठी त्यांना आदर्श सेवानिवृत्त शिक्षक पुरस्कार देण्याची संकल्पना खूप चांगली असून त्यामुळे या सेवानिवृत्त शिक्षकांच्या ऊर्जेने समाज सुदृढ झाल्याशिवाय राहणार नाही. हेच ईश्वरी कार्य कै. दत्तात्रय अणदूरकर सामाजिक संस्था करीत आहे, असे गौरवोद्गार ज्येष्ठ समाजसेवक डॉ. सिद्रामपा खजुरे यांनी काढले.

ते केशेगाव (ता. तुळजापूर) येथे आयोजित कै. दत्तात्रय अणदूरकर सामाजिक संस्थेच्या वतीने आदर्श सेवानिवृत्त शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी बोलत होते. अणदूर येथून जवळच असलेल्या केशेगाव येथील सेवानिवृत्त जिल्हा परिषद शिक्षक नागनाथ जळकोटे यांना अणदुर येथील कै. दत्तात्रय अणदुरकर सामाजिक संस्थेच्या वतीने यावर्षीचा आदर्श सेवानिवृत्त शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाला व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून केशेगाव चे सरपंच मल्लीनाथ गावडे, सत्कारमूर्ती नागनाथ जळकोटे प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच लक्ष्मण क्षीरसागर, अणदुरचे उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार, अणदूर ग्रामपंचायत सदस्य बाळकृष्ण घोडके पाटील, साने गुरुजी विद्यालय केशेगावचे मुख्याध्यापक जयंत जाधव, कै. दत्तात्रय आणदूरकर सामाजिक संस्थेचे संस्थापक श्रीकांत अणदुरकर उपस्थित होते. यावेळी केशेगावचे उपसरपंच लक्ष्मण क्षीरसागर, डॉ. नागनाथ कुंभार, डॉ. सिद्रामाप्पा खजुरे, केशेगावचे सरपंच मल्लिनाथ गावडे, सत्कार मूर्ती नागनाथ जळकोटे गुरुजी यांची भाषणे झाली. प्रास्ताविक दयानंद कांळुके यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. एम. बी. बिराजदार यांनी केले. सन्मान पत्राचे वाचन शिवशंकर तिरगुळे यांनी केले. या कार्यक्रमास चन्नाप्पा साखरे, मल्लिनाथ जळकोटे, शिवानंद अणदूरचे माजी सरपंच प्रबोध कांबळे, मल्लिकार्जुन नरे, सचिन ढेपे, सचिन गुड्डु, प्रा. डॉ. प्रसन्न कंदले, नेमीनाथ जळकोटे उपस्थित होते, आभार शिवशंकर जळकोटे यांनी मानले.

कै. दत्तात्रय अणदुरकर गुरुजी यांच्या स्मरणार्थ दिल्या जाणाऱ्या पुरस्काराचे हे आठवे वर्ष असून शिक्षक हा कधीच सेवानिवृत्त होत नसतो. त्याच्यातील ऊर्जा ही सेवानिवृत्तीनंतरही समाजाच्या उपयोगी पडावी. प्रत्येक सेवानिवृत्त शिक्षकाने आपण सेवानिवृत्त झाल्यानंतरही विद्यार्थी घडविण्याचे पवित्र कार्य वेगवेगळ्या प्रकारे चालू ठेवावे. जेणेकरून समाजातील विद्यार्थी घडतील, या उदात्त हेतूने संस्था, पत्रकार व मित्र परिवारांच्या विशेष सहकार्याने प्रतिवर्षी हा पुरस्कार सेवानिवृत्त शिक्षकाला प्रदान केला जातो. याही वर्षी हा पुरस्कार दिला असून यापुढेही दरवर्षी हा पुरस्कार दिला जाणार आहे.

**- श्रीकांत अणदुरकर,**
**अध्यक्ष, कै. दत्तात्रय अणदुरकर सामाजिक संस्था**




# इव्हीएमविरोधात वैरागमध्ये जनआंदोलन

## बाळासाहेब आंबेडकर यांच्या हाकेला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**वैराग दि ११ डिसेंबर**

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने राज्यभर जनआंदोलनाची हाक राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांनी राज्यभरातील मतदारांना दिली. वंचित बहुजन आघाडी वैराग व वैराग भागाच्या वतीने ईव्हीएमच्या विरोधात जनआंदोलन स्वाक्षरी मोहीम सुरू करण्यात आली आहे.

टप्प्याटप्प्याने आंदोलन तीव्र करण्यात येणार आहे, अशी माहिती बार्शी तालुकाध्यक्ष बाबासाहेब गायकवाड यांनी दिली. ३ ते १६ डिसेंबरपर्यंत राज्यभर स्वाक्षरी मोहीम राबवण्यात येत आहे. वैराग येथे ईव्हीएमच्या विरोधात स्वाक्षरी मोहीम आंदोलन सुरू केले आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे सोलापूर जिल्ह्याचे संघटक अमोल वाघमारे यांनी मतदार व जनतेला आव्हान केले आहे की स्वाक्षरी मोहिमेत आपण सर्वांनी स्वयंपूर्ण सहभागी होऊन ईव्हीएम हटवण्यासाठी भाग घ्यावा व आंदोलन यशस्वी करण्यासाठी स्वाक्षऱ्या करून सहकार्य करावे तसेच यावेळी वैराग व वैराग भागातील १८०० मतदारांनी येऊन ईव्हीएमच्या विरोधात स्वाक्षरी करून सहभाग नोंदविला आहे. यावेळी उपस्थित वंचित बहुजन आघाडीचे सोलापूर जिल्हा संघटक अमोल वाघमारे, वंचित बहुजन आघाडीचे बार्शी तालुकाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड, उपाध्यक्ष मनोहर कांबळे, वैराग शहराध्यक्ष सुरज वाघमारे, नानासाहेब क्षीरसागर, विजय वाघमारे, अनिल एकुरके उपस्थित होते.

# पंढरपुरात आंतरराष्ट्रीय दत्तक जनजागृती कार्यक्रम साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ डिसेंबर-**

महिला व बाल विकास विभागाच्या निर्देशानुसार वा. बा. नवरंगे बालकाश्रमात आंतरराष्ट्रीय दत्तक जनजागृती कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

राष्ट्रीय पातळीवर नोव्हेंबर महिना दत्तक महिना म्हणून साजरा केला जातो. पंढरपूर येथील हॉस्पीटल, रेल्वे स्टेशन, एस.टी. स्टॅन्ड आदी सार्वजनीक ठिकाणी तसेच पोलीस स्टेशन येथे जनजागृती माहिती फलक लावले.

सदर संस्था गेली १४९ वर्षे झाली मुलांचे दत्तक व पुनर्वसनचे काम करत आहे.कोणतेही बालक परस्पर दत्तक देणे व घेणे हा कायद्याने गुन्हा आहे यासाठी https://cara.wcd.gov.in या संकेतस्थळावर नाव नोंदणी करावी व १८००११३११ या हेल्पलाईनवर सकाळी ८.०० ते रात्री ८.०० वाजेपर्यंत पर्यंत माहिती घ्यावी. तसेच संस्थेत आल्यास सर्व माहिती देण्यात येईल अशी माहिती दिली. बेकायदेशीर दत्तक प्रक्रिया धोकादायक आहे, त्याला पुढे जाऊन अनेक अडचणी येतात, त्याकरीता केंद्राने निर्माण केलेल्या 'लरीर' या एजन्सीव्दारे आपले कायदेशीर दत्तक प्रक्रिया करावी असे आवाहन केले. तसेच या आंतरराष्ट्रीय दत्तक महिन्याचा उद्देश Foster care and Foster care doption या निमित्त बालगृहात प्रवेशित अनाथ, निराधार, निराश्रीत इत्यादी प्राधान्याने मोठ्या वयोगटातील बालकांना प्रतिपालकत्व या योजनेचा लाभ मिळवून देणे हा आहे, असे संस्थेच्या अधिक्षिका राजश्री गाडे यांनी सांगितले. यावेळी धर्मराज डफळे, सुचित्रा पवार, मीरा बडकस यांच्यासह पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले.

# रेशन धान्यासाठी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष आक्रमक



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.११ डिसेंबर-**

पंढरपूर शहरातील व तालुक्यातील गोरगरिब सर्व सामान्य लोकांना अन्न सुरक्षेतील धान्य लोकांना मिळत नाही. याबाबत वारंवारं तक्रार करून देखील सामान्य नागरिकांची दखल घेतली जात नाही. पंढरपूर शहारातील मोठ्या नामांकित लोकांना धान्य मिळते. परंतु सर्व सामान्य अत्यंत गरीब या लोकांना धान्यापासून वंचित राहावे लागत आहे. वारंवारं पाठपुरवठा करून देखील याची दाखल घेतली जात नाही. या सर्व गोष्टींचा गांभिर्य पुर्वक विचार करावा. आणि सर्व सामान्य लोकांसाठी न्याय देण्याचा प्रयत्न करावा अशी मागणी पंढरपूर शहर युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष संदिप शिंदे यांनी पंढरपूरचे तहसिलदार सचिन लंगुटे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यावेळी युवक काँग्रेसचे विधानसभा अध्यक्ष सोमनाथ आरे, काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष अमर सुर्यवंशी, सेवा दल शहराध्यक्ष गणेश माने, युवक शहर उपाध्यक्ष रवि अग्रवाल, उपाध्यक्ष संग्राम मुळे, सोशल मिडीया शहराध्यक्ष महेश अधटराव, जिल्हा सरचिटणीस पांडुरंग डांगे, एकनाथ माने, किसान सेल तालुकाध्यक्ष अक्षय शेळके, वरिष्ठ उपाध्यक्ष आनंद सोमासे यांच्यासह पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

### तहसिलदारांचे आश्वासन

ज्या नागरिकांचे नाव ऑनलाइन नाही ते करण्यात येईल. नागरिकांना शासनाकडून दिला जाणारा माल देण्यात येईल धान्य देत नाहीत त्या रेशन धान्य दुकानदारांवर कारवाई करण्यात येईल असे आश्वासन पंढरपूरचे तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिले.

# नातेपुतेतील जनतेची पाण्यासाठी भटकंती

**नागरिकांमधून तीव्र संताप**

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. ११ डिसेंबर-**

नातेपुते शहरातील पिण्याच्या पाण्याचा ज्वलंत प्रश्न निर्माण झाला असून गेल्या अनेक दिवसापासून नातेपुते शहरतील नागरिकांना नगरपंचायतच्या अनियोजित भोंगळ कारभारामुळे अनियमित पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. या प्रश्नाकडे आपण व नातेपुते नगरपंचायत जाणूनबुजुन दुर्लक्ष करत आहे असे निवेदन सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस कार्याध्यक्ष अक्षय भांड यांनी नातेपुते नगरपंचायत चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिल्या असून निवेदनामध्ये पुढे म्हटले आहे की वेळोवेळी आम्ही नातेपुते नगरपंचायतीला विनंती करून पण पाणी प्रश्नाकडे जाणुन बुजून दुर्लक्ष केले जात आहे त्याचा त्रास नागरिकांना होत आहे.




एवढी मोठी २४ तास पाणीपुरवठा योजना मंजर आहे त्याचे काम पण पूर्ण आहे, तरी दररोज नागरिकांना पिण्याचे पाणी मिळाले पाहिजे, दुरूस्तीच्या नावाने बऱ्याचवेळा अचानक पाणीपुरठा बंद केला जातो तरी आपण दरूस्तीकडे लक्ष देऊन ज्या काही दुरूस्तीबाबतच्या अडचणी आहेत त्या तातडणीने सुरुळीत कराव्यात ज्या दिवशी पाणी सुटणार नाही त्याच्या सूचना दिल्या जात नाहीत, नगरपंचायतीला वाटेल तेव्हा पाणी सोडले जाते, अचानक नियोजनात बदल केला जातो. एवढी मोठी यंत्रणा नातेपुते नगरपंचायतकडे असून पण या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, तसेच मार्च महिन्यात पाणीपट्टी व घरपट्टी वसुली करण्याचा तगादा तुम्ही लावणार, पाणी जर नागरिकांना वर्षभर वेळेवर मिळत नसेल तर यावर्षीची घरपट्टी व पाणीपट्टी माफ करावी ही आमची मागणी आहे, नातेपुते शहरातील सर्व प्रभागांना पाण्याच्या बाबतीत एक समान न्याय द्यावा, कारण प्रत्येक प्रभागात राहणारे नागरिकच आहेत, जिथे कमी दाबाने पाणी सोडले जाते तेथे जास्त वेळ पाणी सोडावे, तसेच नगरपंचायत आणि एम.एस.सी.बी. यांच्यामध्ये समन्वय नसल्यामुळे लाईट अभावी बऱ्याच वेळ पाणी नागरिकांना मिळत नाही. तरी नगरपंचायत व एम.एस.सी.ई.बी. यांच्यामध्ये समन्वय राखन पाण्याचे वेळापत्रक तयार करावे त्याचप्रमाणे स्वच्छता कर्मचारी यांचा मनमानी कारभार चालु आहे त्यांचे स्वच्छतेकडे लक्ष नाही तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांचा चुकारपणा त्यांच्या कामातून दिसत आहे, स्वच्छता अधिकारी, कर्मचारी यांच्या दुलक्षतेमुळे नागरिकांना आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागत आहे. तरी आपण या सर्व समस्यांकडे लक्ष घालावे व ही पाणी समस्या तातडी-येणाऱ्या दोन दिवसामध्ये सोडवावी अन्यथा राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे वतीने आपले विरोधात सोलापूर जिल्हा अधिकारी कार्यालय येथे आंदोलन करण्यात येईल.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# लाडक्या बहिणींच्या ऑक्टोबर महिन्यातील अर्जांची पुर्नछाननी प्रक्रिया सुरू

- नव्या मंत्रिमंडळाच्या स्थापनेनंतर रक्कम होणार जमा
- महिला व बालकल्याण अधिकारी प्रसाद मिरकले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ डिसेंबर-**

महायुती सरकारसाठी मोठी गेम चेंजर राहिलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू राहणार का? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. सरकार स्थापन झाल्यानंतर लाडक्या बहिणींची अपेक्षा वाढली असून पुढील हप्ता केव्हा प्राप्त होत आहे याकडे सर्व लाडक्या बहिणींचे लक्ष लागलेले आहे. मात्र यासाठी काही निकष लावले जातील अशा चर्चा समाज माध्यमांमध्ये ऐकण्यास मिळाल्या.

मात्र यासंबंधी कोणताही ठोस निर्णय झाला असल्याचे जिल्हा परिषद महिला व बालकल्याण विभागाकडून सांगण्यात आले आहे. यासंबंधी अधिक माहिती विचारली असता जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी प्रसाद मिरकले यांनी सांगितले की, ज्या महिलांचा अर्ज छाननी प्रक्रियेत अडकला आहे त्या महिलांना अर्जांच्या छाननी नंतर लाभाची रक्कम खात्यात जमा होईल. त्यासाठी ऑक्टोबर महिन्यात ज्या ज्या लाभार्थी महिलांनी अर्ज दाखल केले आहेत त्या-त्या सर्व महिलांचे अर्जांचे छाननी प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.




दरम्यान, अडीच लाखाचे उत्पन्न आणि एका घरात एकाच महिलेला मिळणार लाभ, अशा ज्या काही अफवा ऐकण्यास मिळत होत्या, त्यावर त्यांनी भाष्य करताना सांगितले की, एका कुटुंबातील एक प्रौढ महिला आणि एक अल्पवयीन मुलगी यांना सदरचा लाभ मिळणार आहे. तसेच ज्या घरात एकत्र कुटुंब पद्धती आहे. त्या घरात देखील रेशनकार्ड पद्धतीने कुटुंबाचे वर्गीकरण करून महिलांना निधी दिला जाणार असल्याचे सांगितले. त्यामुळे एका घरात एका महिलेला निधी मिळेल, बाकीच्या महिलांना मिळणार नाही. अशी जी काही अफवा होती त्यावर पडदा पडलेला आहे. तसेच ज्या लाभार्थ्या महिलांचे उत्पन्न अडीच लाखांच्यावर असेल, त्यांना लाभ मिळणार नाही. हे यापूर्वीच अटी आणि शर्तींमध्ये जाहीर केले होते. त्यामुळे त्याबाबत कोणताही प्रश्नचिन्ह निर्माण होणे गरजेचे नाही. असे सांगत, नव्या मंत्रिमंडळानंतरच सदरच्या योजनेचा निधी प्राप्त होईल असे देखील मिरकले यांनी सांगितले आहे.



# सिद्धेश्वर सार्वजनिक वाचनालयतर्फे आ. देवेंद्र कोठे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ डिसेंबर-**

नवनिर्वाचित आमदार देवेंद्र कोठे यांचा श्री सिद्धेश्वर सार्वजनिक वाचनाल याच्यावतीने अध्यक्ष प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी नगरसेवक राजकुमार हंचाटे उपस्थित होते.

यावेळी भाजपा जिल्हा उद्योग आघाडीचे कार्यकर्ते शिवराज बिराजदार, मयुरेश जामदार यांनी भाजपा उद्योग आघाडीच्या कार्या संदर्भात आमदार देवेंद्र कोठे यांच्याशी चर्चा केली. सार्वजनिक वाचनालयाच्या प्रश्नासंदर्भात प्रा.डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी माहिती दिली.व सार्वजनिक वाचनालयाचे प्रश्न सोडविण्याची विनंती केली. सार्वजनिक वाचनालयाच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी मदत करण्याचे आश्वासन आ. कोठे यांनी दिले.



# जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाकडून मानवी हक्क दिनानिमित्त रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व सु.रा. मुलींची प्रशाला, सेवासदन यांच्या संयुक्त विद्यमाने मानवी हक्क दिनानिमित्त रॅली काढून जनजागृती करण्यात आली. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश मो. सलमान आझमी यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व सु. रा मुलींची प्रशाला, सेवासदन यांच्या संयुक्त विद्यमाने मानवी हक्क दिन रॅली काढून साजरा करण्यात आला.

जनजागृती फेरीत सेवासदन प्रशालेतून सर्व विद्यार्थीनी सहभाग नोंदविला. ही फेरी नवीवेस पोलीस चौकी, सरस्वती चौक मार्गे काढण्यात येवून परत सेवासदन प्रशालेत समारोप करण्यात आले. फेरीमध्ये 'माझे हक्क, माझे भविष्य, आत्ताच' या २०२४ रोजी मानवाधिकार दिनानिमित्त थीम च्या घोषणा देण्यात आल्या. याप्रसंगी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव उमेश देवर्षी, लोकअभिरक्षक विधिज्ञ श्रीमती देवयाणी किणगी, सेवासदन शाळेचे उपमुख्याधिपीका नंदीनी बारभाई, पर्यवेक्षक स्वाती पोतदार, शाळेतील मिरा केंद्रे, लक्ष्मी कमळे, जयश्री पवार व श्रुती मोहोळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



# रजनीश रेसिडन्सी पार्क येथे २०४ कोटींच्या ड्रेनेजच्या कामाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ विभागातील ४३२ कोटींच्या नव्या ड्रेनेज कामाच्या अंतर्गत आज एसआरपी कॅम्प जवळील (कटगेरी मळा) येथील रजनीश रेसिडन्सी पार्क येथे ड्रेनेज पाईप टाकण्याचे कामाचे उद्घाटन झाले. गेल्या २० वर्षांपासून या भागात वसाहत असून सुद्धा ड्रेनेजपासून वंचित होते.

पण येथील मूळ रहिवासी कटगेरी व त्यांचे सहकारी मनपाकडे वारंवार पाठपुरावा करून येथील रजनीश रेसिडन्सी पार्क, आदित्य नगर, आर्यश पार्क, विश्वनगर हा भाग मनपा हद्दवाढ भागात होणाऱ्या नव्या ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी ४३२ कोटींच्या योजनेत हा संपूर्ण परिसर समाविष्ट करण्यासाठी या भागातील संबधित अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष आणून वारंवार सर्वेक्षण करुण घेतला. याप्रसंगी सुभाष कटगेरी, लक्ष्मण बेळ्ळूरे, मेणसंगी, शिवा हरगिरी, सतिश कोटे, बिराजदार, लक्ष्मी कंपनीचे मॅनेजर जोशी व त्यांचे सहकारी व उपठेकेदार शिवा बिराजदार उपस्थित होते.

# अन्यथा महापालिकेची निवडणूक राष्ट्रवादी शरद पवार पक्ष स्वतंत्र लढविणार

- आमचाच महापौर असेल :ॲड.यु.एन.बेरिया

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ डिसेंबर-**

महापालिका निवडणुकीत काँग्रेस व शिवसेनेशी आघाडी करायची का नाही याबाबतचा निर्णय राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वरिष्ठ स्तरावर घेण्यात येणार आहे. दरम्यान, जर आघाडी नाही झाली तर महापालिकेची निवडणूक आम्ही स्वतंत्रपणे लढविण्याच्या तयारीत आहोत असे स्पष्टीकरण राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड.यु.एन. बेरिया यांनी पत्रकार परिषदेत दिले.

येणारी सोलापूर महापालिका निवडणूक ही शिवसेना उबाठा गटाने स्वतंत्र लढण्याचा निर्णय जाहीर केला आहे. दरम्यान काँग्रेस आमचा मोठा भाऊ आहे. त्यांची इच्छा असेल तर आम्ही आघाडी अंतर्गत त्यांच्यासोबत लढविणार आहोत अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष स्वतंत्रपणे महापालिका निवडणूक लढविण्यासाठी तयार आहे. येणाऱ्या सोलापूर महापालिका निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला बहुमत मिळेल आणि आमचाच महापौर असेल, असा विश्वासही यावेळी एड. बेरिया यांनी व्यक्त केला आहे.



काल माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी येथील सभेत भाजपचे आ. गोपीचंद पडळकर आणि सदाभाऊ खोत यांनी खालच्या पातळीवर जाऊन एकेरी भाषेत नेते शरद पवार यांच्यावर टीका केली, ती दुर्दैवी आहे. केवळ देवेंद्र फडणवीस यांना खुश करण्यासाठी तसेच मंत्रिपद मिळविण्यासाठी पडळकर आणि खोत यांनी असा प्रकार केला केला आहे असे सांगतानाच या प्रकाराचा एड. बेरिया यांनी तीव्र शब्दात निषेध केला. विधानसभा निवडणुकीत महायुतीने ईव्हीएम हॅक करून सत्ता मिळवली याबाबत काल दिल्लीत आमच्या पक्षाची बैठक होऊन या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अमेरिकेच्या शास्त्रज्ञांनी इंडियन ईव्हीएम हॅक होऊ शकते असे सांगितले आहे. त्यामुळे ईव्हीएम हॅक करून महायुतीने सत्ता मिळवली याला पुष्टी मिळते, असा आरोपही यावेळी ॲड. बेरिया यांनी केला आहे.

# धवलसिंह मोहिते पाटलांनी आत्मपरीक्षण करावे : चेतन नरोटे

**पक्षातच राहून काँग्रेसच्या विरोधात काम करणाऱ्यांनी राजीनामा देण्याची केली टीका**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ डिसेंबर**

काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते पाटील यांनी सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष पदाचा राजीनामा प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे सुपूर्द केला. त्यानंतर आता काँग्रेस पक्षामध्ये चांगलाच कलगीतुरा रंगलेला दिसत आहे. धवलसिंह मोहिते पाटील यांनी आपल्या पत्रात शिंदे परिवारावर टीकास्त्र सोडल्यानंतर काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी धवलसिंह मोहिते पाटील यांचा खरपूस समाचार घेतला आहे.

दरम्यान, शहराध्यक्ष नरोटे यांनी मोहिते पाटील यांच्या पत्राचा आधार घेत, आपल्या राजीनामा पत्रात अनेक खोट्या गोष्टींचा उल्लेख केला. धवलसिंह मोहिते पाटील हे आजपर्यंत अनेक पक्ष फिरून आले. वास्तविक पाहता ते भाजपमध्ये जाणार हे आम्हाला आठवडयापूर्वीच कळाले होते. आपल्या राजकीय स्वार्थासाठी धवलसिंह मोहिते पाटील यांनी आजपर्यंत अनेक पक्ष बदलले आहेत. ते नेहमी जिथे सत्ता असते तिकडे ते जातात. त्यांना कुठल्याही पक्षाशी काहीही देणेघेणे नाही. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांना भेटून काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याची इच्छा व्यक्त केली होती. शिंदे यांनी सन्मानाने जिल्हाअध्यक्ष केले. त्यांना कायम साथ दिली असताना सुद्धा जाताना सन्मानाने न जाता





शिंदे परिवाराबद्दल विष ओकून गेले. पद घेताना नेत्यांचे दहा वेळा हात जोडायचे आणि जाताना त्याच नेत्यांवर टीका करायचे ही कुठली पद्धत आहे? असा सवाल उपस्थित करताना मोहिते पाटील यांना चेतन नरोटे यांनी आरसा दाखवला आहे. तसेच त्यांनी माझ्यावर हि टीका केली. माझ्या प्रभागात लोकसभा निवडणुकीत लीड नाही म्हणून खोटे बोलले. वास्तविक पाहता लोकसभा निवडणुकीत माझ्या प्रभागात प्रणितीताई शिंदे यांना ९४४१ मते मिळाली तर भाजपचे उमेदवार राम सातपुते यांना ७४८६ मते मिळाली. १९५५ मताची लीड प्रणिती शिंदे यांना माझ्या प्रभागातून मिळाली आहे. पक्षाचा आदेश म्हणून विधानसभा निवडणूक लढवलो. निवडणुकीत हार जीत होत असते. यापुढे ही पक्षासाठी लढत राहू. काही लोक काँग्रेस पक्षात राहून काँग्रेस पक्षाच्या विरोधात काम करत असतात त्यांनी पक्षाचा राजीनामा द्यावा, अशी खोचक टीका केली आहे.

# १३ वर्षाच्या मुलाचे अपहरण करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर -**

शहरातील दक्षिण कसब्यातून १३ वर्षीय मुलाचे अपहरण करणाऱ्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत राजेश्री चंद्रकांत बहिरवाडे (वय ३८, रा. दक्षिण कसबा, दाते पंचाग ऑफीसजवळ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञाताविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यश चंद्रकांत बहिरवाडे (वय १३) असे अपहरण झालेल्या मुलाचे नाव आहे. १० डिसेंबर रोजी सकाळी सव्वा आकराच्या सुमारास राजेश्री बहिरवाडे यांचा मुलगा यश हा घरातून मी दुकानातून पेन आणतो असे सांगून निघून गेला.

त्यानंतर दुपारी १२ च्या सुमारास अनोळखी मोबाईल नंबरवरून फोन करून मी थोड्या वेळात घरी येतो असे सांगून फोन कट केला. त्यानंतर राजेश्री बहिरवाडे यांनी आलेल्या नंबरवर कॉल केला असता बहिरवाडे यांच्या मुलाने सोलापूर रेल्वे स्टेशनवरील फ्लॅटफॉर्म नं ३ येथे असताना बहिरवाडे यांना कॉल केला असल्याचे समजले. त्यामुळे बहिरवाडे यांनी रेल्वे स्टेशनवर जाऊन यशचा शोध घेतला असता तो मिळून आला नाही. त्यामुळे यशचे कुणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरून अपहरण केल्याप्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक कामुर्ती पुढील तपास करीत आहेत.



**७० फुट रोड भाजी मंडईत वाहतूकीची कोंडी...**
**सोलापूर : शहरात सध्या वाहतूकीचा पूरता बोजवारा उडाला आहे. बुधवारी सायंकाळी ७० फुट रोड भाजी मंडई रोडवर भाजी विक्रेत्यांच्या अतिक्रमणामुळे वाहतूकीची मोठी कोंडी निर्माण झाली होती.**

# मार्केट यार्डातील आणि शहरातील किरकोळ बाजारपेठेत भाज्यांच्या दरात तफावत

- ग्राहकांची भाजी खरेदीसाठी मार्केट यार्डात वाढती गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ डिसेंबर**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विक्रीसाठी येत असलेला शेतमाल हा कमी दरात उपलब्ध होत असल्याने, किरकोळ भाजी विक्रेत्यांनी मार्केट यार्ड मध्येच किरकोळ भाजीपाला बाजारपेठ उभारली आहे. या बाजारपेठेत भाजीपाल्यांचे दर हे शहरातील इतर मार्केट दरापेक्षा कमी असतात. त्यामुळे भाजीपाला खरेदी करण्यासाठी मार्केट यार्डच्या भाजीपाला बाजारात ग्राहकांची गर्दी दिवसेंदिवस वाढत चाललेली दिसत आहे.

दरम्यान, शेतकरी आपला विविध शेतमाल बाजारपेठेत विक्रीसाठी आणत असतो. त्याला बाजारपेठेत घाऊक दर प्राप्त होतो. किरकोळ भाजीपाला विक्रेते यादराने भाजी खरेदी करतात. आणि त्याच ठिकाणी किरकोळ बाजारपेठेत भाजीपाला विक्री करतात. तेव्हा त्या भाजीपाल्यांचे दर इतर मार्केट पेक्षा कमी ठेवतात. त्यामुळे बाजार समितीमधील भाजी मार्केटमध्ये भाजी खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी वाढत आहे. शहरातील इतर भाजीपाला मार्केट पेक्षा येथे तब्बल २० रुपयांचा फरक दिसून येतो.

दीड महिन्यापूर्वी भाज्यांच्या आवक कमी झाल्यामुळे दर गगनाला भिडले होते. अशावेळी ग्राहकांना भाजी खरेदी करणे सोयीस्कर नव्हते. आता मात्र भाज्यांची आवक वाढून देखील दर घटले, तरीही शहरातील लक्ष्मी मार्केट, विजापूर रोड मार्केट, डी मार्ट परिसर, आसरा चौक, रेल्वे स्टेशन, ७० फूट रोड मार्केट, परिसरातील भाजीमंडईत पालेभाज्यांचे दर वेगवेगळे आहेत. मार्केट यार्डातील भाज्यांच्या लिलावात मिळणाऱ्या दराच्या तुलनेत या मंडईत प्रति किलोमागे दहा ते वीस रुपयांचे दर जास्त दिसून येत आहेत. त्या पाठीमागे भाजी वाहतूक खर्च नफा जोडल्याने दरात मोठे तफावत दिसून येत आहे.

**भाजीपाल्यांचे दर प्रति किलो रुपये प्रमाणात**

| भाजी प्रकार | यार्डातील दर | मंडईतील दर |
|---|---|---|
| वांगी | ५ ते २० | ६० |
| टोमॅटो | २ ते ११ | ४० |
| हिरवी मिरची | १५ ते २५ | ३५ |
| ढब्बू मिरची | ७ ते २३ | ३० |
| दोडके | ५ ते २५ | ६० |
| काकडी | ५ ते २० | २० |
| गवारी | ३ ते ५ | ४० |
| भेंडी | ८ ते ३० | ६० |
| गाजर | ७ ते ४२ | १०० |
| घेवडा | १५ ते २० | ६० |
| कोबी | ५ ते १२ | ४० |
| | | |

**येथून होतेय भाजीपाल्याची आवक**
सोलापूर जिल्ह्यासह शेजारील इंदापूर, सांगली, सातारा, लातूर, धाराशिवसह कर्नाटक.



**दर कमी असल्यामुळे भाज्यांच्या खरेदीसाठी येतो**

मार्केट यार्डमध्ये लिलावात किरकोळ स्वरूपात भाजी मिळत नाही. मात्र तेथे किरकोळ बाजारपेठ असल्याने भाज्यांचे दर कमी प्रमाणात आहेत. असे कळल्यानंतर यार्डामध्ये भाजी खरेदीसाठी जातो. परंतु वाहतूक खर्च त्याच प्रमाणात करावा लागतो.

**- शशिकला जोशी, गृहिणी**

भाजीपाल्याची आवक आता वाढलेली आहे. त्यामुळे दरातही मोठी घसरण झाली आहे. सुमारे दोन महिने बाजारपेठेत ही स्थिती कायम राहील असा अंदाज आहे. बाजार समितीमधील किरकोळ बाजारपेठेत दर कमी असल्याने ग्राहकांची वर्दळ वाढत आहे. उन्हाळ्यात भाजीपाल्याचे उत्पादन कमी होऊन दर वाढण्याची शक्यता आहे.

**- शीलसिद्ध माळगे, भाजीपाल्याचे व्यापारी**

# मेहता शाळेची किल्ले रतनगड दुर्ग अभ्यास मोहीम; ८९ विद्यार्थ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दुर्ग अभ्यास मोहीम कै. वि. मो. मेहता शाळेने आयोजित केली होती. सह्याद्रीतील एक अनमोल रत्न व निसर्ग सौंदर्याने पुरेपूर नटलेला किल्ला रतनगड या किल्ल्याची निवड केली.

या मोहिमेत शाळेच्या मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी व त्यांचे चार सहकारी तसेच या मोहिमेला मार्गदर्शन करणारे इतिहास संशोधक मंडळाचे सदस्य व प्रसिद्ध व्याख्याते, इतिहासकार राहुल नलावडे उर्फ रायबा दादा व त्यांच्या सहकार्याने ही मोहीम यशस्वीपणे पार पाडली.



सुरुवातीला निसर्ग संपन्न भंडारदरा परिसर पाहिला. त्यामध्ये प्रसिद्ध असा रंधा धबधबा तसेच भंडारदरा धरणाच्या जलाशयात बोटिंगचा आनंद घेतला. छत्रपती शिवरायांच्या आरमाराची व बसरूरच्या लढाईची माहिती रायबा दादांनी मुलांना दिली. तेथून पांजरी या गावी रानवाटा या फार्म हाऊसवर मुक्काम केला. यासाठी मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी, बाळकृष्ण पाटील, निलेश व्यवहारे, सविता पाटील, अनंत दिवाणजी, प्रसिद्ध ट्रेकर, इतिहासकार राहुल नलावडे व त्यांचे सहकारी राहुल रासकर, शशी घुमरे, शुभम बोडके व आकाश देशमुख यांनी ही दुर्ग अभ्यास मोहीम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. या मोहिमेत ८९ विद्यार्थी सहभागी झाले होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## गड्डा यात्रेसाठी होम मैदानाचा ६ कोटी २१ लाखांचा लिलाव

### मुंबईचे चौधरी यांना प्राप्त झाले टेंडर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ डिसेंबर**

सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर महाराजांची यात्रा जानेवारी महिन्यात होणार आहे. या यात्रेसाठी महापालिकेच्या मालकीचे असलेले होममैदान श्री सिध्देश्वर देवस्थानला नाममात्र

भाडेतत्वावर दिले जाते. त्याठिकाणी विविध स्टॉल्स, आणि मनोरंजन नगरी उभी करण्यात येते. सदर जागा खासगी लोकांना लिलाव पध्दतीने दिले जाते. त्यानुसार लिलाव प्रक्रिया राबविण्यात आली. यंदाचा लिलाव ६ कोटी २१ लाख रुपयांना मुंबईचे चौधरी यांना देण्यात आला आहे. यामधून आलेले उत्पन्न हे श्री सिध्देश्वर देवस्थान कमिटीला दिले जाते.

दरम्यान, श्री सिध्देश्वर यात्रेच्या अनुषंगाने सोलापुरात महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक, तेलंगणासह विविध राज्यातून भाविक मोठ्या संख्येने येत असतात. जवळपास महिनाभर चालणाऱ्या यात्रेत कोट्यावधी रुपयांची उलाढाल होते. यंदा हा लिलाव घेण्यासाठी कर्नाटक, महाराष्ट्र आणि गुजरात येथील व्यापारी सहभागी झाले होते. त्यांच्याकडून मागविण्यात आलेली बंद पाकिटे मंगळवारी उघडण्यात आली. सर्वाधिक बोली ही चौधरी यांची असल्याने त्यांना ६ कोटी २१ लाख रुपयाला होम मैदानाचा ताबा देण्यात आला. याची संपूर्ण प्रक्रिया धर्मादाय आयुक्तांकडून राबविण्यात आली.



**क्राईम वृत्त...**




### गाय घसरून अंगावर पडल्याने एकजण जखमी

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर -**

बेलाटी (ता. उत्तर सोलापूर) येथे गाय घसरून अंगावर पडल्याने एकजण जखमी झाला. शांताराम ज्ञानोबा कांबळे (वय ४५) असे जखमीचे नाव आहे. ११ डिसेंबर रोजी सकाळी ११ च्या सुमारास राहत्या घरातून शांताराम कांबळे हे शेताकडे गाय घेऊन जात होते. त्यावेळी अचानक गाय उधळल्याने गाय घसरून शांताराम यांच्या अंगावर पडली. त्यामध्ये शांताराम कांबळे हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना पुतण्या करण कांबळे याने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### चारचाकी वाहनाने कट मारल्याने रिक्षा पलटी

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर -**

शहरातील सात रस्ता येथे चारचाकी वाहनाने कट मारल्याने रिक्षा पलटी होऊन झालेल्या अपघातात दोघे जखमी झाले. भारती देवरपागलू (वय ४०) आणि नालम्मा नरसिंग देवरपागलू (वय ६०, रा. सात रस्ता, सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. ११ डिसेंबर रोजी पहाटे चारच्या सुमारास भारती व नालम्मा या दोघी रिक्षातून स्टेशन ते झकास हॉटेल या रस्त्यावरून येत होत्या. त्यावेळी सात रस्ता येथे व्हिआयपी रोडवरून येणाऱ्या चारचाकी वाहनाने रिक्षाला कट मारल्याने रिक्षा पलटी होऊन अपघात झाला. यामध्ये भारती व नालम्मा या दोघी जखमी झाल्याने त्यांना रिक्षाचालक किशोर जाधव याने शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करणयात आली आहे.

### विषारी औषध प्राशन करून महिलेचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर -**

शहरातील कुचन नगर येथे सडा मारण्याचे विषारी औषध प्राशन करून महिलेने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. लक्ष्मी विजय बैरी (वय ४७, रा. कुचन नगर, सोलापूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. लक्ष्मी बैरी यांनी ११ डिसेंबर रोजी सकाळी ९ च्या सुमारास राहत्या घरी अज्ञात कारणावरून अंगणात सडा मारण्याचा पिवळा कलर पाण्यात घालून प्राशन केला. त्यामुळे लक्ष्मी यांना त्रास होऊ लागल्याने त्यांना उपचारासाठी विजय बैरी यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### यशश्री अपार्टमेंटमध्ये लातूरच्या तरूणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर -**

शहरातील अश्विनी हॉस्पीटलजवळील यशश्री अपार्टमेंटमध्ये लातूरच्या तरूणाने विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. हणमंत जनार्दन जगताप (वय ३७, रा. लातूर) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्याचे नाव आहे. १० डिसेंबर रोजी रात्री यशश्री अपार्टमेंट येथे राहणाऱ्या भावाच्या घरी हणमंत जगताप यांनी अज्ञात कारणावरून विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. हणमंत यांना त्रास होऊ लागल्यानंतर पुतण्या रोहन जगताप यांनी त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे,

### महिलेला शिवीगाळ करून विनयभंग करणाऱ्यावर गुन्हा

**सोलापूर, दि. ११ डिसेंबर -**

आजारी महिलेला अश्लिल शिवीगाळ करून तिच्या मनाज लज्जा उत्पन होईल असे कृत करून विनयभंग करणाऱ्याविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन अब्बास शेख (रा. मल्लिकार्जुन नगर, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १० डिसेंबर रोजी यातील पिडीता ही आजारी असल्याने रात्री दहाच्या सुमारास हॉस्पीटलमध्ये उपचारासाठी चालत जात होती. त्यावेळी अब्बास शेख याने पिडीतेला अश्लिल शिवीगाळ करून तिचा हात पकडून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार नवले पुढील तपास करीत आहेत.

# उजनीतील कुगाव ते शिरसोडी पुलाच्या कामास सुरुवात

### पाठपुराव्याला यश, उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिली होती मंजुरी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.११ डिसेंबर-**

कुगाव-शिरसोडी पुलाच्या कामाला सुरुवात झाल्याने करमाळा व इंदापूर तालुक्यातील नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे. उजनी पाणलोट क्षेत्रातील करमाळा तालुक्यातील गावांना इंदापूर तालुक्यातील हाकेच्या अंतरावरील गावात जाण्यासाठी रस्ते मार्गाने ८० ते ९० किमी भिगवण टेंभुर्णी येथून वळसा घालून किंवा जीव धोक्यात घालून जलमार्गाने प्रवास करावा लागतो. परिणामी आत्तापर्यंत ४० हून अधिक प्रवाशांना जलसमाधी मिळाली आहे. यासाठी उजनी जलाशयात जोडपुलाची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होती.

विधानसभा निवडणुकीपूर्वी या कामाचे भूमिपूजन झाले होते. आता या कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाल्याने दोन्ही काठच्या ग्रामस्थांतून समाधान व्यक्त होत आहे. तिन्ही बाजूंनी ३० किलोमीटर पाण्याने वेढलेल्या कुगावसह परिसरातील चिखलठाण, दहीगाव, शेटफळ, पोफळज, केडगाव, पूर्व सोगाव, बिटरगाव आदी गावांना इंदापूर तालुक्यातील गावांशी दळणवळणाचा प्रश्न बिकट होता. धोकादायक जलमार्गानेच प्रवाशी वाहतूक करावी लागत होती. विधानसभा निवडणुकीपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या पुलाच्या कामाला मंजुरी देऊन २३ ऑगस्ट रोजी भूमिपूजन केले. या पुलाचे काम वेगाने चालू झाले आहे.





गोयेगांव आजोती दरम्यान उजनी जलाशयात जोड पूल बांधण्यासंदर्भात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे. यासंदर्भात वेळोवेळी गडकरी यांची भेट घेऊन तसेच कार्यालयाशी संपर्कात राहून पाठपूरावा सुरु आहे.

**- धैर्यशील मोहिते-पाटील, खासदार, माढा**

### ९०० दिवसांत काम होणार पूर्ण



कुगाव ते शिरसोडी पुलाचा विषय मार्गी लावण्यासंदर्भात कुगाव सरपंचपदी कार्यरत असताना केलेल्या प्रयत्नास सोलापूर जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री आमदार दत्तात्रय भरणे यांच्याकडे केलेल्या पाठपुराव्यामुळे यश मिळाले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत मंजुरी दिली. सद्या कामास सुरुवात झाली असून ९०० दिवसात काम पूर्ण करण्याची अट टाकण्यात आली आहे. हा पूल झाल्यावर पर्यटन, मत्यव्यवसाय, पक्षी निरीक्षण, कृषि व दळणवळण व्यवस्था बळकट करण्यासाठी चालना मिळणार आहे.

**-तेजस्विनी दयानंद कोकरे, माजी सरपंच, कुगाव, ता. करमाळा**

उजनी लाभक्षेत्रातील कुंभेज फाटा ते डिकसळ दरम्यानचे सर्वांना सोयीस्कर असणारे गोयेगाव ते आगोती हे ठिकाण आहे. गोयेगाव ते आगोती दरम्यान पूल झाला तर पूर्वेकडून उमरड तसेच पश्चिमेकडून पोमलवाडी उत्तर दिशेकडून सावडी, कोर्टी,पोंधवडी राजुरी परिसरातील गावांना हे ठिकाण सोईस्कर ठरणार आहे. लवकरच मंजूरी मिळण्याची अपेक्षा आहे

**-गोरखनाथ पवार, गोयेगांव, ता. करमाळा**

उजनी जलाशयाचा भौगोलिक विस्तार मोठा आहे. करमाळा तालुक्यातील पश्चिम भागातील गावांना दळणवळण सोईस्कर व्हावे यासाठी डिकसळ पूलास शासनाकडून मंजूरी मिळून कामही सुरू झाले आहे. परंतु हे दोन्ही पूल झाले तरी उजनी जलाशय काठावरील मध्यवर्ती गावांना आरोग्य, शिक्षण यासाठी इंदापूर, बारामती येथे जाण्यासाठी ८० ते ९० किलोमीटरहून अधिक वळसा घालून जावे लागणार आहे. त्यामुळे गोयेगाव ते आगोती दरम्यान पूल व्हावा अशी मागणी आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने सर्व्हेक्षण करुन राज्य शासनाकडे अहवाल पाठवला आहे. परंतु अद्यापही यावर कुठलाही ठोस निर्णय झाला नाही.

### पाठपुराव्याचे फलित

गोयेगाव ते आजोतीदरम्यान पूल उभारण्यात यावा, यासाठी देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय गणेश कराड यांनी देवेंद्र फडणवीस यांची तसेच माढा लोकसभा मतदारसंघाचे खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केंद्रीय रस्ते विकास वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची दिल्ली येथे प्रत्यक्ष भेट घेत गोयेगाव आगोती पूल करण्यासंदर्भात मागणी केली आहे. तसेच आ. नारायण पाटील व मकाईचे माजी चेअरमन दिग्विजय बागल यांनी विधानसभा निवडणुकीदरम्यान पूल करण्यासाठी प्रयत्न करु अशी ग्वाही दिली आहे.

### ३९४ कोटींची प्रशासकीय मान्यता

कुगाव ते शिरसोडीदरम्यान उजनी बॅकवॉटर पात्रात १,३२० मीटरचा पूल असून कुगाव बाजूला ४२० मीटरचा भराव आहे. शिरसोडी बाजूला २५० मीटरचा भराव आहे. या पुलासाठी राज्य शासनाने ३९४ कोटीची प्रशासकीय मान्यता दिली असून २८४ कोटी ५३ लाखाची ई-निविदा काढली होती. मे. टी. ॲन्ड टी पुणे या काम करणाऱ्याकंपनीला ३०७ कोटींना ठेका मिळाला असून ९०० दिवसांत काम पूर्ण करण्याची अट टाकण्यात आली आहे



सोलापूर : कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलात सुरू असलेल्या ओॲसिस सोलापूर ओपन २५हजार डॉलर महिला आयटीएफ टेनिस स्पर्धेत रशियाच्या एकतेरिना काझिओनोव्हाच फटका मारताना टिपलेला क्षण.

### विडी घरकुलमध्ये वृद्धाची आत्महत्या

**सोलापूर, दि.११ डिसेंबर-**

शहरातील हैदराबाद रोडवरील विडी घरकुल येथे राहणाऱ्या वृध्दाने गळफास घेऊन आत्महत्या केली.

यलप्पा नरसिंहलू नंगी (वय ६७, रा. २०/८४, विडी घरकुल, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या वृध्दाचे नाव आहे. ११ डिसेंबर रोजी दुपारी राहत्या घरी किचन रुममध्ये पत्र्याच्या लोखंडी अँगलला अज्ञात कारणावरून यलप्पा नंगी यांनी साडीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे दिसून आले. याची माहिती मिळताच एमआयडीसी पोलिस ठाण्याकडील पोलिस हवालदार ए एन शेख यांनी नंगी यांना खाली उतरवून बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. विजय सुरवसे यांनी नंगी यांना मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## बिटकॉईनच्या माध्यमातून चार लाखांची फसवणूक

### तेरा मोबाईल हॅक करके, तेरा व्हिडिओ बनाके बदनामी करेंगेंची धमकी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर -**

शहरात बिटकॉईनच्या माध्यमातून तरूणाची चार लाख पाच हजारांची फसवणूक करणाऱ्याविरुद्ध एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत प्रविणकुमार सुरेश अकिम (वय ३४, रा. एफ ग्रुप, विडी घरकुल) यांच्या फिर्यादीवरून विवेक बाळकृष्ण मिश्रा (रा. माहिती नाही) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रविणकुमार अकिम हे ८ नोव्हेंबर २०२२ रोजी घरी विवेक गोल्डन या यू ट्यूबवरील विवेक मिश्रा याचा व्हिडीओ पहात होते. त्यावेळी अकिम याने मिश्रा या मोबाईल नंबर मिळवून त्याचीशी फोनवरून बोलणे केले. त्यानंतर मिश्रा याने अकिम यांस वेळोवेळी फोन करून विविध बिटकॉईनमध्ये गुंतवणुक केल्यास जादा परतावा व रक्कम दामदुप्पट होणार असल्याबाबतचे व्हिडीओ पाठवू लागला. ते व्हिडीओ अकिम याने पाहून व मिश्रा याच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन वेळोवेळी



गुगल पे, फोन पे द्वारे १३ मार्च २०२४ पर्यंत ४ लाख ५ हजार रुपये बिटकॉईनमध्ये रक्कम गुंतविली. मिश्रा याने अकिम यास दुप्पट परतावा देतो असे खोटे सांगून अकिम याच्या रकमेचा स्वतःच्या फायद्यासाठी वापर करून घेऊन अकिम यास कोणतीही रक्कम किंवा कुठलाही परतावा परत दिलेला नाही. त्यामुळे अकिम यांनी मिश्रा याचा दुसरा मोबाईल क्रमांक मिळवून त्यास संपर्क केला असता तो अकिम यास ओळखत नाही, कसले पैसे, हमारे से पंगा मत लो, नहीं तो तेरा मोबाईल हॅक करके तेरा व्हिडीओ बनाके बदनामी करेंगे और तुझे कहीं मुंह दिखाने को जगाह नहीं रहेंगी, पुलीस भी तेरे पिछे पडेगी अशी धमकी दिली. म्हणून अकिम यांच्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक खोमणे पुढील तपास करीत आहेत.

## दयानंद शिक्षणशास्त्र महाविदयालयास सर्वसाधारण विजेतपद

### पुणे विभागीय युवा महोत्सव

### सचिन घंटे गोल्डनबॉय, सेजल कवठेकर गोल्डन गर्ल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर -**

दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालयाने पुणे विभागीय युवा महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. अक्कलकोटच्या सी. बी. खेडगी महाविद्यालयाचा सचिन घंटे गोल्डनबॉय तर सांगोला महाविद्यालयाची सेजल कवठेकर गोल्डन गर्लची मानकरी ठरली. उत्कृष्ठ संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. भाग्यश्री राठोड यांना सन्मानित करण्यात आले.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे अंतर्गत व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे या युवा महोत्सवाचे आयोजन येथील निर्मलकुमार फडकुले सभागृहात केले होते. याचे उदघाटन जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी क्रीडा व युवक सेवा पुणे विभागाचे उपसंचालक युवराज नाईक, जिल्हा




क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, जिल्हा युवा अधिकारी अजितकुमार, दयानंद शिक्षण शास्त्र महाविदयालयाचे प्राचार्य एस.बी. क्षीरसागर, राज्य क्रीडा मार्गदर्शक गणेश पवार, क्रीडा अधिकारी नदिम शेख, सुनिल धारुरकर, दशरच गुरव, श्रीधर देशमुख, राहूल हजारे, खंडू शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी तज्ञ प्रशिक्षक पंच म्हणून डॉ. पंकज पवार, डॉ. सिध्दार्थ सोरटे, मनोज अंकुश, राजेश पवार, किरण लोंढे, प्रा. सागर पाटील, विशाल चव्हाण सुमित भोसले श्रीमती चतुर्थी पाटील, श्रीमती अश्विनी हरिदास, डॉ. वितेशकुमार गावकवाड, डॉ. मिलिंद





कुलकर्णी, संजय जवजांळ, अनिल लोंढे, शुभम रणखांबे यांनी काम पाहिले. विजेत्या स्पर्धक कलाकारांना उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांच्या हस्ते पारितोषिक, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

**अंतिम निकाल (प्रथम दोन)** : वक्तृत्व : पर्जन्या निल अंजुटगी, अनुष्का बॅनर्जी (दयानंद आर्टस ॲण्ड सायन्स कॉलेज सोलापूर). कथा-लेखन : ॲलिस वेणुगोपाल मंदापुरे (दयानंद शिक्षण शास्त्र महाविद्यालय सोलापूर), सेजल संतोष कवठेकर (सांगोला महाविद्यालय). कविता लेखन : साक्षी जिनेंद्र सुराणा (दयानंद आर्टस ॲण्ड सायन्स), श्रेया जिनेंद्र माशाळ (दयानंद शिक्षण शास्त्र). चित्रकला : सचिन राम घंटे (सी. बी. खेडगी कॉलेज अक्कलकोट), प्रतिक हणमंत तांदळे ( सोलापूर). विज्ञान व तंत्रज्ञान : विशाल सुनिल जगताप (पुणे), धनंजय अनिल गुंजाळ. समूह लोकगीत : शारदा संगीत विद्यालय बारामती. सामूहिक लोकनृत्य : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामती

## सोलापुरात प्रकृती परीक्षण अभियानास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय आयुर्वेद दिनाच्या निमित्ताने घोषणा केलेल्या देश का प्रकृती परीक्षण अभियानाची सुरुवात सोलापुरात करण्यात आली आहे.

शेठ गोविंदजी रावजी आयुर्वेद महाविद्यालयामार्फत आतापर्यंत १० हजार व्यक्तींचे प्रकृती परीक्षण करण्यात आले असल्याची माहिती उपप्राचार्य डॉ. शांतिनाथ बागेवाडी यांनी पत्रकार परिषदेत दिली. आयुष मंत्रालयाअंतर्गत भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोग नवी दिल्ली यांच्यातर्फे या अभियानाची अंमलबजावणी संविधान दिनापासून करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने शेठ सखाराम नेमचंद जैन ट्रस्ट संचलित आयुर्वेद महाविद्यालय व शेठ सखाराम नेमचंद जैन रुग्णालयातर्फे प्रकृती परीक्षण अभियानाला सुरुवात करण्यात आली आहे. या अभियाना अंतर्गत १८ ते ७० वयोगटातील लोकांचे प्रकृती परीक्षण करण्यात येत आहे. या अभियानाच्या नियोजनासाठी प्राचार्य डॉ. विना जावळे, उपप्राचार्य डॉ. शांतिनाथ बागेवाडी, प्रशासकीय अधिकारी अनुप जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात येत आहे. मोबाईल प द्वारे हे परीक्षण केले जाते. विविध २२ प्रश्नांची उत्तरे घेतली जातात. परीक्षणानंतर प्रमाणपत्र दिले जाते. आहार विहार विषयक सल्लाही दिला जातो, असे डॉ. बागेवाडी यांनी सांगितले. सोलापूरकरांनी शहरातील टिळक चौक येथील शेठ सखाराम नेमचंद जैन रुग्णालयात प्रकृती परीक्षण करून घ्यावे, असे आवाहनही यावेळी डॉ. जयकुमार आडे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेत डॉ. रेवणसिद्ध उस्तूरगीकर, डॉ. आनंद मादगुंडी, डॉ. रोहन तानवडे आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९७३

**तरी देवा हें ऐसें कैसें । जे ज्ञानियाचीही स्थिती भ्रंशे ।**
**मार्गु सांडुनि अनारिसे । चालत देखों ।।**

दुसऱ्याचा स्वधर्म सोपा आहे आणि माझा अवघड आहे म्हणून मी माझ्या स्वधर्माचे आचरण करणार नाही असे न म्हणता आपल्या वाटयाला आलेल्या स्वधर्माचे आचरण करावे. असे सांगत भगवतांनी अर्जुनाला त्याच्या वाटयाला आलेल्या स्वधर्माचे पालन करण्यासाठी युध्द करण्यास सांगीतले. त्याचबरोबर स्वमर्धाचरण व परमार्थ कल्याण करण्यात काम आणि क्रोध अडथळा निर्माण करु शकतात. त्यामुळे विषयवासनेची, कामाची मनात कल्पना सुध्दा येऊ देऊ नये असेही भगवंत म्हणाले. भगवंताचे सर्व बोलणे संपल्या नंतर म्हणजे ब-याच वेळेनंतर अर्जुनाने श्रीकृष्णांना शंका विचारतांना म्हटले,

**तरी देवा हें ऐसें कैसें । जे ज्ञानियांची ही स्थिती भ्रंशे ।**
**मार्गु सांडुनि अनारिसे । चालत देखों ।।**

अर्थात, शहाण्या व्यक्तिसुध्दा आपल्या वृत्तीपासून भ्रष्ट होऊन सन्मार्ग सोडून, स्वधर्म सोडून भलत्याच मार्गाने का भटकत जातात. काय स्विकारावे, काय करावे, काय त्याज्य करावे, काय करु नये, येणाऱ्या अडचणीवर उपाय, पर्याय काय आहेत. या सर्व बाबीची जाणीव असतांना सुध्दा शहाणी माणसेही परधर्माकडे (नीती नियमाविरुध्द) का वळतात. जन्मांधाला धान्य आणि भुसा यांना वेगळे करणे जन्मांधतेमुळे जमत नाही, त्या प्रमाणे डोळसाला देखील त्यातील भेद कळूनही, असे का व्हावे ? हे संसाराचा त्याग करतात, तेच पुन्हा संसारात येऊन स्त्री पुरुषांचा संग का करतात ? जे सर्वस्वाचा त्याग करुन वनात राहतात, तेच पुन्हा मनुष्यवस्तीत येऊन का राहतात ? पापकर्मे चुकविण्यासाठी लपून बसतात, त्यापासून दूर पळतात. तेच पुन्हा पापकर्म करण्यास प्रवृत्त का होतात? ज्या पापाचा मनापासून तिटकारा करतात, त्याचाच ध्यास घेऊन त्याची जवळीक का करतात ? अशी नको ती कार्ये करण्यास माणसाला कोण व का भाग पाडते? अशा अनेक शंका अर्जुनाने श्रीकृष्णांना विचारल्या. अर्जुनाने ज्या शंका विचारल्या, त्या शंका आपल्याही मनात निर्माण होऊ शकतात. कदाचित अर्जुनाच्या शंकाप्रमाणे आपल्यापैकी अनेकांच्या हातून नकोते कांही तरी घडून सुध्दा गेलेले असण्याची किंवा घडण्याच्या मार्गावर असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्जुनाच्या शंका सत्य आहेत. आपणच दैंनंदिन जीवनात पाहतो की, अनेक चांगल्या व्यक्ति नको त्या मार्गावर गेलेल्या दिसतात. ज्या गोष्टीचा तिटकारा ते करीत होते, नेमके तीच गोष्ट ते करण्यात आनंद मानतात. मोठ-मोठया पदावरुन मार्गदर्शन करणाऱ्या व्यक्तिंच्या हातून नको ते घडलेले आपणाला पाहायला, ऐकायला मिळते. ज्याच्याकडे आपण आदर्श म्हणून पाहतो, नेमके त्यांच्या हातून नको ते घडते. नको ती गोष्ट घडणे किंवा अपेक्षित नसतांनाही, त्यांच्या हातून ती गोष्ट घडलेली आपण पाहतो. मनाचा निग्रह करणा-याच्या हातून अशी नको ती गोष्ट घडण्यास किंवा त्यांच्याच्याकडून ती गोष्ट घडवून आणण्यास कोण कारणीभुत आहे ? असा प्रश्न अर्जुनाने उपस्थित केला आहे. काम क्रोध, वासना, विषयासक्ती हया अशा बाबी आहेत की, स्थितप्रज्ञाने जरी त्यांना मनात प्रवेश करु दिला तरी त्याची स्थितप्रज्ञता तोडण्यात हारत नाहीत. यांना थोडी जरी संधी दिली तरी स्थितप्रज्ञावर विजय मिळविल्याशिवाय हे काम, क्रोध राहत नाहीत. त्यामुळे या काम क्रोधांवर विजय मिळवणे आवश्यक असते. यांच्यावरचा विजय म्हणजे आनंदलहरीत वाढ होणे होय.



**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. १२ डिसेंबर २०२४ | स्वदेशी दिन |
| विक्रम संवत् २०८०-८१ | हुतात्मा बाबू गेनू स्मृतिदिन |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - मार्गशिर्ष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. द्वादशी - (२२.२६) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - अश्विनी (०९.५२) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - परिष (१५.२२) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (११.४९) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** आर्थिक अडचणीमुळे मन त्रस्त राहील.मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल. नौकरी रोजगारात जबाबदारीनुसार काम करा.

**वृषभ :** मुलांची काळजी राहील. आत्मविश्वास कमी झाल्यामुळे मन लागणार नाही. व्यापार व्यवसाय मध्यम राहील. झालेल्या कामात आलेल्या अडचणीवर मात कराल.

**मिथुन :** स्पर्धेमध्ये यश मिळेल. कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण होण्याचे योग आहेत.

**कर्क :** घरामध्ये पूर्वी ठरलेला शुभ समारंभ पार पडेल. एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी सर्वांच्या संमतीने होणे शक्य.

**सिंह :** हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य. मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे.

**कन्या :** मागील कामात विशेष यश मिळेल. आपल्या लहानसहान इच्छा: आकांक्षाना पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती आवक झाल्याने तुम्ही खूश असाल. रागावर नियंत्रण ठेवा.

**तुळ :** व्यापार फायदेशीर राहणार आहे. राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा.

**वृश्चिक :** लोकप्रियता वाढणार आहे. व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

**धनु :** विरोधकांपासून सावध रहा. प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मकर :** नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मनोधैर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. उतावीळपणा करू नका.

**कुंभ :** आरोग्याची काळजी घ्या. चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल.

**मीन :** मित्र, सहकारी यांची मदत मिळेल. उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत.

# शिक्षकांच्या 'अपार' कष्टाचे होतेय चीज !

**विशेष मोहिमेअंतर्गत अपार आयडीच्या कामकाजात ३.१७ टक्क्यांनी वाढ तर एकूण ६८ टक्के झाले कामकाज**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने अपार आयडी बनवण्यासाठी सोलापूर जिल्ह्यात विशेष अपार मोहीम राबवण्यात आली होती. मेगा अपार डे या मोहीमे अंतर्गत सोम वार ( दि.११ ) डिसेंबर रोजी जिल्ह्यात अपार आयडीचे कामकाज ३.१७ टक्क्यांनी वाढले आहे. एकूण ७ लाख ७६ हजार ६१९ विद्यार्थ्यांपैकी ५ लाख २९ हजार ४७३ विद्यार्थ्यांचे अपार आयडी बनवण्यात जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाला यश आले आहे. उर्वरित २ लाख ४७ हजार ३४३ विद्यार्थ्यांचे आयडी बनवण्यात येत आहे. अशी माहिती जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी दिली.

दरम्यान, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने वन नेशन वन स्टुडन्ट धरतीवर शालेय विद्यार्थ्यांसाठी अपार ऑटोमेटेड परमनंट अकॅडमी रजिस्ट्री आयडी काढण्याचा निर्णय घेत अपार आयडी कामकाज सुरू केले आहे. नव्या शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंबाबजावणीसाठी सोलापूर जिल्ह्यात ही विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. अद्याप पर्यंत जिल्ह्यातील ६८.१६ टक्के विद्यार्थ्यांना अपार आयडी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तर उर्वरित ३२ टक्के विद्यार्थ्यांना आपार आयडी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यातील सर्व शाळात मेगा अपार डे साजरा करण्यात आला आहे. त्यानुसार केंद्र शासनाच्या सूचनेनुसार सोलापूर जिल्ह्यासह राज्यभरात ही विशेष मोहीम राबवण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

दरम्यान, या नव्या आयडीमुळे नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना एक विशेष क्रमांक उपलब्ध होणार आहे. राज्यात त्याचे काम सुरू आहे. (दि.६) डिसेंबर पर्यंत राज्यातील ६०.७५ टक्के विद्यार्थ्यांना अपार आयडी प्राप्त झाला आहे. तर उर्वरित विद्यार्थ्यांना अपार आयडी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने सोमवार (दि.९) डिसेंबर रोजी मेगा अपार डे साजरा करण्यात आला. त्याचप्रमाणे मंगळवार (दि.१०) आणि बुधवार (दि.११) नोव्हेंबर रोजी राज्यातील सर्व व्यवस्थापन समिती व माध्यमांच्या शाळांत मेगा अपार डे साजरा करण्याचे निर्देश केंद्र सरकारच्या शालेय शिक्षण विभागाने दिले होते. त्यानुसार महाराष्ट्र शिक्षण परिषदेने राज्यातील सर्व जिल्हा परिषद व महापालिकांना विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना दिल्या होत्या.

**अपार आयडी बनविणे सुरु**

उर्वरित विद्यार्थ्यांचे अपार आयडी बनविणे सुरू. उर्वरित विद्यार्थ्यांचे अपार आयडी देण्यासाठी तालुका आणि गाव पातळीवर कामकाज सुरूच आहे. दररोजचे स्टेटस अपडेट केले जात आहे.

**- कादर शेख,**
शिक्षणाधिकारी
प्राथमिक विभाग



# बालाजी अमाईन्सच्या वतीने सोलापूर विद्यापीठास आयशर बस भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील कर्मचारी, विदयार्थी, शिक्षक व पालक असे ६०० ते ८०० लोक दररोज विद्यापीठास कामनिमित्त खासगी वाहनातून (सोलापूर-पुणे) या महामार्ग या वरून जीव धोक्यात घालून येतात. या सर्वांना दररोज विद्यापीठास येण्यास त्रास होऊ नये, याकरीता बालाजी अमाईन्सच्या संचालक मंडळ व व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी यांच्याकडे बसची मागणी केली होती. व्यवस्थापकीय संचालक मंडळाच्यावतीने ४१ सीटर आयशर स्काय लाईन स्टाफ बस २०९० ही बस विद्यापीठास विद्यार्थ्यांकरिता देण्यात आली.

या बसचा चावीप्रदान कार्यक्रम विद्यापीठाच्या सभागृहात आज संपन्न झाला. याप्रसंगी बालाजी अमाईन्सचे जनरल मॅनेजर गोविंद मेनचके यांच्या हस्ते विदयापीठाचे कुलगुरू प्रकाश महानवर यांच्याकडे बसची चावी प्रदान करण्यात आली. तसेच कुलगुरू यांच्या हस्ते बसची पूजा करून करण्यात आली. या कार्यक्रमास बालाजी अमाईन्सचे सीएसआर विभागप्रमुख मल्लिनाथ बिराजदार, जनरल मॅनेजर रवींद्र जिल्ला, डी. जी. एम. विनय दुर्गम यांचा सत्कार कुलगुरू महानवर यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी आर. एन.डी. टिमचे डॉ. लक्ष्मण अडसूळ, डॉ. महेश हुबळीकर उपस्थित होते. कुलसचिव योगिनी घारे यांनी आभार मानले कार्यकमास प्रा. लक्ष्मीकांत दामा, बालाजी अमाईन्सचे सीएसआर विभागप्रमुख मल्लिनाथ बिराजदार, जनरल मॅनेजर रवींद्र जिल्ला, प्रभाकर दुर्गम, जनरल मॅनेजर गोविंद मेनचके, पणन ताटी दत्तप्रसाद सांजेकर आर.एन.डी. टिमचे डॉ. लक्ष्मण अडसूळ, डॉ. महेश हुबळीकर उपस्थित होते.




# ज्ञान मंडळाकडून अभिजीत जवळकोटे यांना पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ११ डिसेंबर-**

महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचा (MKCL) राज्यस्तरीय सभेमध्ये डी.एस. कमळे गुरुजी कम्प्युटर इन्स्टिट्यूट मंद्रूप यांना सलग १४ व्या वर्षी उत्कृष्ट संगणक प्रशिक्षण केंद्र व सोलापूर जिल्हा ग्रामीण भागात सर्वाधिक ३५० पेक्षा जास्त एम.एस.सी आयटी व क्लिक कोर्सला प्रवेश केल्याबद्दल महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालिका विना कामत यांच्या हस्ते कमळे गुरुजी इन्स्टिट्यूटचे संचालक अभिजीत जवळकोटे यांना पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

हा कार्यक्रम निर्मलकुमार फडकुले सभागृहात संपन्न झाला. यावेळी एमकेसीएलचे जनरल मॅनेजर डॉ. दीपक पाटेकर, जनरल मॅनेजर अतुल पतोडी, अमित रानडे, कुशल ओव्हाळ, नटराज कटकधोंड, विभागीय समन्वय लातूरचे महेश पत्रिके, अश्वत कॉम्प्युटरचे रोहित जेऊरकर, हरुण शेख, शिवानंद पाटील, मलिक शेख, जिल्ह्यातील सर्व कॉम्प्युटर प्रशिक्षण केंद्रचे संचालक, एमकेसीएलचे पदाधिकारी उपस्थित होते

# शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवसानिमित्त सद्भावना सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. शरदचंद्र पवार यांच्या ८४ व्या वाढदिवसानिमित्त सद्भावना सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती शहराध्यक्ष सुधीर खरटमल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने पक्षाच्या पदाधिकाऱ्यांमार्फत दि. ११ ते १८ डिसेंबर दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ११ डिसेंबर रोजी धान्य वाटप कार्यक्रम घेण्यात आला. सोलापुरातील बाल संस्कार केंद्र येथे अनाथ मुलांना अन्नदान कार्यक्रम दि. १२ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. तसेच रिमांड होम आणि कुष्ठरोग वसाहत येथे खाऊ वाटप कार्यक्रम घेण्यात येणार आहे. नरसिंग गिरजी चाळ येथे वृक्षारोपण कार्यक्रम होणार आहे. सिटीझन उर्दू प्रशाला येथे चित्रकला स्पर्धा होईल. साईनाथ विद्यालयात शालेय साहित्य वाटप, माशाळ वस्ती विजापूर रोड येथे शालेय साहित्य वाटप करण्यात येणार आहे. १३ डिसेंबर रोजी रेल्वे स्टेशन परिसरात ब्लँकेट व खाऊ वाटप उपक्रम घेण्यात येणार आहे. १४ डिसेंबर रोजी मॅरेथॉन स्पर्धा आयोजित केली आहे. १५ डिसेंबर रोजी साठे शिंदे वस्ती येथे आरोग्य शिबिर घेण्यात येणार आहे. त्यानंतर दमानी नगरात कीर्तन सोहळा होणार आहे. पंजाब तालीम येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. १६ डिसेंबर रोजी वेणू गोपाळ नगर मारुती मंदिर येथे जेष्ठ नागरिकांचा सत्कार होणार आहे. शांताई अनाथ आश्रम येथे खाऊ वाटप कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर सुमित्रा पार्क जुळे सोलापूर येथे घंटागाडी कर्मचाऱ्यांचा सत्कार होणार आहे. १८ डिसेंबर रोजी राष्ट्रवादी पक्ष कार्यालयात ज्येष्ठ कामगारांचा सत्कार सोहळा आयोजित केला असल्याचे शहराध्यक्ष सुधीर खरटमल यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेत ॲड. यू. एन. बेरिया, सुनीता रोटे, मनोहर सपाटे, नलिनी चंदेले, चंद्रकांत पवार, प्रशांत बाबर, राकेश सोनी, सूर्यकांत शेरखाने आदी उपस्थित होते.


# 'राजपूत पॉकेट बुक'चे थाटात प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

जिल्हा सरकारी वकील प्रा. ॲड. प्रदीपसिंह राजपूत यांनी लिहिलेल्या राजपूत पॉकेट बुक या पुस्तकाचे प्रकाशन सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अमित आळंगे व इतर पदाधिकारी आणि बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा चे सदस्य ॲड. मिलिंद थोबडे यांच्या हस्ते सोलापूर बार असोसिएशनच्या हॉलमध्ये करण्यात आले.



प्रस्ताविक बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अमित आळंगे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पोलीस अधीक्षक सन्माननीय अतुल कुलकर्णी यांनी त्यांच्या मनोगतात रजपूत सरांनी लिहिलेल्या पुस्तकाचे कौतुक करून हे पुस्तक वकिलांनाच नाही तर पोलिसांना देखील अतिशय उपयुक्त असल्याचे सांगून त्यांनी शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमात बारचे ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. मिलिंद थोबडे, ॲड. श्रीनिवास क्यातम, ॲड. एस. एस. सदाफुले, ॲड. गंगाधर रामपुरे, त्यांचे मनोगत व्यक्त करून प्रत्येक वकिलास हे पॉकेट बुक त्यांच्या दैनंदिन जीवनात उपयुक्त होईल आणि राजपूत यांनी हे पुस्तक मोफत दिल्यामुळे त्यांचे आभार देखील मानले. पुस्तकाचे लेखक ॲड. प्रदीप सिंह राजपूत यांनी त्यांच्या या पुस्तकाची संकल्पना आणि हे पुस्तक लिहिण्याचा संपूर्ण प्रवास वर्णन केला. तसेच त्यांनी १०० जन्मठेप आणि दोन फाशी शिक्षा मिळवल्याबद्दल शंभर उपक्रम राबवण्याचा संकल्प करून त्या उपक्रमापैकी हा एक उपक्रम असल्याचे सांगितले. सदर कार्यक्रमावेळी सोलापूर बार असो अध्यक्ष ॲड. अमित आळंगे, उपाध्यक्ष ॲड. व्ही.पी.शिंदे, सचिव ॲड. मनोज नागेश पामूल, सहसचिव ॲड. निदा सैफन, खजिनदार ॲड. विनयकुमार कटारेसह सोलापूर बार असोसिएशन बहुसंख्य विधिज्ञ उपस्थित होते. सूत्रसंचालन सचिव ॲड. मनोज पामुल व आभार उपाध्यक्ष ॲड. निदा सैफन यांनी मानले.



# सोलापूर विमानतळाला स्वामी समर्थांचे नाव देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

येथील सोलापूर विमानतळाला अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराजांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव महेश कुलकर्णी यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे.

कुलकर्णी यांनी उपमुख्यमंत्री पवार यांची मुंबईत भेट घेऊन याबाबतच्या मागणीचे निवेदन त्यांना दिले असून स्वामी समर्थ हे राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहेत. त्यामुळे सोलापूर विमानतळाला त्याचे नाव देण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. यावेळी शरद येच्चे यांच्यासह राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# माघवारी पालखी सोहळा अध्यक्षपदी नागनाथ शिंदे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

माघवारी पालखी सोहळा सण २०२४-२५ या वर्षाची नियोजन बैठक श्री विठ्ठल मंदिर चौपाड, सोलापूर येथे हभप नामदेव पुलगम यांच्या अध्यक्षते खाली संपन्न झाली. या बैठकीमध्ये सोलापूर शहर व जिल्ह्यातील दिंडी प्रमुख उपस्थित होते. संपूर्ण सोहळा नियोजन मार्गदर्शन हभप सुधाकर इंगळे यांनी केले. यंदाच्या माघवारी पालखी सोहळा अध्यक्षपदी नागनाथ शिंदे यांची निवड करण्यात आली.

दरम्यान अखिल भाविक वारकरी मंडळ पदाधिकारी व दिंडी प्रमुखांनी वारीतील प्रमुखांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत पदाधिकाऱ्यांनी सोहळ्यात येत असलेल्या विविध अडचणी मांडल्या. त्या संबंधी शासनाला पत्र देऊन पालखी सोहळा व्यवस्थित करणेसाठी चर्चा करण्यात आली. दि. ३ फेब्रुवारी २०२५ रोजी दु. ३.०० वा. श्री मार्कंडेय मंदिर, पंच कट्टा येथे संत ज्ञानेश्वर महाराज पालखी व संत तुकाराम महाराज पालखी पूजन करुन पद्मशाली ज्ञाती संस्था कडून अश्व पूजन करून दिंडी प्रमुखांचा सन्मान करण्यात येणार आहे. दु. ४.३० वा. नॉर्थकोट प्रशाल येथे भव्य दिव्य गोल रिंगण केले जाणार असून या रिंगण सोहळ्यासाठी माऊलींचे अश्व येणार आहेत. अश्व चोपदार व मान्यवरांचे स्वागत सत्कार करून रिंगण सोहळा सुरु केला जाईल. जास्तीत जास्त वारकरी उपस्थित राहावे असे नियोजन केले जाणार आहे. श्री महादेव मंदिर साठे चाळ, सोलापूर येथे प्रस्थान समारोप केला जाणार आहे. आनंद दादा चंदनशिवे यांच्याकडून उपस्थित वारकरी भाविकांचे स्वागत करून आरती केली जाणार आहे. दरम्यान, दि. ४ फेब्रुवारी रोजी स. ८.०० वा. पालखी मार्गस्थ होईल. दि. ५ फेब्रुवारी रोजी स. ९.०० वा. पाटकर वस्ती कुरुल ता. मोहोळ येथे दुसरे गोल रिंगण केले जाणार आहे. दि. ६ फेब्रुवारी रोजी स. ९.०० वा.महात्मा गांधी विद्यालय पेनूर (ता. मोहोळ) येथे तिसरे गोल रिंगण व दु. ४.३० वा. दत्त प्रशाला, सुस्ते ता. पंढरपूर येथे चौथे गोल रिंगण केले जाणार आहे. दि. ७ फेब्रुवारी रोजी स. ९.०० वा. जलाराम मठ, पंढरपूर समोर उभे रिंगण केले जाणार आहे. नंतर आपापल्या पारंपरिक ठिकाणी सर्व दिंड्या जातील. माघवारी पालखी सोहळा २०२४-२०२५ अध्यक्षपदी हभप नागनाथ शिंदे (हरळय्या समाज दिंडी), उपाध्यक्ष हभप महेश जाधव (कैकाडी समाज दिंडी), सचिव हभप दगडू डोंगरे (संतसेवा मंडळ), संपर्क प्रमुख हभप प्रदीप मोरे महाराज, खजिनदार हभप नामदेव बाचल इ. पदाधिकारी निवड करण्यात आली.या वेळी जोतिराम चांगभले, किसन कापसे, संजय पवार, नागनाथ पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. या बैठकीसाठी बळीराम जांभळे, मोहन शेळके, बंडोपन्त कुलकर्णी (जिल्हा अध्यक्ष), किरण श्रीचिप्पा (सह अध्यक्ष ) वामन लोंढे, दर्शन ढगे, विष्णूपंत मोरे महाराज उपस्थित होते.



# २९ डिसेंबर रोजी राज्यस्तरीय पद्मशाली वधू-वर मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ डिसेंबर-**

श्री व्यंकटेश्वर पद्मावती मॅरेज ब्युरो सोलापूरच्यावतीने येत्या २९ डिसेंबरला सोलापुरात राज्यस्तरीय पद्मशाली वधू-वर मेळावा आयोजित करण्यात आल्याची माहिती व्यंकटेश दोंता यांनी दिली आहे.

या वधू-वर मेळाव्यात राज्यभरातील पद्मशाली समाजातील इच्छुक वधूवरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे. या मेळाव्यात सहभागी होणाऱ्या उपवधूसाठी २०० रू. नोंदणी शुल्क आहे तर उपवरांसाठी ३०० रू. नोंदणी शुल्क आकारले आहे. सहभागी वधू-वर व पालकांना भोजनाची व्यवस्था संयोजन समितीच्यावतीने करण्यात येणार आहे. नोंदणी करण्यासाठी व्यंकटेश दोंता ९०२८७२४४४९, दिगंबर इप्पलपल्ली ९०२८३३१४६३ यांच्यासह रमेश अन्नलदास ९३२५६२६९६०, मुरली धारा ९८२२३५६७६६, जयश्री सामल ८४२१९७६७१४ यांच्याकडे नाव नोंदणी करू शकता, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### अक्कलकोटच्या शेतकऱ्यांची भेंड गावास भेट

**मोडनिंब, दि.११ डिसेंबर-**

भूजल समृद्ध ग्राम स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक आल्यामुळे व ICRIST संस्थेचे प्रकल्पांतर्गत भेंड (ता.माढा) येथे भेट दिली. भेंड येथे भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणामार्फत झालेल्या कामाची पाहणी करण्यासाठी तसेच अभ्यास दौऱ्यासाठी अक्कलकोट तालुक्यातील बऱ्हाणपूर, डोंबरजवळगे, हळहळ्ळी व दक्षिण सोलापूर तालुक्यातील तीर्थ या गावातील शेतकऱ्यांची अभ्यास सहल युनायटेड वे ऑफ मुंबई या संस्थेद्वारे आयोजित करण्यात आली होती. भेंड गावाने २०१८ मध्ये पाणी फाउंडेशन च्या वॉटर कप स्पर्धेत यशस्वी सहभाग नोंदवला होता. या अंतर्गत जलसंधारणाचे खूप मोठे काम झाले आहे. सदरच्या झालेल्या कामाची पोच पावती गावची पाणी पातळी मध्ये कमालीची वाढ झाली आहे. तसेच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा व ICRIST यांचे माध्यमातून जलसंधारणाची कामे चालू आहेत. ही सर्व कामे पाहण्यासाठी शेतकऱ्यांनी भेट दिली. शेतकऱ्यांनी गावातील स्वयंचलित हवामान केंद्र, पाणी फाउंडेशन अंतर्गत, ग्रामपंचायत परिसर, विक्रमी उत्पादन असलेल्या तूर लागवड क्षेत्र तसेच ICRIST च्या प्रकल्प केंद्रास भेट दिली. यावेळी त्यांनी समाधान व्यक्त केले. भेंडच्या शेतकऱ्यांनी स्वअनुभवाचे कथन केले व लोकसहभागाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी सरपंच डॉ. संतोष दळवी, पाणी फाउंडेशनचे देशमुख, सुशांत गायकवाड, गोरख दळवी, बलभीम बरडे, भास्कर दळवी, ज्ञानेश्वर दळवी, बालाजी सावंत, धनाजी जानराव, अंकुश सावंत, सुभाष पाटील, लक्ष्मण मते, महेश मते, सुरज मुलाणी, जयसिंग दळवी, सुदर्शन भोईटे, समाधान बरडे, तात्यासाहेब जाधव, विठ्ठल सावंत, बिरुदेव घुगे, गणेश मुटकुळे व भेंड ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. मृदा आणि जलसंधारण विभागाचे उपअभियंता सोनवणे व घाणेकर यांनी भेंड येथील कामाचे कौतुक केले.



### मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयात क्षयरोग शोध मोहिमेचे उद्घाटन

**मंगळवेढा, दि.११ डिसेंबर-**

आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय भारत सरकारच्या धोरणानुसार सन २०२५ पर्यंत टीबी मुक्त भारत हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विविध पातळीवर प्रयत्न केले जात असून त्या अनुषंगाने राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत ७ डिसेंबर ते २४ मार्च या शंभर दिवसांच्या कालावधीमध्ये क्षयरुग्ण शोध मोहीम राबविण्यात येणार असून या मोहिमेचे उद्घाटन ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुलोचना जानकर यांनी केले. यावेळी डॉ. सुलोचना जानकर यांनी या १०० दिवसीय क्षयरोग शोध मोहीमेमध्ये जास्तीत जास्त जोखीमग्रस्त संशयीत क्षयरुग्नांची थुंकी, एक्स-रे व न्याट मशीनद्वारे मोफत तपासणी करून लवकरात लवकर निदान व उपचार करण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी वरिष्ठ क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक प्रल्हाद नाशिककर यांनी क्षयरोगाची लक्षणे, निदान व उपचारासंबंधी माहिती दिली. MDR उपचार घेऊन पूर्ण बरा झालेल्या रुग्णाने यावेळी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास वैद्यकीय अधिकारी डॉ. महेश रोंगे आयुष वैद्यकीय अधिकारी डॉ. निखिल जोशी, डॉ. प्रवीण माने, अधिपरिचारिका सुवर्णा सरताळे, फुलन आगलावे, रुपाली कुलकर्णी, शीतल कपाटे, नेत्र चिकित्सा अधिकारी अनिल यादव, औषध निर्माण अधिकारी पांडुरंग कोरे, अविनाश पट्टणशेट्टी समुपदेशक आबसो नागणे, स्वाती शिंदे, सीमा मुलगे, सुप्रिया शिंदे, चनशेट्टी, शहीन तांबोळी, मोरे, प्रवीण डांगे उपस्थित होते.

### वंचित बहुजन आघाडीच्या राष्ट्रीय कार्यकारणी सदस्यपदी डॉ. नितीन ढेपे

**अणदूर, दि.११ डिसेंबर-**

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार वंचित बहुजन आघाडीच्या पक्षांतर्गत निवडणुका नुकत्याच शेगाव येथे पार पडल्या. यावेळी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी प्रकाश आंबेडकर यांची आणि राष्ट्रीय कार्यकारणीमधील बारा सदस्य यांची एकमताने निवड केली गेली. त्यामध्ये अणदूरचे सुपुत्र डॉ. नितीन ढेपे यांचा समावेश असल्याने त्यांचे अणदूर परिसरातून अभिनंदन केले जात आहे. डॉ. नितीन ढेपे हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे त्वचारोग तज्ञ असून त्यांना लेसर मॅन म्हणून गौरविले जाते. ते राष्ट्रीय गुरव समाज महासंघाचे राष्ट्रीय संघटक असून ओबीसी विचारवंत म्हणून त्यांचा लौकिक आहे. ओबीसी अरक्षण, सर्व समावेशक हिंदुत्व, आरोग्य, शिक्षण आणि रोजगारनिर्मिती यावर नावीन्यपूर्ण उपाय योजना अशा विषयावर वंचितच्या थिंक टँक मध्ये डॉ. ढेपे महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत.



### अक्कलकोट येथे २१ डिसेंबरला तालुकास्तरीय कथाकथन स्पर्धा

**अक्कलकोट, दि.११ डिसेंबर-**

अक्कलकोट येथील अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला तालुका शाखेच्या वतीने साने गुरुजी शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंतीनिमित्त तालुकास्तरीय कथाकथन स्पर्धा सी.बी. खेडगी महाविद्यालय अक्कलकोट येथे 'श्यामची आई' या पुस्तकावर आधारित कथाकथन स्पर्धा आयोजित केले आहे. प्रत्येक शाळेतील प्राथमिक व माध्यमिक गटातून एक विद्यार्थी प्रमाणे लहान गट(इयत्ता ५ वी ते ७ वी) मोठा गट(इयत्ता ८ वी ते १० वी) प्रथम तीन क्रमांकांना रोख रक्कम ट्रॉफी व प्रमाणपत्र देण्यात येईल. तरी अक्कलकोट तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांनी शनिवार दिनांक २१ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता कथाकथन स्पर्धेत सहभागी व्हावे व अधिक माहितीसाठी ९७६३०३९८५८ या नंबरवर संपर्क साधावा.



# वरिष्ठांना बोलून मार्ग काढणार

## ● सार्वजनिक बांधकाम विभागाची घटनास्थळी पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ११ डिसेंबर-**

मोडनिंब येथील वळणरस्ता झाला धोक्याचा; सुरक्षा कठडा नसल्याने अपघाताची शक्यता या मथळ्याखाली वृत्त दै. 'तरुण भारत'ने काल बुधवारी (दि.११) रोजी प्रसिद्ध केले होते. त्याच वृत्ताची दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभाग कुर्डुवाडी येथील अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. परिस्थितीचा आढावा घेऊन वरिष्ठांना बोलून या संदर्भात योग्य कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन सार्वजनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता सय्यद यांनी दिले. यावेळी दत्तात्रय सुर्वे, चांगदेव वरवडे, शिवाजी सुर्वे, संजीव शिंदे, विशाल पाटील, उदय जाधव आदी उपस्थित होते.

तरुण भारत IMPACT



मोडनिंब (ता. माढा) येथे महालिंगेश्वर मंदिरानजीक या वळणावरून वाहने भरधाव वेगाने जातात. अनेकदा या वळणावर समोरून येणाऱ्या वाहनांना अंदाज येत नसल्याने किरकोळ अपघात झाले आहेत. बाजूला मोठी चारी असून, सुरक्षा कठडा नसल्याने भरधाव वेगामुळे गाडी रस्त्यावरून खाली गटारीत जाण्याची शक्यता आहे. या मार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक आहे. त्यातच रस्ता अरुंद असल्याने अपघाताची शक्यता आहे. तेथे रस्ता रुंद करून संरक्षक कठडे बांधावेत.अशी मागणी नागरिकांनी केली होती.वळण रस्ता दिशादर्शक आणि मार्गदर्शन सूचना फलक बसवण्याची गरज आहे. पूर्वीपासून हा वळण रस्ता आहे. परंतु ही बाब अपघाताचे कारण ठरत आहे. वळणात रस्त्याच्या कडेला चार फूट खोल गटार आहे. नागरी वसाहतीतील वाहतूक येथूनच होते. दुचाकी व कार यासारख्या वाहनांची संख्या वाढली आहे.या ठिकाणी दुर्घटना टाळण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे. शहरातील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण झाले नाही. त्याची डागडुजी केली नाही. रस्त्याची अत्यंत दैना झाली आहे सध्या धुळीमुळे मोडनिंबकर त्रस्त झाले आहेत.आता मुख्य रस्त्याची मलमपट्टी करावी अशी मागणी मोडनिंबकर ग्रामस्थ करत आहेत.

> दै. 'तरुण भारत'च्या बातमीची दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभाग कुर्डुवाडी येथील अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. परिस्थितीचा आढावा घेऊन वरिष्ठांना बोलून या संदर्भात योग्य कार्यवाही करण्यात येईल.
>
> **- एम. एच. सय्यद,**
> शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कुर्डूवाडी



# आदर्श समाजसेवक पुरस्काराने जुबेर बागवान सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ डिसेंबर-**

सोलापुरात मानवाधिकार दिनानिमित्त समाज कल्याण हॉल रंगभवन येथे मानवाधिकार संरक्षण संघटनेच्यावतीने मानवाधिकार दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कामगार नेते विष्णू करामपुरी महाराज होते.

कार्यक्रमात प्रमुख मान्यवर म्हणून एस.आर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष साहिल भाई रामपुरे, पत्रकार सुरक्षा समितीचे प्रदेश अध्यक्ष यशवंत पवार, वाहतूक संघटना संयुक्त महासंघचे संस्थापक अध्यक्ष रियाज सय्यद, अखिल भारतीय जनजागृती संघटनांचे प्रदेश अध्यक्ष इब्राहिम जमादार, अन्सार तांबोळी उपस्थित होते. प्रमुख मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या पुरस्कार वितरण सोहळ्यात बागवान सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जुबेरभाई बागवान यांना आदर्श समाजसेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार पत्रकार सुरक्षा समितीचे प्रदेश अध्यक्ष यशवंत पवार यांच्या हस्ते जुबेर बागवान यांना देण्यात आला.

मानवाधिकार संरक्षण संघटनेचे सादिक शेख यांनी कार्यक्रमाचा आभार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महबूब कादरी, प्रवीण चांदेकर, परवेज मुल्ला, अकबर शेख, मीर महंमद खान, मुर्तुज शेख, मोहसीन बागवान व मानवाधिकार संरक्षण संघटनेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले.



# हजरत ख्वाजा सैफुलमुल्क चिस्ती (रहे.) यांचा उरूस उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ११ डिसेंबर-**

अक्कलकोट तालुक्यातील हैद्रा येथील हजरत ख्वाजा सैफुल मुलक चिस्ती (रहे.) यांच्या उरूस निर्मित दिनांक २७,२८ व २९ नोव्हेंबर रोजी संदल, चिराग, जियारत आदी धार्मीक कार्यक्रमाने संपन्न झाला. यावेळी उरूस निमित्त देशभरातील लाखो भाविकांनी हैद्रा येथे येऊन हजरत खाजा सैफुल मुलुख चिस्ती दर्गाह (रहे.) येथे दर्शन घेतले. देशभरातील जवळपास तीन लाखाहून अधिक भक्तानी दर्शनाचा लाभ घेतल्याची माहिती ट्रस्टीचे चेअरमन एम.डी रफीक सिराजोद्दीन मुजावर यानी दिली.

अक्कलकोट तालुक्यातील हैद्रा येथील सर्व धर्मीयाचें एक्याचे प्रतीक असलेले सुप्रसिद्ध संत हजरत खाजा सैफुल मुलक चिस्ती (रहे.) दर्गाहचे उरुस दिनांक २७ पासुन प्रारंभ झाला. या दिवशी रात्री संदल (गंध) मिरवणूक पार पडली.कर्नाटक येथील करजगी गावचे पाटील परिवाराच्या घरातुन मिरवणूक काढण्यात आली. दि. २८ नोव्हेंबर रोजी चिराग (दिपोत्सव) कार्यक्रम पार पडला. तसेच रात्री ९ वाजता गोरखपुर युपी, येथील नुसरत खानम व पुनाचे कामील चिश्ती यांचा कव्वालीचा मुकाबला संपन्न झाला.

दिनांक २९ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी पर्यंत महाप्रसाद वाटप करण्यात आले. यावेळी दर्गा ट्रस्ट कडून भाविक भक्तांना विविध सोयी सुविधा पुरविण्यात आल्या. हा ऊर्स साजरा करण्यासाठी दर्गाह ट्रस्टीचे चेअरमन एम.डी रफीक सिराजोद्दीन मुजावर , व्हा.चेअरमन बंदेनवाज तालाबअली मुजावर, सेक्रेटरी वकील नबीसाब मुजावर, ट्रस्टी अहमद कादरबाशा मुजावर, ट्रस्टी अ. रउफ अहमदसाब मुजावर, ट्रस्टी बंदेनवाज शिराजोद्दीन मुजावर, ट्रस्टी याकूबसाब एम.मुजावर, ट्रस्टी जैनोद्दीन तालाबअली मुजावर, ट्रस्टी अय्युब वकील मुजावर, ट्रस्टी बंदेनवाज दस्तगीर बाशा मुजावर आदींसह हैद्रा ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

# आठवडा बाजारात पोलिसांची गस्त वाढवा

## ● आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या पोलीस प्रशासनाला सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ११ डिसेंबर-**

गेल्या काही महिन्यांपासून सांगोला पोलिस ठाणे हद्दीतील परिसरात दागिने, मोबाइल हिसकावणे, पाकीट मारणे, घरफोडी, चोरीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणत वाढ झाली आहे. त्याचप्रमाणे सांगोल्याच्या आठवडी बाजारांमध्ये चोऱ्यांचे प्रमाण खूपच वाढलेले आहे.

त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही गंभीर बाब आहे. या धर्तीवर आ.डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी मंगळवारी सांगोला पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक भीमराव खणदाळे यांना सूचना दिल्या. शहरात चोरीच्या घटना घडत असून अनेक परप्रांतीय कामगार हे भाडेकरू म्हणून राहत आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने परप्रांतीय कामगारांची सर्व माहिती पोलीस स्टेशनला जमा करून घ्यावी. तसेच तालुक्यातील शाळा, महाविद्यालय, खासगी शिकवण्या तसेच ज्या परिसरात दररोज मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थ्यांनींची ये-जा होते, अशा ठिकाणी व आठवडा बाजारात पोलिसांची गस्त वाढविण्याच्या सूचना आ. देशमुख यांनी पोलीस प्रशासनाला दिल्या आहेत.





### गुन्हेगारी प्रवृत्तीला थारा देण्यात येणार नाही

गेल्या काही दिवसांपूर्वी शिवसेनेचे नेते सागर पाटील यांच्या गाडीवर हल्ला झालेली घटना निषेधार्थ आहे. सांगोला तालुक्यात स्व.आबासाहेब यांच्या प्रमाणेच गुन्हेगारी प्रवृत्तीला कदापिही थारा देण्यात येणार नाही. त्यामुळे अशा हल्ल्यांना शेतकरी कामगार पक्ष कदापिही पाठीशी घालणार नसून आरोपीस लवकरात लवकर अटक करा, अशी सूचनाही आ. देशमुख यांनी केली आहे.



# पंढरी नगरीत गीता जयंतीनिमित्त निघाली रथयात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ डिसेंबर -**

मार्गशीर्ष शुद्ध एकादशी (मोक्षादा एकादशी) दिवशी श्रीमद् भगवद्गीता जयंती निमित्त योगेश्वर पुरुषोत्तम गीता जयंती महोत्सव समिती व पतंजली योग समिती जिल्हा सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य अश्या रथयात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

या रथयात्रेची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज चौकातील जिजामाता उद्यान येथे भगवान श्रीकृष्ण मूर्तीची व श्रीमद् भगवद्गीत गीता ग्रंथाची पूजा व आरती माऊली गुरुकुल वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हभप ज्ञानेश्वर महाराज पवार व विश्व हिंदू परिषदेच्या विभागीय महिला अध्यक्षा भाग्यश्री लिहिणे यांच्या हस्ते करण्यात आली. या यात्रेत आदर्श बाल व प्राथमिक विद्यालय च्या मुख्याध्यापिका माया सांगोलकर व त्यांचा शिक्षक वृंद ,कवठेकर प्रशाला पंढरपूर विद्यार्थी व त्यांचा शिक्षक वर्ग, वारकरी शिक्षण संस्थेचे वारकरी विद्यार्थी उपस्थित होते. रथयात्रा संपन्न करण्यासाठी गीतेचे मार्गदर्शक गीताव्रती सुधीर अढवळकर, सुरेंद्र पिसे, जिल्हा प्रभारी भारत स्वाभिमान,पतंजलीयोगसमितीजिल्हासोलापूर, मधुकर सुतार, जिल्हा प्रभारी पतंजली योग समिती सोलापूर, संजय देशपांडे, पंढरपूर तालुका प्रभारी, विजय कांबळे किसान सेवा प्रभारी गिरीश अढवळकर, मिलिंद वाईकर, शिवकुमार बाहुलेक, कृष्णा लिहिणे, केशव लिहिणे, वि.यं. पाटील, श्री. उत्पात, बबनराव पिसे, शंकर कोष्टी, जयश्री पिसे, सविता पिसे, स्मिता अढवळकर, कौलवार ताई, सौ.उत्पात व पंढरपूर शहरातील गीता प्रेमी गीता उपासक बहुसंख्येने उपस्थित होते. विशेष सहकार्य ह.भ.प. शाम महाराज उखळीकर यांचे लाभले. शेवटी पसायदान होऊन सर्वांना प्रसादाचे वाटप करून सांगता करण्यात आली.



# वैरागमध्ये दीड तोळ्याचे गंठण पळविले

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ११ डिसेंबर-**

वैराग येथे लहान मुलीला शाळेतून घरी आणण्यासाठी गेलेल्या महिलेच्या गळ्यातील दीड तोळ्याचे सोन्याचे मिनी गंठण दिवसा ढवळ्या अनोळखी व्यक्तींनी गाडीवरून जाताना हिसका देऊन चोरून नेले.

सदर घटना ही ५ डिसेंबर रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास वैराग येथे घडली आहे. हा गुन्हा उशीराने दाखल करण्यात आला आहे. ५ डिसेंबर रोजी गुरुवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास उर्मिला योगेश काकडे (वय २५ वर्ष) रा . गणेश नगर वैराग या आपल्या मुलीला शाळेतून घरी आणण्यासाठी विदया नगर येथील रवी बाल संस्कार केंद्र येथे चालत जात होत्या. या दरम्यान वाटेने चालत असताना पाठीमागून दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांना खुंटेवाडी गावाला जायचा रस्ता विचारत असताना एकाने महिलेला काही कळण्याच्या आत गळ्यातील दीड तोळ्याचे गंठण तोडून दोघे पसार झाले. या वेळी महिलेने आरडा-ओरडा केला मात्र तोपर्यंत चोरटे पळून जाण्यात यशस्वी ठरले होते. या दोन चोरट्यांनी अंगावर स्वेटर व तोंडाला बांधले होते. सदर घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली असून दिवसाढवळ्या घडलेल्या घटनेने महिला वर्गात खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे महिला बाहेर जाण्यासाठी घाबरत आहेत या घटनेचा तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रतापसिंह जाधव करीत आहे.

# लग्नात जमली आहेररूपी एक हजार पुस्तके

## ▸▸ सेवानिवृत्त गुरुजींच्या आवाहनाला भरभरून प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. ११ डिसेंबर-**

मुलाच्या लग्नात केवळ पुस्तकेच आहेररूपी भेट द्यावीत, या माजी मुख्याध्यापकांनी केलेल्या आवाहनाला पाहुणे मंडळींनी भरभरून प्रतिसाद दिला. १ हजार पुस्तके जमा झाली. हा ज्ञानदानाचा सोहळा कुर्डुवाडीत झाला.

विनायक बाबा गोरे असे माजी मुख्याध्यापकांचे नाव आहे. ३२ वर्षे शाळेत सेवेत असताना गोरे यांनी ज्ञानदाबरोबरच विविध सामाजिक उपक्रम राबविले. आर्थिक परस्थिती नसलेल्या जवळपास शंभर विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन त्यांचा शैक्षणिक खर्च उचलला. ही ज्ञानदानाची चळवळ त्यांनी सेवानिवृत्त झाल्यानंतरही सुरुच ठेवली आहे. त्याअनुषंगाने मुलगा जन्मेजयच्या लग्नात त्यांनी केवळ पुस्तकरूपी आहेर देण्याचे आवाहन केले. लग्न सोहळ्याच्या आवारात एका बाजूला बार्शीतील स्मार्ट बुक बिझनेस यांचा पुस्तक विक्रीचा स्टॉल तर दुसरीकडे आहेररूपी पुस्तके स्विकारले जात होते. विविध क्षेत्रातील व्यक्तींचे आत्मचरित्र, धार्मिक, ऐतिहासिक ग्रंथ, स्पर्धा परीक्षा, गाजलेल्या कादंबर्या, वैज्ञानिक, सामाजिक, यशस्वी जगण्याची प्रेरणा देणारी अशी १ हजार पुस्तके आहेराच्या रूपात देण्यात आली. वाचन संस्कृती टिकावी व वाढावी, या विद्यायक हेतूने गोरे यांनी राबविलेल्या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



कुर्डूवाडी : लग्न समारंभात पुस्तकरूपी आहेर स्वीकारताना विनायक गोरे.

> मोबाईलच्या अतिरेकामूळे वाचन संस्कृतीवर विपरीत परिणाम दिसून येतो. आयुष्यभर ज्ञानदान केले. यापुढेही सुरु राहिल. लग्नात जमा झालेल्या पुस्तकांतून मी खासगी वाचनालय सुरु करणार आहे.
>
> **- विनायक गोरे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक**

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तांबेवाडी शाळेत क्रीडा महोत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग दि ११ डिसेबर-**

नाईक प्राथमिक व ज्ञानदीप माध्यमिक आश्रमशाळा व वसंत कनिष्ठ महाविद्यालय तांबेवाडी (ता. बार्शी) येथे सोलापूर जिल्हा आश्रमशाळा क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला तांबेवाडी प्रशालेच्या प्रांगणात खो-खो या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बार्शी, करमाळा, धाराशिव या तीन तालुक्याच्या वतीने क्रीडा महोत्सव खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले



होते. यावेळी पोलीस उपनिरीक्षक प्रतापसिंह जाधव, पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत बनसोडे, संस्थेचे अध्यक्ष डॉ. सूरज चव्हाण, सचिव संतोष चव्हाण, प्रभारी मुख्याध्यापक खापे एस. पी. नाईक, मुख्याध्यापक साहेबराव संकपाळ, डी. टी. चव्हाण, आर. डी. राठोड, धुपे, घुगे, थोरात, वाघमारे, दुधभाते, खारे, लांडगे उपस्थित होते.



www.tarunbharat.org
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...



### आंतर महाविद्यालयीन कराटे स्पर्धेत कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे यश

**पंढरपूर, दि.११ डिसेंबर-**

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अंतर महाविद्यालयीन कराटे स्पर्धेत येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वयत्त महाविद्यालयाने घवघवीत यश प्राप्त केले. ही स्पर्धा व्ही.जी शिवदारे कॉलेज आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स सोलापूर येथे नुकतीच पार पडली. या स्पर्धेत विद्यापीठातील एकूण १४ म हाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या चार विद्यार्थी खेळाडूंनी सहभाग घेतला होता. विशेष म्हणजे त्या चार ही विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. दरम्यान ६१ किलो वजनी गटात सृष्टी पवार बीए भाग तीन हिने प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्यामुळे तिचे चेन्नई येथे होणाऱ्या ऑल इंडिया वेस्ट झोन कराटे स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर ५० किलो वजन गटात रितेश शिंदे याने प्रथम क्रमांक प्राप्त केला. ५५ किलो वजन गटात अतुल चव्हाण याने तृतीय क्रमांक प्राप्त केला. ५५ किलो वजन गटात आदित्य चव्हाण याने चौथा क्रमांक प्राप्त केला. यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन प्राचार्य डॉ.सी.जे खिलारे, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईक नवरे, उपप्राचार्य डॉ. तुकाराम अनंतकवळस, उपप्राचार्य प्रा. राजेश कवडे यांनी केले. शारीरिक शिक्षण संचालक प्रा.अनिल परमार, प्रा. विठ्ठल फुले, प्रा. मनोज खपाले या सर्वांचे यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.



### भाग्यश्री देसाई यांच्याकडून आपुलकी प्रतिष्ठानला ५ लाखांची देणगी

**सांगोला, दि. ११ डिसेंबर-**

आपुलकी प्रतिष्ठान, सांगोला या सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या संस्थेला अमेरिकन अल्बम या नाटकाच्या निर्मात्या भाग्यश्री देसाई यांनी स्व.सुलभा सबनीस यांच्या स्मरणार्थ ५ लाख रुपयांची देणगी देऊन आपुलकीच्या सामाजिक कार्याला मोठे बळ दिले आहे. सांगोला येथे अमेरिकन अल्बम या नाटकाचा प्रयोग पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मृतीभवन येथे आयोजित करण्यात आला होता. आपुलकी प्रतिष्ठानच्या कार्याची माहिती भाग्यश्री देसाई यांनी राजेंद्र यादव यांचेकडून घेतली होती. स्व. सुलभा सबनिस यांचे स्मरणार्थ दिलेल्या ५ लाख रुपयांच्या देणगीतून खरेदी करण्यात आलेल्या ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर मशीनचा लोकार्पण सोहळा भाग्यश्री देसाई यांच्या हस्ते यावेळी करण्यात आला. यावेळी नाटकातील सर्व कलाकारांचा सत्कार आपुलकी सदस्यांच्या हस्ते करण्यात आला. नाटकाच्या शेवटी लकी ड्रॉ काढून विजेत्यांना बक्षीस देण्यात आली. खूप वर्षांनी एक चांगले भावस्पर्शी नाटक पाहायला मिळाल्याच्या प्रतिक्रिया अनेक नाट्य रसिकांनी यावेळी दिल्या.



### बसस्थानकातील डिव्हायडरमधील चिलारीची झाडे देताहेत अपघाताला निमंत्रण

**पिलीव, दि ११ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील बसस्थानकालगत असणाऱ्या डिव्हायडरमध्ये चक्क मोठ मोठी चिलारीची झाडे वाढली आहेत. यामुळे याठिकाणी वरचेवर अपघात होत आहेत. हा पंढरपूर-सातारा राष्ट्रीय महामार्ग आहे. याच रस्तयाने पंढरपूर, गोंदावले, तुळजापूर, अक्कलकोट याठिकाणी भाविक भक्त मोठ्या संख्येने जातात. या रस्त्यावरुन रात्रंदिवस चारचाकी तसेच दुचाकी वाहनांची कायम वर्दळ असते.शाळेचे विदयार्थी, भाविक भक्त, इतर प्रवाशयांनची रस्तावर कायम रहदारी असते. ही चिलारीची झाडे वाढली असल्याने रस्तावर आली आहेत .याचा प्रवाशयांना प्रचंड त्रास होत आहे. संबंधीत खात्याने या डिव्हायडर मध्ये वाढलेली चिलारीची झाडे ताबडतोब काढावीतव प्रवाशांना होणार त्रास थांबवावा, अशी मागणी प्रवाशी वर्गामधून होत आहे.



### बीटस्तरीय स्पर्धेत घारगाव शाळेचे यश

**करमाळा, दि ११ डिसेंबर-**

करमाळा तालुका बिटस्तरीय क्रीडा स्पर्धेत जिल्हा परिषद शाळा घारगावने मोठा गट कबड्डी मुले यात अंतिम विजय मिळवला. अंतिम सामना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वरकुटेविरुद्ध घिरगाव यांच्यात झाला. या लढतीत घारगाव शाळेने सात गुणांनी विजय मिळविला. बुद्धिबळ मोठा गट स्पर्धेत सहावीतील सुमित बिभीषण बारस्कर यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला. मुख्याध्यापक व शिक्षक वृंद व क्रीडा शिक्षक विलास चव्हाण यांचे अभिनंदन शाळा व्यवस्थापन समिती, माजी सरपंच ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मी सरवदे यांनी केले.

# आ. कल्याणशेट्टी यांची पालकमंत्रीपदी वर्णी लागण्याची चर्चा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जवळचे अन् विश्वासू म्हणून ख्याती

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ११ डिसेंबर-**

नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातून भाजपा महायुतीचे उमेदवार आमदार सचिन कल्याणशेट्टी हे मोठ्या मताधिक्याने दुसऱ्यांदा निवडून आले आहेत. सर्वात तरुण आमदार म्हणून त्यांची वर्णी ही राज्याच्या मंत्रिमंडळात लागणार की सोलापूर जिल्हा पालकमंत्री म्हणून वर्णी लागणार, याकडे अक्कलकोट विधानसभा मतदारसंघाचे लक्ष लागले आहे. याबाबत अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात जोरदार चर्चा सुरू आहे.

अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातून भाजपा महायुतीचे उमेदवार आमदार सचिन कल्याणशेट्टी हे ४९ हजार ५७२ इतक्या मोठ्या मताधिक्याने विजयी झाले आहेत. काँग्रेस महाविकास आघाडीचे माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांचा त्यांनी दुसऱ्यांदा पराभव केला आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी हे दुसऱ्यांदा मोठ्या मताधिक्याने विजयी झाले आहेत. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची दिनांक १२ डिसेंबर रोजी राज्याच्या होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या विस्तारात त्यांची निवड होणार का? मंत्री म्हणून त्यांची निवड होणार का? याकडे आता अक्कलकोट



विधानसभा मतदारसंघातील जनतेचे लक्ष लागले आहे. राज्याचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांची निवड झाल्याने आता आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची मंत्रिमंडळात वर्णी लागणार अशी चर्चा अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात रंगली आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत निकटवर्तीय विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जातात. त्यांच्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जी जबाबदारी सोपवलेली आहे. ती यशस्वीपणे पार पाडण्याचे काम आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी आजपर्यंत केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध असल्याने आता आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची राज्याच्या मंत्रिमंडळात वर्णी लागणार अशी चर्चा भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यातून सुरू असून तशी चर्चा ही अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील जनतेमधून सुरू आहे.

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात कोट्यावधी रुपयाचीं विकास कामे केली आहेत. त्यांच्या विकास काम ाच्या बळावरच आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातून विधानसभा निवडणुकीत विजय मिळविला आहे.अक्कलकोट विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागील सरकारच्या काळामध्ये हजारो कोटींचा निधी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना दिला आहे.यामुळे अक्कलकोट विधानसभा मतदार संघातील विविध विकास कामे ही मार्गी लागली आहेत.

**नागरिकांचे लक्ष :** सोलापूर जिल्ह्यातून दोन-तीन नावाची चर्चा सुरू असून या नावांमध्ये अक्कलकोट विधानसभेचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे नाव प्रामुख्याने घेतले जात आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस युवा आमदार असलेले आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना राज्याच्या मंत्रिमंडळात त्यांना स्थान देणार अशी आशा सर्वत्र निर्माण झाली आहे. १२ डिसेंबर रोजी होणाऱ्या मंत्रिमंडळ विस्ताराकडे आता अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील तसेच सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**आतापर्यंत झालेले मंत्री :** या अगोदर अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातून कैलासवासी श्रीमंत निर्मलाराजे भोसले, कैलासवासी पार्वतीबाई मलगोंडा तसेच माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी राज्याच्या मंत्रिमंडळात काम केले आहे. आता आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची जर मंत्रिमंडळात निवड झाल्यास तर ते चौथे मंत्री अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातून ठरतील.

## गाणगापूर येथे शनिवारी दत्त जयंती सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.११ डिसेंबर-**

श्रीक्षेत्र गाणगापूर येथे शनिवारी दि. १४ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता लाखो भाविक व ग्राम स्थांच्या साक्षीने श्रीदत्त जन्मोत्सव सोहळा साजरा होत आहे. त्यानिमित्ताने मंदिर समितीकडून सध्या जय्यत तयारी करण्यात येत आहे.



शनिवार, दि. १४ डिसेंबर पहाटे ३ वाजता काकडा आरती होणार आहे. ४ वाजता श्रीचरणी लघु रुद्राभिषेक व महापूजा होणार आहे. दुपारी जन्मोत्सव झाल्यावर महामंगल आरती होणार आहे. त्यानंतर माधुकरी भिक्षा व भाविकांना महाप्रसाद वाटप होणार आहे.रविवार दि. १५ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता रथोत्सव कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर उत्सवाची सांगता होणार आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश अशा विविध राज्यांतून लाखो भाविकांच्या गाड्या येणार असून, पार्किंगसाठी व्यवस्था करण्यात येत आहे. दर्शन सुलभतेने मिळावे म्हणून नियोजन करण्यात येत आहे. तिन्ही राज्यांतून हजारो सेलिब्रिटी दर्शनासाठी येत असतात. त्यांच्यासाठी कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्याचे नियोजन करण्यात येत आहे. उत्सव सोहळा यशस्वी करण्यासाठी प्रियांक पुजारी, प्रख्यात पुजारी, बाळकृष्ण पुजारी, ऋषिकेश पुजारी, प्रसाद पुजारी, योगेश पुजारी, प्रफुल्ल पुजारी, कर्नाकर पुजारी, भारत पुजारी, आदित्य पुजारी, गिरीश पुजारी,विजय पुजारी, अजय पुजारी, वृषभ पुजारी, प्रसन्ना पुजारी, सचिव चैतन्य पुजारी, रत्नाकर पुजारी, मंदार पुजारी परिश्रम घेत आहेत.

## छत्रपतींच्या स्मारकाने माढ्यात परिवर्तनाची सुरुवात

### आ. अभिजीत पाटील विजयानंतर रायगडावर जाणारे राज्यातील पहिले आमदार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १० डिसेंबर-**

मुंबई येथील तीन दिवसीय विधिमंडळाच्या अधिवेशनानंतर माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी स्वराज्याची राजधानी गाठली आणि छत्रपतींच्या गादीसमोर नतमस्तक झाले.निवडून आल्यानंतर रायगडावर जाणारे राज्यातील पहिले आमदार अभिजीत पाटील हे आहेत.

रायगडाच्या पावन स्थळावर छत्रपतींचा राज्याभिषेक झाला होता. याच ठिकाणी स्वराज्याचा संकल्प पूर्ण केला होता. या ठिकाणी छत्रपतींचे अनेक वर्ष वास्तव होते. या पवित्र ठिकाणी जाऊन आमदार अभिजीत पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेतले. यावेळी अभिजीत पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की छत्रपतींनी हजारो मावळे घडवले आणि स्वराज्याची संकल्पना रुजवली. त्यांच्या प्रेरणेने पुढील पिढ्या घडल्या मराठा साम्राज्याने बलाढ्य शक्तींना परास्त



करत अटकेपार झेंडा रोवला. संपूर्ण महाराष्ट्र स्वराज्याच्या आदर्श संकल्पनांवर उभा राहिला आहे. मला देखील माढा विधानसभेची मिळालेली जबाबदारी एक मावळा म्हणून पूर्ण करायची आहे.असा संकल्प करून आमदार अभिजीत पाटील यांनी छत्रपती शिवरायांच्या चरणी अर्पण करून आर्यशीर्वाद घेतल्याच्या भावना व्यक्त केल्या.

ते पुढे बोलताना म्हणाले की माढा मतदारसंघात या परिवर्तनाची सुरुवात छत्रपतींच्या स्मारकाने होणार आहे. माढा मतदारसंघात छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकही अश्वारूढ पुतळा नाही ही खंत कोणाच्याही मनात राहू देणार नाही असा विश्वास दिला. आमदार अभिजीत पाटील यांनी रायगडावर छत्रपतींचे दर्शन घेतल्यानंतर स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडाचा इतिहास जाणून घेत असताना. महाराजांचे वंशज संभाजीराजे छत्रपती हे देखील योगायोगाने रायगडावर आले होते. यावेळी अभिजीत पाटील यांनी त्यांची आवर्जून भेट घेतली तसेच रायगडावर सुरू असलेल्या संवर्धन कार्याबाबत चर्चा केली. कोणतीही पूर्व सूचना न देता अचानक झालेली भेट आनंददायी ठरली असल्याच्या भावना आमदार पाटील यांनी व्यक्त केल्या.

**अन् विद्यार्थ्यांशी साधला संवाद**

याप्रसंगी त्यांचे रायगड दर्शन सुरू असताना एका ठिकाणी शाळेतील विद्यार्थी इतिहास जाणून घेत असताना त्यांना दिसले. त्यामधील एका शिक्षकांनी आमदार अभिजीत पाटील यांना ओळखले आणि संवाद साधला. यावेळी त्यांनी विद्यार्थी आणि योगायोगाने भेट झालेले स्वराज्याचे वंशज यांच्याशी संवाद साधता आल्याचा आनंद व्यक्त केला. यावेळी आमदार अभिजीत पाटील यांनी रायगडावर इतिहास जाणून घेण्यासाठी काढलेल्या अशा संस्कारित सहलीसाठी शिक्षकांचे अभिनंदन करत त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, संभाजीराजे छत्रपती आणि भविष्यातील अनेक बालक छत्रपती यांची एकत्रित भेट म्हणजे इतिहास वर्तमान आणि भविष्य याचे एकत्रित दर्शन घेऊन नवी ऊर्जा घेऊन परतलो असल्याच्या भावना यावेळी आमदार अभिजीत पाटील यांनी व्यक्त केल्या.

## 'अन्नछत्र'तर्फे पैलवानांना खुराक किटचे वाटप

### ३७ वर्षांपासून अन्नदानाचे अविरत कार्य सुरु

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १० डिसेंबर-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली आणि संकल्पनेतून तालुक्यातील सराव करण्याऱ्या गोरगरीब 'कुस्तीगरांसाठी स्वामींचा प्रसादरुपी खुराकाचे कीट वाटप करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत न्यासाकडून डिसेंबर महिन्यातील ७७ कीटचे वाटप मंगळवारी करण्यात आले.



तालुक्यातील जे पैलवान कुस्ती सरावासाठी कोल्हापूर, पुणे, सोलापूर, धाराशिव, संभाजीनगर आदी ठिकाणी आहेत, अशा कुस्तीगरांसाठी न्यासाकडून गेल्या मकर संक्रांतीच्या दिवशी (जानेवारी महिन्यात) सदरचा उपक्रम सुरू करण्यात आला होता. प्रारंभी ५० जणांना किट देण्यात आले होते. गेली ३७ वर्षे अविरतपणे अन्नदानाचे स्वामीकार्य करणारे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ हे न्यास संपूर्ण देशात ख्यातनाम आहे. संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाच्या कार्यास झळाळी प्राप्त झाली आहे. अन्नछत्र मंडळात दररोज लाखो भाविक महाप्रसादाचा लाभ घेतात. तालुक्यातील कुस्तीगीर हे सरावाकरिता कोल्हापूर, पुणे, सोलापूर, धाराशिव, संभाजीनगर आदि ठिकाणी कुस्तीचा सराव करीत आहेत. मात्र त्यांची गरज ओळखून तालुक्याच्या चांद्या पासून बांध्यापर्यंतच्या कुस्तीगरांचा एका विशेष टीमच्या माद्यमातून सर्वे करून तालुक्यातील ७७ पैलवानांची निवड करण्यात आली आहे. दरम्यान याकामी महाराष्ट्र केसरी पै.मौला शेख बादोला, पै. महेश कुलकर्णी, सरफराज शेख, अतिश पवार यांचे सहकार्य लाभले. याप्रसंगी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, सौरभ मोरे, मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, रोहन शिर्के, दत्ता माने, सरफराज शेख, पै.महेश कुलकर्णी, अभियंता अमित थोरात, बाळासाहेब पोळ, सुमित कल्याणी, गोटू माने, प्रवीण घाटगे, एस.के.स्वामी, सतीश म हिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

**या पदार्थांचा समावेश :** समर्थ महाप्रसाद सेवे बरोबरच आता तालुक्यातील गोरगरीब कुस्तीगीरांसाठी न्यासाकडून प्रसाद रुपी खुराकाचे वाटप प्रती महिन्यास करण्यात येत आहे. या कीटमध्ये कुस्तीगीरांना आवश्यक तूप, बदाम, खारीक, बडीसोप, खसखस, इलायीची, धने आदि पदार्थांचे कुस्तीगरांसाठी श्रींचा प्रसाद रुपी खुराकात या जीनसांचा समावेश आहे.



## बार्शी महाराष्ट्र पोलीस मित्र संघटनेच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी माधवी भालेराव

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ डिसेंबर-**

महाराष्ट्र पोलीस मित्र संघटना महाराष्ट्र राज्य या संघटनेची सोलापूर जिल्ह्यात स्थापना या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री. दिनेश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. जिल्हा कार्याध्यक्षपदी सौ. माधवी सुरेश भालेराव यांची निवड करण्यात आली. तसेच बार्शी तालुका पदाधिकारी निवडण्यात आले. यावेळी बार्शी तालुकाध्यक्ष श्री. विशाल तोडकरी, महिला तालुका अध्यक्ष रेखा सरवदे व तालुका संघटक म्हणून अंजली गवळी यांची निवड करण्यात आली. तसेच सोलापूर जिल्हा व तालुक्यातील कांही भागामध्ये शाखेचे उद्घाटन झाले आहे.

या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित पोलीस अधिकारी यांच्याशी बोलताना संघटनेची उद्दिष्टे खालीलप्रमाणे सांगितली. शहर व तालुक्यात महापुरुषांच्या जयंतीच्या वेळी किंवा कोणत्याही शासकीय कार्यक्रमाचे वेळेस जर मनुष्यबळ कमी पडले तर संघटनेच्या माध्यमातून निःशुल्क मनुष्यबळ पुरविणे, पोलीस बंधु आणि भगीनी यांच्या सर्वांगिण विकासासाठी व त्यांच्या न्याय हक्कासाठी प्रयत्न करणे, पोलीस व सर्वसामान्य नागरीक यांच्यामध्ये सलोख्याचे व सहकार्याचे संबंध निर्माण करणे व प्रशिक्षण देणे, गुन्हेगारांना गुन्हेगारी प्रवृत्तीपासून परावृत्त करण्यासाठी प्रयत्न करणे व त्यांना आदर्श नागरिक बनविणे. या नमूद उद्दिष्टांप्रमाणे कामे करणेसाठी संघटनेची स्थापना करण्यात आली.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## धाराशिवात गीता जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ डिसेंबर -**

११ डिसेंबरला मार्गशीर्ष शुद्ध एकादशीला मोक्षदा एकादशी म्हणतात. याच तिथीला गीता जयंती साजरी केली जाते. त्यानिमित्त श्री बालाजी मंदिर मारवाडी गल्ली येथे गीता जयंती मोठ्या उत्साहात साजरा झाली.

प्रथम ग्रंथ व प्रतिमा पूजन मान्यवरांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक मनिषा गोवर्धन यांनी केले. गीता पाठासाठी प्रत्येक एकादशीला



मंदिर व मंदिरातील सर्व व्यवस्था विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल मंदिराचे अध्यक्ष शामसुंदर बांगड, उपाध्यक्ष अशोक मंत्री, सेक्रेटरी डॉ. भन्साळी यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात आले. मंदिर व्यवस्थापक राजाभाऊ जगताप, कर्मचारी धनश्री जानराव, पुजारी पं. रामनरेश मिश्रा, सत्यनारायण बोरा यांचा देखील शाल श्री फळ व गुच्छ देऊन त्यांच्या सेवेबद्दल सत्कार करण्यात आला. मंदिराला तीन माईक, स्टॅन्ड व वायर भेट देण्यात आली.

गीता पाठणा साठी १३५ भाविक महिला व पुरुष उपस्थित होते. गीता पाठ व विष्णु सहस्र नामाचे सुस्वर पठण करण्यात आले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...




### जि.प. शाळेत विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी शिबिर

**शिराढोण, दि.११ डिसेंबर -**

कळंब तालुक्यातील शिराढोण येथील जि.प. शाळेमध्ये रोटरी क्लब धाराशिव यांचेमार्फत मोफत नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. सकाळी १० वाजता डॉक्टरांची टीम शाळेत दाखल झाली. त्यांचे स्वागत शाळेचे मुख्याध्यापक अहिरे यांनी आलेल्या टीमचे स्वागत केले. पूर्ण दिवसभरात सकाळी १० वाजल्यापासून ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत इयत्ता ५ वी ते १० च्या ३०० विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी अतिशय सखोलपणे मशीनद्वारे करण्यात आली. ही तपासणी नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. शिवरुद्र इसाके आणि नेत्रचिकित्सक एस.बी. शिंदे यांनी केले. तपासणी केलेल्या ३०० विद्यार्थ्यांपैकी ४० जणांच्या डोळ्यामध्ये डिफेक्ट आढळून आला. रोटरी क्लब मार्फत १६ विद्यार्थ्यांना चष्मा मोफत देण्याचे सांगितले. डीफेक्ट आढळलेल्या ४० पैकी ४ विद्यार्थ्यांना पुढील तपासणीसाठी रेफर करण्यात आले.



### केशेगाव येथे कृषी विभागामार्फत पाणी अडवा, पाणी जिरवा मोहीम

**इटकळ, दि.११ डिसेंबर -**

तुळजापुर तालुक्यातील केशेगाव येथे तालुका कृषी अधिकारी तुळजापूर यांच्यावतीने केशेगाव येथे श्रमदानातून नाल्यावर चार वनराई बंधारे नाल्याला पाण्याची धार चालू असल्याने वाहते पाणी सिमेंटच्या गोण्यामध्ये काळी माती भरून नाल्याचे वाहते पाणी अडवण्यात आले. नाल्याचे वाहून जाणारे पाणी जमिनीत मुरून आजूबाजूचे विहिर बोरला याचा फायदा होईल. यासाठी कृषि सहायक आर.के. दुधभाते, युवा प्रशिक्षण अर्थी शिदलिंग कोरे व शेतकरी वर्ग यांनी श्रमदान केले.



### काकासाहेब मुंडे यांची निवड

**कळंब, दि.११ डिसेंबर -**

शहरातील सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य काकासाहेब मुंडे यांची धाराशिव जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या कार्यकारणीवर निवड झाल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक शंकर गोंदकर यांनी केले तर सूत्रसंचालन परमेश्वर मोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन तानाजी गोरे यांनी मानले यावेळी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### चिमुकल्यांची सयाजीराजे पार्कला भेट

**धाराशिव, दि.११ डिसेंबर -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील लिटल फ्लॉवसच्या चिमुकल्यानी अकलूज येथील सयाजीराजे पार्कला भेट देऊन सहलीचा आनंद घेतला. यावेळी सुप्रिया चव्हाण, रत्नमाला पिंपळे, रूपाली पांचाळ, रीतापुरे अश्विनी, व्हरकटे दीदी, नाईकवाडी प्रतिभा, माधुरी गाढवे, स्वाती नायकवडी, स्वाती चव्हाण, सुरेखा पिंपळे, तानाजी पिंपळे, राजकुमार थोडसरे उपस्थित होते.



### आष्टा येथे श्रमदानातून वनराई बंधारा

**जळकोट, दि.११ डिसेंबर -**

येथून जवळच असलेल्या आष्टा (कासार) (ता. लोहारा) येथे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, उपविभागीय कृषी अधिकारी महादेव आसलकर, तालुका कृषी अधिकारी महेश देवकते, मंडळ कृषी अधिकारी नयन मगर यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विभागाच्या संकल्पनेतून व ग्रामस्थांच्या श्रमदानातून कृषी पर्यवेक्षक रवी बनजगोळे, कृषी सहाय्यक सचिन पवार यांनी आष्टा (का) शिवारातील प्रदिप पाटील यांच्या शेतात वनराई बंधाऱ्याची उभारणी केली. या योजनेमध्ये पाणी आडवा पाणी जिरवा तसेच या वनराई बंधाऱ्यामुळे पाणी अडवले जाणार आहे. यावेळी सिद्रामप्पा तडकले, मल्लिनाथ चिंचनसुरे, मुकेश मुळे, प्रदीप पाटील, विजय टिकांबरे, तुळशीदास सगर, मोहन आकडे, सुरेश सोमवंशी, बाशा शेख, अफसर पटेल, प्रवीण हरके, गोपाळ इंगोले, गणेश आकडे, निखिल मदने, बालाजी सूर्यवंशी, कृषि मित्र जिनेंद्र कासार, अमोल बलसुरे व शेतकरी उपस्थित होते.

## ‘प्राचार्या हटाव... प्राचार्या हटाव’ चा पालकांचा नारा....

**व्हीआयपींच्या मुलांना वेगळी ट्रीटमेंट? सर्वसामान्यांच्या पाल्यांबद्दल दुजाभाव; उपस्थित आंदोलनकर्त्या पालकांचा प्राचार्यावर गंभीर आरोप....**






**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ डिसेंबर -**

पोदार स्कुलमधील अत्याचार प्रकरण ताजे असतानाच पालकांनी बुधवारी स्कुलसमोर धरणे आंदोलन करत पोदार प्रशासनाला जाब विचारत धारेवर धरले. व्हीआयपींच्या मुलांना वेगळी ट्रीटमेंट? सर्वसामान्यांच्या पाल्यांबद्दल दुजाभाव असा गंभीर आरोप उपस्थित आंदोलनकर्त्या प्राचार्यावर केला.

सन २०२३ मध्ये पालकांनी धाराशिव येथील पोदार स्कुलमध्ये सुरु असलेल्या अनेक गैरप्रकाराबाबत स्कुलच्या मुख्य कार्यालयाला ई-मेलद्वारे कळविले होते. त्यावर काहीच कारवाई न झाल्याने पालकांनी दि.७ डिसेंबर २०२४ रोजी पोदार स्कुलसमोर धरणे आंदोलनाचा इशारा दिला होता.

त्यानुसार पालकांनी बुधवारी धरणे आंदोलन केले. यावेळी पोदार स्कुलचे मुंबई येथील चिफ ऑफीसर सुजय गिरवलकर यांच्यासह अन्य अधिकारी आले होते. पोदार व्यवस्थापन आणि पालक यांच्यात चर्चा होवून मार्ग काढण्याची विनंती व्यवस्थापनाकडून करण्यात आली.

त्यानंतर पालकांना पोदार स्कुलच्या आत येवून चर्चा करण्याची विनंती केली गेली. यात अनेक पालकांशी चर्चा करुन व्यवस्थापनाने यापुढे प्रशासनिक सुधारणा करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे सांगितले. यादरम्यान झालेल्या आंदोलनात प्राचार्य हटावचा नारा देण्यात आला. पोदार स्कूलमध्ये गेल्या कांही दिवसात अनेक गैरप्रकार सुरू आहेत. काही गैरप्रकार तर आत चव्हाट्यावर आले आहेत. यातील एक चौकशी समिति नेमली गेली. या समितीने मंगळवारी चौकशीसाठी पोदार स्कूलला भेट दिली.

मात्र सन २०२३ मध्ये शिक्षण विभागाकडे दिलेल्या तक्रारीवर सन २०२४ मध्ये चौकशी समिती नेमून शिक्षणाधिकारी या स्कूलच्या कारनाम्यांना छुपा पाठिंबा तर नव्हता ना? असा प्रश्न पालकांतून उपस्थित केला जात आहे. याबाबत विचारण्यासाठी शिक्षणाधिकारी यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र नेहमीच्या सवयीप्रमाणे त्यांनी भ्रमणध्वनी उचलला नाही.

### शिक्षण विभागाच्या कमिटीला पोदारकडून शाही मेजवाणी?

वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या पोदार इंटरनॅशनल स्कुलमध्ये घडलेल्या अत्याचार प्रकरणाची चौकशी करण्यासाठी शिक्षण विभागाची कमिटी स्कुलमध्ये गेली होती. या बैठकीत पोदार स्कुलविषयी कडक भुमिका घेणे महत्वाचे होते. तसेच चौकशी समितीकडून विद्यार्थ्यांच्या हितासंदर्भात निर्णय घेण्यासाठी स्कुलला निर्देश देणे महत्वाचे होते. मात्र पोदार स्कुलकडून शिक्षण विभागाच्या समितीला शाही मेजवानी देवून आपले तोंड चुप केले?

### व्यवस्थापनाकडून प्राचार्याला वाचविण्याचा प्रयत्न...

पालकांनी विद्यार्थ्यांच्या बाबतीत धाराशिव येथील पोदार स्कुलमध्ये सुरू असलेल्या प्राचार्या श्रीमती तितुका यांच्याबाबत दि.२० मार्च २०२३ आणि २५ मार्च २०२३ रोजी ई-मेलद्वारे तक्रार केली होती. त्यासंदर्भात धाराशिव, लातूरचे एजीएम यांनी पालकांना ३ महिन्यात सुधारणा करू, असे आवाश्वास दिले होते. मात्र आज पावणे दोन वर्षानंतरही सुधारणा झाली. यामुळे पालकांनी बुधवारी धरणे आंदोलाचा मार्ग निवडला. यावेळी शाळेच्या वरिष्ठांकडून प्राचार्या मॅडमला वाचविण्याचा प्रयत्न केला असल्याचे यावेळी दिसून आले.



## कर्तव्यात कसुर करणाऱ्या पोस्टमनवर कारवाई करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.११ डिसेंबर -**

कर्तव्यात कसुर करणाऱ्या नळदुर्ग येथील पोष्टमनवर पोष्ट विभागाने कारवाई करावे अन्यथा या विरोधात आंदोलन करण्याचा इशारा शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके यांनी नळदुर्ग येथील पोष्ट मास्तर यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

या निवेदनात ज्ञानेश्वर घोडके यांनी म्हटले आहे की, ॲड. भारत बर्वे यांच्या मार्फत आरपीएडीद्वारे दि.३ डिसेंबर रोजी आर्टिकल नं. (RM376935219IN) नोटीस पाठविली होती. मात्र संबंधित पोस्टमन यांनी संबंधित व्यक्तीला ही नोटीस Serve न करता त्या व्यक्तीशी संगणमत करुन त्या व्यक्तीशी फोनवर संपर्क साधुन पोस्टमन यांनी त्यांना नोटीस आल्याची माहिती देऊन सदरच्या नोटीसवर Unclaimed असा शेरा मारला आहे.



वास्तविक पाहता आरपीडीने नोटीस पाठविल्यानंतर संबंधितास सदरील नोटीसची सुचना दिली व सदरील लेखी सुचना सात दिवसांपर्यंत दिली असा शेरा मारून पोस्टमन यांनी सदरील नोटीस पाठविणाऱ्यास परत करणे नियमानुसार बंधनकारक असतांना सदरील पोस्टमन यांनी त्या व्यक्तीशी संगनमत करुन कर्तव्यात कसुर केले आहे.

त्यामुळे संबंधित पोस्टमनवर तात्काळ कायदेशीर कारवाई करावीसंबंधित व्यक्ती नळदुर्गमध्ये असतांना त्याला नोटीस न बजावणाऱ्या पोस्टमन वर कारवाई करावे अन्यथा याविरोधात आंदोलन करण्यात येईल असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.

दिलेल्या सदरील या निवेदनावर शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके, शहर प्रमुख शिवाजी सुरवसे, दीपक घोडके, गौस कुरेशी, इरफान शेख, अफझल कुरेशी, सचिन शिंदे, रामेश्वर घोडके, नितीन शिंदे, सुरज किल्लेदार व विशाल सुरवसे यांच्या आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने भूमीपुत्रांच्या सन्मानाचे रविवारी आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.११ डिसेंबर -**

संघर्ष सामाजिक प्रतिष्ठान वडगाव काटी (ता. तुळजापूर) यांच्या वतीने गावातील गुणवंत व यशस्वी अधिकारी, कर्मचारी यांच्या सन्मान सोहळ्याचे रविवार १५ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजन करण्यात आले आहे

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून डीवायएसपी प्रदीप भाले, उपविभागीय अभियंता प्रसाद काटकर, पीएसआय प्रदीप टेकाळे, शिक्षण विस्तार अधिकारी तात्यासाहेब माळी हे उपस्थित राहणार आहेत. तर प्रमुख वक्ते म्हणून शिवाजीराव पवार हे उपस्थित राहणार आहेत. वडगाव काटी येथील विविध क्षेत्रात गरुड झेप घेतलेल्या रेवनसिध्द आंधळकर, दत्ता राऊत, तानाजी धावणे, संतोष चुंगे, विनोद चोरघडे, किरण साखरे, रामचंद्र जाधव, लक्ष्मण साखरे, रामचंद्र साखरे, प्रभू कुंभार, श्रीकांत काळे, समाधान साखरे, संकेत माळी या मान्यवरांच्या सन्मान करण्यात येणार आहे.

तरी सोहळ्यास जनतेने उपस्थित रहावे, असे आवाहन संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष दत्तात्रय डोके, चंद्रशेखर सपाटे यांनी केले आहे.

## श्रीमद्भगवत गीतेतील आचरण केल्यास राष्ट्र बलवान झाल्याशिवाय राहणार नाही : बिराजदार



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.११ डिसेंबर -**

श्रीकृष्णाने अर्जुनाला रणांगणावर श्रीमद्भगवत गीता सांगितली. त्यातील कर्मयोगाचे आचरण जर प्रत्येकाने केले तर कुटुंब, समाज व राष्ट्र बलवान झाल्याशिवाय राहणार नाही, असे मत बिराजदार यांनी गीताजयंतीच्या निमित्ताने मांडले.

दि.११ डिसेंबर रोजी श्री. राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित, स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर उमरगा येथे गीताजयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना बिराजदार म्हणाले की, भगवान श्रीकृष्णाने संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी अर्जुनाला गीतेतील तत्वज्ञान सांगितले जेणे करुन मानवजातीचे कल्याण होईल.

अर्जुनाला त्याच्या कर्तव्याची जाणीव करून दिली. गीतेमधून आपल्याला विद्या प्राप्त करायची असेल तर स्वावलंबन, जिज्ञासा, विनम्रता व सेवावृत्ती आपल्याजवळ असली पाहिजे, असे मत त्यांनी मांडले. यावेळी मुख्याध्यापिका लोहार यांनीही आपले मत मांडले.

कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून जेष्ठ शिक्षक आष्टे गुरुजी उपस्थितीत होते. कार्यक्रमआसामी सर्व विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

## नवोदय विद्यालयात प्यारे कवी सुब्रमण्यम भारती यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ डिसेंबर -**

पीएमश्री जवाहर नवोदय विद्यालय तुळजापूर येथे प्यारे कवी म्हणून ओळखले जाणारे सुब्रमणम भारती (तमिळ कवी) यांचा जन्मदिन बुधवार दि.११ डिसेंबर रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम विद्यालयाचे प्राचार्य के.वाय. इंगळे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावरती वरिष्ठ अध्यापक एस.डी. खोब्रागडे, भाषा शिक्षक वृंद एस.एस. माने, एच.जी. जाधव, टी.ए. काळे, एस.आर. कराड, व्ही.एस. जाधव, एस.डी. वाघमारे, बी.एम. गवले, छाया घोटणकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. याप्रसंगी श्रीहरी जाधव यांनी सुब्रमण भारती यांची जयंती प्यारे कवी म्हणून संपूर्ण भारतात का साजरी केली जाते हे सांगून ही जयंती साजरी करण्या पाठीमागचा उद्देश स्पष्ट केला.




प्राची कुडकुले, काव्या चौधरी, संस्कृती जाधव, आराध्या पाटील, वैभव जगताप या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या भारतीय भाषेत भाषणे, गीत सादर करून सर्व विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या भाषेतून एकता कशी निर्माण केली जाते हे दाखवून दिले.

शेवटी विद्यालयाचे प्राचार्य के.वाय. इंगळे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सुब्रमण भारती यांच्या कार्याची ओळख करून देऊन अनेक भाषा लोप पावत चाललेल्या आहेत त्या जिवंत ठेवण्यासाठी सुब्रमण्यम भारती यांचे योगदान किती महत्त्वपूर्ण आहे, हे सांगून सर्व विद्यार्थ्यांना अनेक भाषा अवगत करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीहरी जाधव यांनी केले. कार्यक्रमास विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षक उपस्थित होता.

## नवनिर्वाचित आमदार स्वामी यांनी दिली केसरजवळगातील शाळेला भेट

### विद्यार्थ्यांच्या प्रकृतीची केली विचारपूस...

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.११ डिसेंबर -**

उमरगा तालुक्यातील केसर जवळगा येथील महात्मा गांधी विद्यालयात विद्यार्थ्यांना रक्तवर्धक गोळ्या दिल्याने उलटीचा त्रास झाला होता ही घटना सोमवारी घडली होती. त्यामुळे आमदार प्रवीण स्वामी यांनी बुधवारी केसरजवळगा येथे येऊन शाळेला भेट दिली व विद्यार्थ्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. तसेच अशा घटना पुन्हा होऊ नये यासाठी शिक्षक व पालकांनी खबरदारी घ्यावी अशा सूचना दिल्या.



शाळेतील विद्यार्थ्यांना रक्तवर्धक गोळ्या दिल्याने मळमळ आणि उलटीचा त्रास झाला होता. त्यामुळे विद्यार्थ्यांना मुरूम ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. त्यानंतर या विद्यार्थ्यांना उपचार करून घरी परत पाठवण्यात आले. सध्या एका विद्यार्थ्यावर उपचार सुरू असून प्रकृती ठीक आहे. या घटनेची माहिती मिळताच आमदार प्रवीण स्वामी यांनी मुंबईत असतानाही रुग्णालय प्रशासनाशी फोनवरून माहिती घेत होते. आज बुधवारी मतदारसंघात आल्यानंतर त्यांनी प्रथमतः केसर जवळगा येथील या शाळेत भेट देऊन विद्यार्थ्यांचे आस्तेवाईकपणे संवाद साधला केली. यावेळी आमदार स्वामी म्हणाले की विद्यार्थ्यांनी रिकाम्या पोटी औषधे घेऊ नये पालकांनी व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष द्यावे कसल्याही प्रकारचे वाईट प्रकार घडू नये यासाठी विशेष काळजी घ्यावी. घडलेल्या घटनेबद्दल याबाबत योग्य ते चौकशी करण्याचे आदेश यापूर्वी देण्यात आले आहेत. यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्रीमंत भुरे, बसवराज वरनाळे, मुख्याध्यापक डी.एस. कुलकर्णी, तंटामुक्त अध्यक्ष शब्बीर इनामदार, अमोल पटवारी, प्रभाकर हुलगजे, संदीप पाटील, उमेश कारभारी आदी जण उपस्थित होते. यावेळी आमदार श्री स्वामी यांच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.

त्यानंतर आमदार स्वामी यांनी मुरूम ग्रामीण रुग्णालयाला भेट दिली. येथे एका विद्यार्थ्यावर उपचार सुरू आहे. या विद्यार्थी व त्याच्या पालकाशी स्वामी यांनी संवाद साधला तसेच रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्याशी चर्चा केले.



### अधिक्षक अभियंता रुपाली ठोंबरे यांची तेरणा धरणास भेट

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.११ डिसेंबर -**

धाराशिव तालुक्यातील तेर जवळील तेरणा धरणास भेट देऊन चालू असलेल्या कॅनॉलच्या कामाची पाहणी लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या अधिक्षक अभियंता रूपाली ठोंबरे यांनी केली.

यावेळी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता अजित मदने, उपविभागीय अभियंता दिपक नाईकनवरे, शाखा अभियंता धनंजय वरपे आदी अधिकारी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## भारतीय संविधानावर दगडाने हल्ला करणाऱ्या समाजकंटकाचा निषेध



तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.११ डिसेंबर – कन्नड येथे परभणी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुताळ्या समोर संविधानाची प्रतिकृतीची दगडाने फोडल्या प्रकरणी राजकिय सामाजिक संघटनाच्या वतीने जाहिर निषेध व्यक्त करत तहसिलदार विद्याचरण कडवकर यांना निवेदन देण्यात आले आहे.परभणी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुताळ्या समोर संविधानाची प्रतिकृतीची दगडाने फोडून सोपान दत्तराव पवार या समाज कंटकाने विटंबना केली आहे. सोपान दत्ताराव पवार हा मनुवादी विचार सरणीचा असून संविधानावर हल्ला म्हणजे तथागतांच्या समतेवर हल्ला संविधावर हल्ला म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्यावर हल्ला, संविधानावर हल्ला म्हणजे छत्रपती संभाजी महाराज यांच्या युक्तीवादावर हल्ला, संविधानावर हल्ला, म्हणजे, महात्मा फुले यांच्या समतेवर हल्ला, संविधनावर हल्ला म्हणजे बाबासाहेबाच्या विचारवर हल्ला, संविधानावर हल्ला म्हणजे आंबेडकरी विचारावर हल्ला म्हणून अशा मनुवादी समाजकंटकाचा कन्नड तालुक्यातील सर्व भिम सैनिक, सर्व राजकिय सामाजिक संघटनाच्या वतीने जाहिर निषेध करीत असून संबधितावर तात्काळ देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनावर अनिल सिरसाठ, सिद्धार्थ निकाळजे, गणेश मोरे, कडुबा पवार, संदीप सातदिवे,अशोक महाले,कमलाबाई घाडगे,अमोल साळवे, अक्षय महाले,सतीश धनेधर,सागर मोरे,विशाल पवार,राकेश पवार,जितेंद्र साठे,बापू मोरे,राहुल सातदिवे, मुकेश गायकवाड,दिलीप गायकवाड, गौतम धनेधर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत

## पैठणला बांगलादेशचा तीव्र निषेध



तभा वृत्तसेवा

पैठण दि ११ :- बांगलादेशात हिंदूं ,बौद्ध व इतर अल्पसंख्यांकावर होणाऱ्या अत्याचार ,धार्मिक स्थळांची विध्वंस ,महिलांवरील अत्याचार,धर्मांतरण व कृष्णदास चिन्मयजी यांना झालेल्या अटकेच्या निषेधार्थ सकल हिंदू समाज पैठणच्या वतीने विर महाराणा प्रताप चौक, बस स्टँड परिसर पैठण येथे बांगलादेश विरुद्ध तीव्र निर्दशने करण्यात आली. याठिकाणी भरातमतेच्या भक्तिच्या घोषणा देण्यात आल्या, तसेच बांगलादेशाच्या विरूद्ध निषेधाच्या जोरदार घोषणा देऊन तीव्र निदर्शन करण्यात आले. बांगलादेशातील इस्लामिक जीहाद्यांनी छात्र आंदोलनाच्या नावाखाली पूर्वनियोजित हिंदुंचा सामूहिक नरसंहार सुरू केला असून, त्या मध्ये मोहम्मद युनूस, पोलीस प्रशासन, तथाकथित बुद्धिजीवी यांचा देखील प्रत्यक्ष सहभाग आहे. एकीकडे युनूस यांना शांततेसाठी नोबेल पुरस्कार मिळाला असून, त्यांच्याच पुढाकाराने व कार्यकाळात त्यांच्या देशात सरास जगजाहीर हिंदू, बौद्ध इतर अल्पसंख्यांक चे हत्याकांड होत आहे. विशेषतः इस्कॉन, ज्यांनी बांगलादेशी नागरिकांच्या सुखदुः खात साथ दिलेली आहे. पूरग्रस्त परिस्थितीत भुकेलेल्यांना अन्न पुरवण्याचे काम केलेले असताना बांगलादेशाच्या सार्वभौमतेला धोका पोहोचलेला नाही, स्वतःची भक्ति श्रेष्ठ व इतरांची भक्ती खोटी असा प्रसार केलेला नाही, तेंव्हा बांगलादेशाच्या राष्ट्रीय सुरक्षेला धोका पोहोचलेला नाही. मात्र, असे असतानाही केवळ धार्मिक दृष्टिकोनातून त्यांची हत्याकांड केली जात आहे, जागतिक संघटनेने दखल घेणे योग्य आहे, परंतु तसे होताना दिसत नाही. त्यामुळे आदरणीय पंतप्रधान महोदय, यांना तहसीलदार यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले. सदर निवेदनात, बांगलादेशातील हिंदूंवरील वाढत्या अत्याचारांबद्दल तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली, यात मंदिरांवर हल्ले, धार्मिक नेत्यांच्या अटक आणि हिंदू महिलांवरील अत्याचार यांचा समावेश आहे. हिंदू नेते चिन्मय कृष्ण महाराज यांना अन्यायकारक अटक झाली असून, त्यांना मूलभूत हक्क नाकारले गेले आहेत आणि त्यांचे जीवन धोक्यात आले आहे असेही सांगण्यात आले. हिंदूंनी शांततापूर्ण आंदोलन केले असता त्यांना दडपण्यात आले, ज्यामुळे बांगलादेश सरकारच्या हेतूंवर प्रश्न उपस्थित होतो आहे, त्यामुळे सरकारला पुढील गोष्टींबाबत त्वरित पावले उचलण्यात आले

हिंदू धार्मिक स्थळांचे संरक्षण करावे,अटक झालेल्या हिंदू नेत्यांची सुटका करावी,हिंदू महिलांवरील अत्याचार थांबवावेत,हिंदू विरुद्धच्या ऑनलाइन द्वेष मोहीम थांबवाव्यात, संयुक्त राष्ट्र संघाच्या मार्फत शांती सेना बांगलादेश मध्ये पाठवण्यात यावी.

बांगलादेशातील हिंदूंना न्याय आणि संरक्षण मिळावे यासाठी कठोर पावले उचलण्याची अपेक्षा आंदोलनावेळी व्यक्त कण्यात आली.

## ग्रामीण रुग्णालय बिडकीन येथे आयुष्यमान भव शिबीर अंतर्गत २८० रुग्णांची तपासणी



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि .११ डिसेंबर पैठण तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय बिडकीन येथे आज दि .११ रोजी ग्रामीण रुग्णालय अधीक्षक डॉ .विजय दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली आयुष्यमान भव अंतर्गत शिबीर राबविण्यात आले असून या शिबीर मध्ये २८० रुग्णांची उच्च रक्तदाब, मधुमेह, नेत्ररोग, या आजारांवरही विषयी माहिती देवून योग्य तपासणी करण्यात आल्या या कार्यक्रमा प्रसंगी ग्रामीण रुग्णालय अधीक्षक डॉ. विजय दळवी, वैद्यकीय अधिकारी डॉ.अस्मा शेख, डॉ .प्रणिता मात्रे, डॉ. निकीता जोंधळे,शेजुळ सिस्टर, नेटके सिस्टर, भाग्यश्री सोळुंके,कोंदडे, प्रशांत योगी, अतुल कवसनकर, पत्रकार अरुण देविदास,अली इनामदार, अलीम शेख, गणेश सोनवणे,आदी रुग्णालयातील कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## वीज तांत्रिक कामगार संघटनेचा वर्धपान दिन साजरा




वाळूज महानगर (प्रतिनिधी) : बजाजनगर येथील पोलीस ठाण्याच्या बाजूला असलेल्या वीज उपविभाग येथील कार्यालयाजवळ महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार संघटनेचा २७ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी कैलास गौरकर, विश्वंभर लोखंडे, रफिक शेख, संजय शाहीर, अकबर, निलेश लोखंडे, शरद पाचोडे, रविंद्र दाभाडे, वैभव बनकर, अमोल बोर्डे , खलील , सुरेश ताकपिर, रवींद्र उमाप आदींसह तसेच बजाज नगर शाखा कार्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## एसबीआयचा २ कोटी कार्ड्सचा टप्पा पार

छत्रपती संभाजीनगर, १० डिसेंबर २०२४: भारतातील सर्वात मोठे प्युअर प्ले क्रेडिट कार्ड जारीकर्ता, एसबीआय कार्ड ने संपूर्ण देशात नाविन्यपूर्ण उपाय देणे आणि ग्राहकांचा अनुभव समृद्ध करण्याच्या वचनबद्धतेला अधोरेखित करत २ कोटी कार्ड्सचा टप्पा ओलांडला आहे. हे यश भारताच्या क्रेडिट कार्डच्या लँडस्केपमध्ये बदल करण्यात एसबीआय कार्डची महत्त्वाची भूमिका आणि 'डिजिटल इंडियाचे चलन' चे वचन देखील अधोरेखित करते.

एसबीआय कार्ड १९९८ मध्ये आले. अगदी सुरुवातीपासून एसबीआय कार्ड ग्राहकांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी उत्पादनांच्या विस्तृत श्रेणीची रचना करण्यात अग्रेसर आहे. विचारशील कोर कार्ड्स, प्रीमियम ब्रँड्ससह सह-ब्रँडेड भागीदारीपासून आणि रिवॉर्ड्स-चालित आणि जीवनशैली-केंद्रित ऑफरपर्यंत, एसबीआय कार्डने भारतीय क्रेडिट कार्ड उद्योगात ग्राहक-केंद्रित नवोपक्रमासाठी सातत्याने नवीन बेंचमार्क सेट केले आहेत आणि बाजारपेठेत आपले नेतृत्व मजबूत केले आहे. एसबीआय कार्डने वित्त वर्ष १९ आणि वित्त वर्ष २४ च्यादरम्यानात कार्डांमध्ये सुमारे २५% सीएजीआर आणि खर्चात २६% सीएजीआर ची मजबूत वाढ दाखवली आहे.

## वाहतूक शाखेची थकीत दंड वसुली मोहीम



वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून पळून जाणार्या वाहनांवर ऑनलाईन दंड आकारण्यात येतो, परंतु वाहनचालक निघून जात असल्यामुळे हा दंड वसूल करण्यात कसूर केला जातो म्हणून वाळूज येथील वाहतूक शाखेच्यावतीने दंड वसूल मोहिम राबवून दंड वसूल करण्यात आला. सकाळी ११ ते १ वाजेच्या दरम्यान बजाजनगर येथील मुख्य रस्त्यावर वाळूज एमआयडीसी वाहतूक शाखेच्यावतीने दंड वसूल मोहिम राबविण्यात आली होती. या मार्गावरून जाणार्या प्रत्येक चारचाकी वाहनांना थांबवून त्यांच्याकडून थकीत दंड वसूल करण्यात येत होता. दोन तासाच्या या मोहिमेत वाहतूक शाखेच्या पथकाने २० कारवाया करत तब्बल २७ हजार रुपयांचा दंड वसूल केला. या पथकात एसआय गोरख दाणे, राहुल पातोडे, विलास शिरसाट, संतोष कटारे आदींचा समावेश होता.

## राहुल राठोड यांची बंजारा बिग्रेड च्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष पदी निवड



सोयगाव,दि.११ डिसेंबर : सोयगाव तालुक्यातील वरखेडी(बु) येथील राहुल अंकुश राठोड यांची बंजारा बिग्रेड च्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. बंजारा बिग्रेड चे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत राठोड यांनी या निवडीचे नियुक्ती पत्र त्यांना सोपविले आहे. मागील दहा वर्षापासून राहुल राठोड बंजारा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक उन्नती साठी कार्य करीत असून सामाजिक चळवळीच्या माध्यमातून त्यांनी बंजारा समाजाच्या हितासाठी अनेक उपक्रम ही राबविले आहेत. त्यांच्या याच कार्याची दखल घेवून बंजारा शिक्षण सेवा अभियानाचे कार्यकारी समन्वयक भरत पवार व केंद्रीय समिती ने बंजारा बिग्रेड च्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष पदासाठी राहुल राठोड यांच्या नावाची शिफारस केली होती.या पार्शवभूमीवर बंजारा बिग्रेड चे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत राठोड यांनी बंजारा ब्रिगेड या सामाजिक संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पदी राहुल राठोड यांची निवड करण्यात आल्याचे जाहीर करून त्यांना या निवडीचे नियुक्ती पत्र सोपविले आहे. दरम्यान या निवडीनंतर त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होतांना दिसत आहे.

## आर्य चाणक्य शाळेत १२५१ विद्यार्थ्यांचे भगवतगीता पठण



तभा वृत्तसेवा

पैठण दि ११ : भारतीय शिक्षण प्रसारक संस्था , अंबाजोगाई द्वारा संचलित आर्य चाणक्य प्रा.विद्यामंदिर पैठण येथे गीता जयंती निमित्ताने गीतेच्या १२व्या, १५ व्या अध्यायाचे पठण १२५१ विद्यार्थ्यांनी सामूहिक रितीने केले .

भारतीय संस्कृती व हिंदू धर्मात सर्वश्रेष्ठ असलेल्या श्रीभगवद्गीता आहे.तेव्हा गीता जयंती निमित्ताने आर्य चाणक्य प्रा . विद्यामंदिर,पैठण येथे कार्यक्रमाचे अध्यक्ष भास्कर कुलकर्णी,प्रमुख अतिथी ड मयुरेश औटे,रेणूकादास गर्गे आदी मान्यवरांच्या शुभहस्ते श्रीभगवद्गीता ग्रंथ,ज्ञानेश्वरी ग्रंथ ,भारत भारत माता, श्रीकृष्ण व अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले .

विद्यार्थी शालेय गणवेशात व अतिशय शिस्तीत बसून गीतेच्या १२ व्या व १५ या अध्यायांच पठण करण्यात आले.अतिशय भावस्पर्शी अनुभव याप्रसंगी उपस्थितींनी अनुभवला. याप्रसंगी अतिशय आकर्षक व सुंदर अशी रांगोळी श्रीमती राखी धोकटे यांनी काढली होती.कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मयुरेश औटे यांनी १२व्या व १५व्या अध्यायातील काही श्लोकांचे विद्यार्थ्यांना महत्त्व समजावून सांगितले व विद्यार्थ्यांना कर्म करत राहणे असे सांगितले सोबतच रेणुकादास गर्गे यांनी गीतेच्या श्रेष्ठते विषयी माहिती दिली. मार्गदर्शनानंतर सर्व विद्यार्थ्यांना प्रसाद म्हणून राजगिरा लाडू देण्यात आले.याशुभ प्रसंगी मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी यांच्या उत्तम नियोजनाने व मार्गदर्शनात सर्व शिक्षकांनी कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना गिरवलकर यांनी केले व आभार राखी धोकटे यांनी केले.

## विस्डम इंग्लिश स्कूलमध्ये क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन



वाळूज महानगर(प्रतिनिधी) : बजाजनगर येथील विस्डम इंग्लिश स्कूल मध्ये क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक मिर्झा अकबर बेग, संस्थाचालक मिर्झा अजगर बेग यांची प्रमुख उपस्थिती होती. शाळेच्या विद्यार्थ्यांनी परेड, संचालन करून पाहुण्यांचे स्वागत केले. या क्रीडा महोत्सवात, कबड्डी, खो-खो ,क्रिकेट, मास पीटी, परेड, लिंबू चमचा, रनिंग, लांब उडी, सॅक रेस, स्टिक बॅलन्स अशा विविध खेळाचे आयोजन करण्यात आले आहेत. या क्रिडा सप्ताहातील सर्व खेळ क्रिडा विभाग प्रमुख प्रा. कैलास जाधव (क्रीडा विभाग प्रमुख) यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आल्या. सूत्रसंचालन कविता कतापल्ले, यांनी केले तर स्पर्धा यशस्वीतेसाठी पूनम पाटील, चेतना पटेल, अश्विनी उगले, शुभांगी महाजन,आरती डहाळे , निशिगंधा तायडे, ज्योती गायके , स्नेहल पाटील, मीनाक्षी परदेशी, ज्योती कापसे, शितल खैरनार, वंदना चाहुरे, मयुरी घोगले, पूजा कवाडे , बालिका कांबळे , कावेरी लोखंडे, गायत्री पवार, सारिका पवार, यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न केले तर आभार प्रा. कैलास जाधव यांनी मानले.

## पंढरीनाथ दादा हूड यांचे निधन



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि. ११ डिसेंबर पंढरीनाथ दादा हूड वय ६० वर्ष रा .पाडळी ता .पैठण यांचे दि. १० मंगळवार रोजी सकाळी अकरा वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर संध्याकाळी सहा वाजता पाडळी स्मशानभूमी येथे अंत्यविधी करण्यात आली, यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलं दोन मुली, सुना, जावई, नातवंडे, असा मोठा परिवार आहे.

## भारत सरकारने बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदूंच्या रक्षणासाठी पावले उचलावी

### सोयगावात सकल हिंदू समाजाचे प्रशासनाला निवेदन




तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.११ डिसेंबर

बांगला देशात अल्पसंख्याक हिंदूवर होत असलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ सोयगावात सकल हिंदू समाजाच्या वतीने दि.१० मंगळवारी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसिल कार्यालय पर्यंत निषेध रॅली काढण्यात आली.बांगलादेशात गेल्या काही महिन्यांपासून या देशात अल्पसंख्यांक हिंदूच्या मानवाधिकार,मालमत्ता आणि जिविताचे हनन होत आहे.हिंदू मंदिरांची तोडफोड,जाळपोळ,नासधूस केली जात आहे.बांगला देशातील अल्पसंख्यांक हिंदुच्या रक्षणासाठी भारत सरकारने जागतिक स्तरावरून पावले उचलून कठोर कार्यवाहीची मागणी करावी.अमानवीय अत्याचारांमुळे बागला देशातील हिंदू समूदाय त्रस्त आणि व्यथीत झाला आहे.मानवाधिकारांचे हनन थांबविण्यात यावे अश्या मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.सकल हिंदू समाजाच्या वतीने तहसिल प्रशासनास निवेदन देण्यात आले.यावेळी सुधीर नाना कुलकर्णी,सुनील गव्हांडे,गजानन चौधरी,ह.भ.प.सुधन्वा महाराज केनेकर,दीपक कोरडे,योगेश नागपुरे,सचिन चौधरी,मयुर चौधरी,महेश मानकर,राम सोहनी,योगेश मानकर,कमलेश काळे,संजय मोरे,कृष्णा पाटील,हर्षल अस्वार,भारत हिरे,लोकेश पाटील,दीपक पाटील,विजय गव्हाड,राजू फुसे,हर्षल बारी,राहुल मानकर,रविराज गिरी,पप्पू पठाडे,अजय नेरपगारे आदींसह सकल हिंदू समाजातील अनेकांची उपस्थिती होती.

## पैठण येथील गीता मंदिरात गीता जयंती साजरी



तभा वृत्तसेवा

पैठण दि ११ :- दक्षिण काशीतील श्रीक्षेत्र पैठण नगरीतील संतनगर परिसरातील प्रसिद्ध गीता मंदिर मध्ये मोक्षदा एकादशीच्या शुभ पर्वावर गीता जयंती भक्तीमय वातावरणामध्ये साजरी करण्यात आली.गीता मंदिर अध्यक्ष विष्णू महाराज जगताप यांच्या हस्ते मंदिरातील सुरेख कृष्ण मुर्तीचा अभिषेक पुजारी महेश चैतन्य यांच्या मंत्रघोषात करण्यात आला.यावेळी भाविकांनी कृष्ण मुर्तीवर व गीता ग्रंथावर पुष्पवृष्टी करून आरती केली. मंदिर गाभाऱ्यातील श्रीमद भगवत गीतेचे १८आध्यायातील ७०० श्लोक काळ्या पाषाणावर सोनेरी अक्षरात संस्कृतमधून कोरलेले आहेत. गाभारा द्वारावर १२० श्लोक विष्णू शहसत्रनाम कोरलेले आहेत.भव्य मंदिरात महाभारत घडामोडीतील संपूर्ण घटनेंचे चांगले चित्र रेखाटलेली आहेत.भाविक ही रेखाटलेली चित्र आवर्जून पहातात. मंदिरात दररोज दुपारी मोफत अन्नदान केले जाते. कृष्ण मुर्तीचा दररोज कृष्ण भक्तांकडून अभिषेक केला जातो. धार्मिक,वारकरी शिक्षण बालगोपाल किशोरवयीन मुले येथे घेतात.येथे मुलांची राहण्याची सोय ही आहे. शालेय शिक्षणासाठी मुले शहरातील शाळेत जातात जयंती उत्सव साजरा करण्यासाठी पांडुरंग महाराज शिंदे, परमेश्वर मुंढे,कृष्णा पठाडे, गणेश जगताप, विवेक जाधव, गजानन ढवळे, कपिल जगताप, अदिंनी परिश्रम घेतले.वैकुंठ बाजीराव महाराज जवळेकर यांनी गीता मंदिर बांधले आहे. मोक्षदा एकादशी पर्वावर शहरातील मठ मंदिरातून किर्तन प्रवचनासह गीता जयंती साजरी करण्यात आली.

## थंडीने भरली हुडहुडी, सोयगावात गुळाचा चहा जरा कडकच

### गुळाच्या चहासाठी गर्दी..; सर्दी-खोकला पळविण्यासाठी घरगुती औषध



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.११ डिसेंबर

तालुक्यात वाढलेले तापमान दोन दिवसांपासून घसरत आहे. त्यामुळे पुन्हा थंडी परतली आहे.हिवाळ्यात शरीराला उष्णता मिळावी, यासाठी मसालेदार आणि पौष्टिक पदार्थांच्या सेवनाकडे सोयगावात नागरिकांचा कल वाढलेला आहे.त्यामुळे सोयगाव शहरात दिलीप सुरडकर यांचा गुळाच्या चहा साठी गर्दीही वाढली आहे. चहा, सर्दी-खोकल्यावर औषध म्हणून काढ्यासाठी दालचिनी, लवंग, बडीशेप, वेलची, सुंठ आदी मसाल्याच्या पदार्थांच्या खरेदीसाठी आता गर्दी दिसत आहे.

सध्या सोयगाव तालुक्याचे तापमान १६.८ अंशांपर्यंत खाली आले आहे. वातावरणात गारवा जाणवत असल्याने सर्दी, खोकला, ताप आदींचे रुग्ण वाढले आहेत. त्यामुळे मसालायुक्त चहा, मसाल्याचा काढा बनविण्याचा कल वाढला आहे. त्याकरिता विविध मसाल्याचे पदार्थ

खरेदी केले जात आहेत. मागणी वाढली असली तरी मसाल्याचे भाव बाजारात स्थिर असल्याचे दिसत आहे. सोयगावात थंडीत गुळाच्या चहाला पसंती !

गूळ हा आरोग्यासाठी फायदेशीर तसेच शरीराला उष्णता देतो, तर कोलेस्ट्रॉल वाढू देत नाही. त्यामुळे थंडीत गुळापासून विविध पदार्थ सोबत आता गुळापासून तयार केलेला चहा पिण्याला देखील नागरिकांची पसंती मिळत आहे. गणपती, दसरा व दिवाळीत गुळाचा वाढलेला भाव कमी झाला असून आता गुळाचे भाव ४८ रुपये ५५ रुपये किलो आहे...सोयगाव शहरात एकमेव एका चहाच्या हॉटेलमध्ये गुळाचा चहा फेमस झालेला असून दिलीप सुरडकर हे गुळाचा चहा बनविण्यासाठी प्रसिद्ध आहे रात्री गुळाचा पाक तयार करून पहाटे या गुळाच्या पाका पासून दिलीप सुरडकर हे गुळाचा चहा बनवितात त्यांनी बनविलेल्या गुळाच्या चहा पासून मात्र हुडहुडी गायबच होत आहे.

## धार्मिक सप्ताहाला आनंदोत्सवाचे स्वरुप दिल्यास सर्वांना आनंद मिळेल-ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड



संभाजीनगर- आपली संस्कृती मजबूत करणारे धार्मिक सप्ताह हे ख-या अर्थाने परिवर्तनाचे माध्यम असल्याने धार्मिक सप्ताह हे आनंदोत्सव स्वरुपात साजरे करायला हवेत. यामुळे धार्मिक कार्याबरोबर समाजोन्नीती व आत्मोन्नतीचेही कार्य आपोआप होते. यामुळे सर्वांना आपोआप आनंद मिळतो, असे मत ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांनी व्यक्त केले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही हसनाबादवाडी येथे धार्मिक सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात कीर्तन करतांना डॉ. फड यांनी कीर्तन मंडपात येणा-या सर्वांना आनंद मिळेल असे कार्यक्रम घ्यावेत असे म्हटले. सकाळी श्री ज्ञानेश्वरी पारायास बसणा-या भाविकांना नाष्टा चहा, संध्याकाळी ७ ते ९ कीर्तन व त्यानंतर सर्व भाविकांना महाप्रसादाची व्यवस्था करावी. महाप्रसादामुळे माता भगिणींना आठ दिवस रात्रीच्या स्वयंपाकातून सुटटी मिळेल. त्यांचा आनंद वाढेल. मोठया संख्येने लोक कीर्तनास येतील. मुलामुलींना मंडपातील सर्व कामे करु दयावेत. व्यक्तीगत घरी पंगती देण्यापेक्षा मंडपातच पंगती दिल्या जाव्यात. कोणालाही हा कार्यक्रम, पंगत आपली वाटली पाहीजे. सप्ताहाचे श्रेय कोणीही स्वत:कडे घेऊ नये. संयोजकापैकी कोणीही सप्ताहातील एकही रुपयाचा व्यक्तीगत लाभ घेऊ नये. सप्ताहातील सर्व कार्य हे भगवंताचे कार्य आहे, असे समजून हे कार्य करावे. जास्तीत जास्त तरुणांना सहभागी करुन त्यांच्याकडून कामे करुन घ्यावीत. नविन पीढी निर्माण होईल असे पहावे.

## क्राईम वृत्त...

### देवणी ते लातूर देवर्जनमार्गे बससेवा सुरू करण्याची मागणी

**उदगीर, दि.११ डिसेंबर -**

देवणी ते लातूर देवर्जन मार्गे बससेवा सुरू करण्याची मागणी या परिसरातील प्रवाशांनी व हत्तीबेट सदभक्तांनी केली आहे. देवणी ते लातूर देवर्जन, शिरूर अनंतपाळ-बोरी-बाभळगाव हत्तीबेट व आरीबेट ही दोन मोठी देवस्थाने आहेत. या दोन्ही ठिकाणी दर्शनासाठी रोज भाविक भक्तांची मोठी गर्दी असते. या दोन्ही ठिकाणी दर्शनासाठी जाण्यासाठी थेट बससेवा उपलब्ध नसल्यामुळे सदभक्तांची मोठी गैरसोय होत आहे. शिवाय देवणीहुन लातूरला जाण्यासाठी हा सर्वात जवळचा मार्ग असल्यामुळे या मार्गे बससेवा सुरू करण्याची मागणी आहे. दिवसभरातून किमान चार फेऱ्या देवणी ते लातूर सुरू करून या भागातील प्रवाशांची सोय करावी, अशी मागणी हत्तीबेट पंचक्रोशीतील भक्तांनी केली आहे.





### शास्त्री विद्यालयात नवव्या अध्यायाचे सामुदायिक पठण

**उदगीर, दि.११ डिसेंबर -**

लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात भगवद्गीता जयंती निमित्त सर्व शिक्षक विद्यार्थी यांनी सामुदायिक रित्या भगवद्गीतेच्या नवव्या अध्यायाचे पठण केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शंकरराव लासुणे होते तर व्यासपीठावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक रविंद्रजी जाधव, संघ जिल्हा कार्यवाह रामचंद्र बिराजदार, बालाजी धमनसुरे, रामभाऊ मोतीपवळे, विक्रम हलकीकर, संतोषराव कुलकर्णी, विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले, उपमुख्याध्यापक अरुण पत्की, लक्ष्मीकांत नेलवाडकर, चिन्मय मिशनचे सदस्य अरुण सुरशेटवार, उमाकांत कोनाळे, लालासाहेब गुळभिले, भाग्यश्री लोखंडे, अंबिका जोशी, वर्षा जावरे, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट, माधव मठवाले उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व स्वागत परिचय विजयाराणी गोविंदवाड, प्रास्ताविक अनिता येलमटे तर आभार बालाजी पडलवार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



### उदयगिरीत आरोग्य तपासणी शिबिर

**उदगीर, दि.११ डिसेंबर -**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, अंधश्रद्धा निर्मूलन समिती उदगीर व धन्वंतरी आयुर्वेदिक महाविद्यालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने देश का प्रकृती परीक्षण अभियानांतर्गत महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यासाठी बनवलेल्या विशेष एप्लीकेशनची माहिती देण्याविषयीच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष रामचंद्र तिरुके, सचिव म.ए. सोसायटी उदगीर हे होते. प्रमुख उपस्थिती अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कोषाध्यक्ष प्राचार्य विजयकुमार पाटील, बाबुराव माशाळकर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य राजकुमार मस्के यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.बी.एस. भुक्तरे यांनी केले तर प्रा.डॉ. बालाजी होकरणे यांनी मानले.



### जीवन प्रयाग फाऊंडेशनतर्फे सपना बिरादार यांचा सत्कार संपन्न

**उदगीर, दि.११ डिसेंबर -**

जीवन प्रयाग फाऊंडेशन उदगीरच्या वतीने महाराष्ट्र शासन तर्फे घेण्यात येणाऱ्या (लेखापरीक्षक) मे महिन्यामध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल ६ डिसेंबर रोजी लागला आहे. यामध्ये शिवनगर कॉलनी, उदगीर येथील सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थिनी सपना सूर्यकांत बिरादार यांनी अत्यंत परिश्रमाने पहिल्याच प्रयत्नामध्ये यश मिळवली आहे. त्यामुळे त्यांच्या निवासस्थानी सत्कार करण्यात आला. यावेळी जीवन प्रयाग फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रभात सुर्यवंशी, प्रा. निलेश चवळे, सूर्यकांत बिरादार, संगीता बिरादार, नितीश शिरशे, क्षितिज जाधव उपस्थित होते.

दैनिक 'तरुण भारत'च्या बातमीला यश..

# औसा पालिका प्रशासनाकडून मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त

## एमआयएमच्या चार वर्षापासूनच्या मागणीला अखेर यश...



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.११ डिसेंबर -**

मोकाट कुत्र्यांनी औसा शहरातील शंभराहून नागरिकांना चावा घेतल्यानंतर चार दिवसापुर्वी तीन वर्षाच्या चिमुकलीला गंभीर जखमी केले होते. गेल्या चार वर्षापासूनच्या मागणीला या घडलेल्या गंभीर घटनेनंतर एमआयएमचे जेष्ठ नेते मुझ्झफरअली इनामदार यांनी टाळे ठोकण्याचा इशारा दिल्यामुळे पालिका प्रशासनाला जाग आली. बुधवार दि.११ रोजी सकाळी ११ वाजेपासून शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यास सुरुवात करण्यात आली असून एमआयएमच्या मागणीला अखेर यश आले आहे.

शहरात मोकाट कुत्रे फिरुन ये जा करणाऱ्या नागरिकांना चावा घेत असल्याने एमआयएमच्या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी २०२१ मध्ये केली होती. यानंतर दरवर्षी तीन चार निवेदन देऊन मागणी करण्यात येत होती. तसेच शहरातील अनेक नागरिकांनी अनेकवेळा पालिका प्रशासन व आपआपल्या प्रभागातील लोकप्रतिनिधीकडे मागणी केली होती. पालिका प्रशासनाने शहरवासियांच्या या मागणीकडे कानाडोळा करीत दुर्लक्ष केले.यामुळे मोकाट कुत्र्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली.

याप्रमाणात शहरवासियांना चावा घेण्याचे, अंगावर येण्याचे प्रमाणही वाढले. यामुळे शहरात घबराहटीचे वातावरण पसरले होते. औषधाअभावी अनेकांनी लातूर येथील खाजगी रुग्णालयातून उपचार केले. तर शेकडो नागरिकांनी शहरातील ग्रामिण रुग्णालयातून उपचार करुन घेतले. गेल्या चार दिवसापुर्वी कुरेशी गल्लीतील तीन वर्षाच्या आयना सल्लाउद्दीन कुरेशी या लहान मुलीचा चावा घेऊन गंभीर जखमी केले. या मुलीवर लातूर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

या गंभीर घटनेनंतर एमआयएमने बंदोबस्त करण्याची मागणी करुन उपचाराचा खर्च नगरपालिकेने करावा, अशी मागणी नगरपालिका प्रशासनाकडे केली होती. नागरिक व एमआयएम यांच्या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याच्या मागणीला वेळोवेळी दै. तरुण भारत ने प्रसिध्दी दिली होती.

दि.९ डिसेंबर रोजी एमआयएमने नगरपालिका व राज्याचे मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली होती. या मागणी बातमी जखमी मुलीवरील उपचाराचा खर्च नगरपालिकेने करावा या मथळ्याखाली दै. तरुण भारते सोलापुरने दि.१० रोजी बातमी प्रकाशित केली होती. या बातमीची पालिका प्रशासनाने तात्काळ दखल घेत मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यास सुरुवात केली.

स्वच्छता निरीक्षक महेमुद शेख व पालिका कर्मचाऱ्यांनी यासाठी पुढाकार घेतला होता. आज दिवसभरात ५० मोकाट कुत्रे पकडले आहेत.

**मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणार : मुख्याधिकारी मंगेश शिंदे**

शहरातील मोकाट कुत्र्यांना पकडून त्यांचे लवकरात लवकर निर्बिजीकरण करुन कायमस्वरुपी बंदोबस्त करण्यात येणार आहे. शहरातील संपुर्ण मोकाट कुत्र्यांवर शस्त्रक्रिया होईपर्यत अभियान सुरु ठेवणार असल्याची माहिती नगरपालिकेचे मुख्याधिकारी मंगेश शिंदे यांनी दिली.

**एमआयएमकडून दै. 'तरुण भारत'चे आभार...**

शहरातील नागरिकांनी व एमआयएमच्या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याच्या मागणीला वेळोवेळी प्रसिध्दी दिली. दै. तरुण भारतच्या सहकार्याबद्दल एमआयएमचे जेष्ठ नेते मुझ्झफरअली इनामदार यांनी यावेळी आभार व्यक्त केले.

## चाकूरच्या पीएमश्री केन्द्रीय विद्यालयाची सोलापूर विज्ञान केंद्राला भेट विविध विषयांची घेतली माहिती



**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.१० डिसेंबर -**

चाकूर येथील पीएम श्री. केन्द्रीय विद्यालय येथील विद्यार्थ्यांनी सोलापूर विज्ञान केंद्राला भेट दिली आणि तेथील विविध विषयांची माहिती घेतली.पिएम श्री. अंतर्गत विविध कार्यक्रम केंद्र सरकारच्या आदेशानुसार वर्षभरात विविध शैक्षणिक उपक्रम राबवले जातात. त्याचाच एक भाग म्हणून सोलापूर येथील विज्ञान केंद्राला भेट देण्यात आली. या शैक्षणिक उपक्रमात वर्ग सहावी ते दहावी वर्गातील विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

पीएम श्री. केंद्रीय विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सोलापुर विज्ञान केंद्र येथे भेट देऊन विविध वैज्ञानिक क्रांतीचा अभ्यास केला त्यात टेक्सटाइल मधे धागा निर्मिती, कापड़ निर्मिती, कापड छपाई, तारा मंडळ गुफा, दिशा, तारे, चंद्रमा, मस्ती विज्ञान केंद्रामधे ग्रेविटेशन, पंडोलीम, तूस्नामी, लाईट, थ्रीडी मूवी शोमध्ये विविध प्राणी अभ्यास आणी विज्ञान पार्क मधे लैटिटूड आणि लोंगीटूड आवाज प्रसार अश्या विविध अभ्यासपूरक संकल्पनांचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला.

या सर्व शैक्षणिक उपक्रमाचे नियोजन विद्यालयाचे प्राचार्य हरीश कटारिया, पन्नालाल इंगोले यांनी केले. यावेळी विद्यालय शिक्षक सतीश फुलारी, संतोष नरहरे, सोनू शर्मा, रितिक माली, मोहित कुमार, प्रदीप यादव, नईम शेख,रितु मैडम, राजेश्वरी इंगले, राजेश्वरी जाधव, चारुशीला, पुजा विद्यार्थीसोबत राहून सर्व नियोजन यशस्वी केले. या उपक्रमाबद्दल पालक वर्गातून विद्यालयाचे व सर्व शिक्षकांचे कौतुक केले जात आहे.

## पिक संरक्षणसाठी आता प्लास्टिक पाईपची गन; गण खरेदीकडे शेतकऱ्यांचा कल

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.११ डिसेंबर -**

अहमदपूर तालुक्यातील झाडे, झुडपे, पडीक जमिनीचे क्षेत्र आणि डोंगर दऱ्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे या भागात वन्यप्राण्यांची संख्या ही जास्त आहे. त्या मुळे शेतकऱ्यांना वन्यप्राण्याच्या पिकांचे संरक्षण करणे फार गरजेचे आहे. याच कारणासाठी येथील बाजारपेठेत अगदी २०० रुपये किंमतीमध्ये वन्य प्राण्यांना पळवून लावण्यासाठी, हुसकावण्यासाठी प्लास्टिकच्या पाईपापासून बनवलेली प्लास्टिक गन ही विक्रीसाठी उपलब्ध झाली आहे. आणि याचा आवाजही शांत वातावरणात किमान अर्धा किलोमीटर जातो, त्यामुळे शेतकरी ही गन खरेदी करत असल्याचे पहावयास मिळत आहे.



तालुक्यात हरीन, डुकरांचे कळप मोठ्या प्रमाणात खरीप व रब्बी पिकांचे नुकसान, नासाडी करत आहेत. त्यांना पकडणे हे कायद्यानुसार गुन्हा आहे त्यामुळे अशा प्राण्यांना शेतातून फक्त पळवून लावणे हाच पर्याय शेतकऱ्यासमोर आहे. मात्र रात्री बे रात्री शेतकऱ्यांना ओरडून हुसकावणे, स्वतः त्या ठिकाणी उपस्थित राहून फटाक्याचे आवाज करणे हा उपाय सर्रास वापरला जातो. काही काही शेतकरी रात्रभर लाऊड स्पीकर लावून ठेवत आहेत. तसेच फटाके फोडणे हा अत्यंत महागडा उपाय आहे, हे सर्वसामान्य शेतकऱ्यांना परवडत नाही आणि ऊसासारख्या पिकासाठी फार जिकिरीचे आहे. असे शेतकरी सांगत आहेत. परंतु आता हा शेतकऱ्यांचा त्रास या प्लास्टिक गण पासून कमी होईल असेही बोलले जाते. वन्य प्राण्यांच्या संरक्षणासाठी बाजारात विक्रीसाठी आलेली गण ही प्लास्टिकच्या पाईपा पासून बनवलेली असून त्यामध्ये खालच्या बाजूने प्रेशर देण्यासाठी एक पाईप दिलेला आहे. व गन मध्ये काही प्रमाणात कार्पेट (बोरॅक्स रॉक) हा वेल्डिंगला वापरला जाणारा पदार्थ पाईपला असलेल्या छिद्राद्वारे टाकतात. तसेच गनमध्ये कार्पेट व थोडेसे क्वचित पाणी टाकून हाताने दाबून प्रेशर दिले जाते, त्यामुळे इथेनॉल गॅस तयार होतो. व त्याचा जोरदार आवाज होतो. त्यामुळे वन्य प्राणी पळ काढतात. या गनच्या आवाजामुळे स्वतःच्या शेताचे तर संरक्षण होतेच त्याचबरोबर शेजाऱ्यांच्या शेतीचेही संरक्षण होते.

रात्री बे रात्री शेतात सर्वत्र न जाता, एकाच ठिकाणावरून प्लास्टिक गन वापरून आपण शेत पिकाचे संरक्षण करू शकतो. ही गण बाजारात दोनशे रुपये उपलब्ध असून यासाठी लागणारे रॉ मटेरियल म्हणजे कार्पेट (वेल्डिंग मटेरियल) हे सुद्धा खूप स्वस्त आहे. त्यामुळे अगदी कमी खर्चात शेतकऱ्यांना पिक संरक्षण करता येते.

## हिंदूवरील अत्याचाराचा बांगलादेशी झेंडा जाळुन निषेध



**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.११ डिसेंबर -**

बांगलादेशातील हिंदु अल्पसंख्यांकवर होत असलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ अहमदपुर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे बागलादेशी झेंडा जाळुन निषेध नोंदवीला.

बांगलादेश येथिल हिंदु धर्म स्थळे, हिंदू समाजावर होणारे अत्याचार, मंदिरे, बुद्ध विहार, गुरुदवारा, वरील होणारे हल्ले व येथील संत महंतानवर होणाऱ्या अत्याचाराच्या निषेधार्थ अहमदपुर येथे दि.१० डिसेंबर रोजी अहमदपुर शहरातील सर्व हिंदू बांधवांच्या वतीने बांगलादेशी झेंडा जाळुन तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

त्या निवेदनावर ॲड. स्वप्नील होत्ते, पाडुरंग लोकरे, संजय मुसळे, ज्ञानेश्वर कोटगिरे, अमर पाटील, बाळासाहेब गुट्टे, किरण भालके, नरेश यादव, ज्ञानोबा भताने, बाळासाहेब शेळके, रोकडोबा भुसावळे, शैलेश ठाकुर, महादेव येरमुळे, मधूकर धडे, ॲड सोमनाथ फुले, नितीन काळे तसेच आणेक हिंदु बांधव उपस्थित होते.

## खंडोबा यात्रेनिमित्त होंडाळ्यात भाविकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.११ डिसेंबर -**

होंडाळा येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी चंपाषष्ठी निमित्ताने खंडोबा यात्रेचे आयोजन केले होते. या यात्रेनिमित्त विविध धार्मिक यात प्रामुख्याने वाघ्या मुरळी वारुचा कार्यक्रमाने खंडोबा देवाची मिरवणूक (पालखी) सोहळा साजरा केला जातो. या सोहळ्यास पंचक्रोशीतील तसेच महाराष्ट्रातील पालखी सोहळ्यात तसेच यात्रा महोत्सवात सहभागी होवून येळकोट येळकोट जय मल्हार असा जयजयकार करीत भक्तीभावाने बेल भंडाऱ्याची उधळण करतात. रातभर वाघ्या मुरळीचा कार्यक्रम होतो वाघ्या मुरळी रात्रभर देवाचे गाणी व खंडोबा देवाची कथा सांगितली जाते.





या यात्रेसाठी बाहेर गावाहून येणाऱ्या वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था केली जाते.तसेच येणाऱ्या भाविकांची संख्या पाहता या गावात बसेसची व्यवस्था नसल्यामुळे अनेक भक्तगणांना पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या हिप्परगा येथून चालत यावे लागते. त्यामुळे महामंडळाच्या माध्यमातून होंडाळा या गावासाठी दिवसातुन दोन वेळा बसची व्यवस्था करण्यात यावी अशी मागणी येथील नागरिकांतून होते आहे. या यात्रेत विविध दुकाने थाटली जातात. तसेच मोठी आर्थिक उलाढाल होते.

या यात्रेस येणाऱ्या भाविकांची महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या माध्यमातून होंडाळा या गावासाठी दिवसातुन दोन वेळा बसची नितांत गरज आहे. ती व्यवस्था संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित सुरू करून सहकार्य करावे, अशी मागणी होंडाळा येथील नागरिक करीत आहेत.


# होंडाळा येथे खंडोबा यात्रेत जंगी कुस्त्यांचा थरारा; अनेक जिल्ह्यातील कुस्तीपटूंचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**शि. अनंतपाळ, दि.११ डिसेंबर-**

येथुन जवळच असलेल्या होंडाळा येथील खंडोबा देवाच्या यात्रेच्या निमित्ताने जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते. या यात्रेनिमित्त कुस्त्यांचे आयोजन समस्त गावकरी करतात. पहिली कुस्ती ५० रुपये ते शेवटची कुस्ती ५ हजार रुपयांची झाली.

या कुस्तीच्या मैदानात अनेक गावचे पैलवान उतरले होते. यात परभणी, नांदेड, लातूर, हिंगोली, बीड, धाराशिव, संभाजीनगर, सातारा, सांगली या जिल्ह्यासह कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा राज्यातील पैलवान उतरले होते.

अनेक पैलवान जिंकून आपल्या गुरुला नमण करून आनंदोत्सव साजरा करत होते. तर तुरळकच पैलवानांना बोरोबरीत कुस्ती सोडण्याचा निर्णय पंचांनी घेतल्यामुळे प्रेक्षकांच्या नाराजीच्या प्रतिक्रिया ऐकायला मिळत होत्या. पै.कै.रोहीदास कांगणे यांच्या रामानुज कुस्ती आखाडा माळाकोळी जिल्हा नांदेड येथील एकाच आखाड्यातील दोन पैलवानांनी कुस्ती खेळुन जिंकली. यात पै. कृष्णा गुट्टे यांनी १५०० रुपयांची कुस्ती खेळुन जिंकली तर पै. दिप रोहीदास कांगणे यांनी बेळगाव येथील पाशा शेख याला चितपट करून ५ हजार रुपयांची शेवटची कुस्ती जिंकली. त्यामुळे होंडाळा नगरीचे प्रथम नागरिक सरपंच उमाकांत येंडे, उपसरपंच संदीप सुर्यवंशी, दिगांबर सोनटक्के, कल्याण सुर्यवंशी, गोलंदाज सोनकांबळे, बाबुराव फसमल्ले, शिवा महाराज सांगवीकर, प्रकाश खंडगावे, नामदेव गुडमे यांनी यथोचित सन्मान देवून पै. दिप कांगणे याचा सत्कार करण्यात आला. यांच्या सहकार्याला रामराव



कोंडामंले, संजय थोटे, भगवान सोनटक्के, बसवेश्वर पाटील, प्रकाश ईबितदार, बालाजी कोंडामंगले, भाजपा शाखा अध्यक्ष रमाकांत चाकोरे, भानुदास सोनटक्के, माधव साखरे, शंकर गुडमे, सचिन सोनटक्के, बालाजी वारे, आकाश सुर्यवंशी, नितीन चाकोरे, कैलास चाकोरे, गजानन सोनटक्के, नागेश सोनटक्के, उमेश सूर्यवंशी, शिवहार सोनटक्के, भिमाशंकर ईबितदार, बाबुराव वारे, नागोराव भालेराव, उध्दव भालेराव, इत्यादी कुस्ती प्रेमींनी परिश्रम घेवून कुस्त्यांचे आयोजन केले होते.

**जाहिर प्रगटन**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार**
**चाकूर, यांचे कार्यालय**
**(दंडणीय - विभाग)**

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि दि. १८/१२/२०२४
अर्जदार :- श्री. शेख फयाज उम्मान
विरूध्द
गैरअर्जदार : मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकुर
अर्ज कलम १३ (३) जन्म-मृत्यु नोंदणी कायदा.

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात श्री/श्रीमती लेख फयाज उम्मान रा. चाकुर, ता. चाकुर, जि. लातुर यांनी १३ (३) जन्म-मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार यांचा मुत्तमा **कु. शेख विलाल पायाजगाव जन्म दि. १६/०६/१९९५** झाला असुन मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकुर, ता. चाकुर, जि. लातुर येथे जन्म नोंद नसल्याने तीच्या जन्म तारखेची नोंदणी मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकुर, ता. चाकुर, जि. लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यानी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोनाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. मुदतीनंर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही.

दि. १२/१२/ २०२४
पुढील तारीख १५/०१/२०२५

आदेशावरून /-
तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, चाकुर

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# लातूर जिल्ह्यात आजपासून क्रीडा सप्ताहाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ डिसेंबर-**
राज्यात क्रीडा संस्कृतीची जोपासना व जनतेत क्रीडा विषयक प्रोत्सहनात्मक वातावरण निर्माण होण्याच्या उद्देशाने शासनामार्फत दरवर्षी दि.१२ ते १८ डिसेंबर या कालावधीत क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. यंदाही लातूर जिल्हा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत १२ ते १८डिसेंबर,२०२४ या कालावधीत विविध क्रीडा स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

१२ डिसेंबर, २०२४ रोजी वेळ सकाळी ११-३० वाजता जिल्हा क्रीडा संकुल येथे क्रीडा सप्ताह उद्घाटन कार्यक्रम होईल. तसेच १०० मीटर धावणे क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. याबाबत माहितीसाठी क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे व समाधान बुरगे यांच्याशी संपर्क साधावा. याच दिवशी सांयकाळी ५ वाजता जिल्हा क्रीडा संकुल स्केटींग रींग येथे स्केटिंग स्पर्धा होतील. याबाबत माहितीसाठी लायक सय्यद यांच्याशी संपर्क साधावा.

१३ डिसेंबर, २०२४ वेळ सायंकाळी ५ वाजता जिल्हा क्रीडा संकुल येथे कराटे स्पर्धा होणार असून याबाबत सुरेखा गिरी यांच्याशी संपर्क साधावा. याच दिवशी सकाळी १० वाजता लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे कुस्ती स्पर्धा होणार असून यासाठी चेतन जावळे यांच्याशी संपर्क साधावा.

१४ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी ९ वाजता जिल्हा क्रीडा संकुल येथे मैदानी क्रॉसकंट्री स्पर्धा होणार असून यासाठी समाधान बुरगे व राहुल होनसांगळे यांच्याशी संपर्क साधावा. सायंकाळी ५ वाजता जिल्हा क्रीडा संकुल येथे लॉन टेनिस स्पर्धा होती. या क्रीडा प्रकारासाठी मोसीन खान यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### घराचे कुलूप तोडून लाखांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ डिसेंबर-**
शहरातील भारत सोसायटी गवळी नगर, विवेकानंद चौक परिसरात घराच्या दाराचे कुलूप तोडून चोरट्यांनी घरात प्रवेश करून कपाटातील लॉकरमध्ये ठेवलेले दोन तोळ्याचे दागिने, रोख रक्कम ५० हजार रुपये असा एकूण १ लाख ६ हजारांचा ऐवज लंपास केला. याबाबत अज्ञात चोरट्यांविरुद्ध विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद केला आहे. पोलिसांनी सांगितले, फिर्यादी श्रीकृष्ण नामदेव सूर्यकर (रा. भारत सोसायटी, गवळी नगर, विवेकानंद चौक) यांच्या घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी घरात प्रवेश केला. बेडरुममधील कपाटातील लॉकरमध्ये ठेवलेले सोन्या-चांदीचे दागिने व रोख ५० हजार रुपये असा एकूण १ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना ८ डिसेंबर रोजी रात्री घडली, असे श्रीकृष्ण सूर्यकर यांनी विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. त्यानुसार अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला असून, तपास पोलिस उपनिरीक्षक रेडेकर करीत आहेत. घरी कोणी नसल्याची संधी साधून चोरट्यांनी रात्रीच्या वेळी कडीकोंडा तोडला व बेडरुममधील कपाटातील सोने व रोख रक्कम लंपास केली. पोलीस अधीक तपास करीत आहेत.

### भांडणाची कुरापत काढून ब्लेडने केले वार; दोघांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ -**
मागील भांडणाची कुरापत काढून सिमेंटच्या गटुने डोक्यात मारुन जखमी केल्याची घटना लातुरातील इंदिरानगर येथे घडली. शिवाय, पायावर ब्लेडने पायावर वार केले. याबाबत विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी सांगितले, फिर्यादी सागर सिद्धार्थ मरे (वय १९ रा. इंदिरा नगर, लातूर) याला याच परिसरात राहणाऱ्या राजू बालाजी गायकवाड याच्यासह अन्य एकाने मागील भांडणाची कुरापत काढून सिमेंटच्या विटेने डोक्यात मारहाण केली. शिवाय, दुसऱ्या एकाने ब्लेडने पायावर वार करुन जखमी केले. ही घटना इंदिरा नगर येथे घडली. त्याच बरोबर फिर्यादीसह आईला जीवाशी मारुन टाकीन अशी जीवे मारण्याची धमकी दिली. याबाबत पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे.

### माझ्याकडे रागाने का बघतोस म्हणून दगडाने मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ डिसेंबर-**
माझ्याकडे रागाने का बघतोस, गाडीला कट का मारलास असे विचारल्याने कॉलरला धरून दगडाने मारून जखमी केल्याची घटना राजीव गांधी चौक येथे घडली. याबाबत दोघांविरुद्ध विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलिसांनी सांगितले, फिर्यादी इंद्रजीत रामभाऊ पवार (रा. देसाईनगर, लातूर) यांना आरोपींनी संगनमत करून माझ्याकडे रागाने का बघतोस, गाडीला कट का मारले असे विचारले असता कॉलरला धरून दगड मारून जखमी केले. फिर्यादीच्या एमएच १४ जेएम १७०१ या कारच्या काचेवर दगड मारून अंदाजे ३५ हजारांचे नुकसान केले. तुला बघून घेतो म्हणून शिविगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली, असे इंद्रजीत पवार यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

### ऑपरेशन मुस्कान मोहिम राबवून पोलीसांनी घेतला मुलीचा शोध

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ डिसेंबर-**
लातूर पोलिसांनी ऑपरेशन मुस्कान ही मोहीम राबवून पळवून नेलेली १ अल्पवयीन पीडित मुलींचा शोध लावला. ही कामगिरी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पथकाने पार पाडली. एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीस कोणीतरी अज्ञात व्यक्तीने पळून नेल्या बाबत औसा पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल होती. मागील ०६ महिन्यापासुन संबंधित पीडित मुलींचा शोध सुरू होता.

वरील पोलीस स्टेशनला दाखल तक्रारीबाबत पोलीस स्टेशनसह अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाकडून समांतर तपास करण्यात येत होता. गुप्त व तांत्रिक माहिती संकलन व विश्लेषणाचे आधारे या पथकने अल्पवयीन मुलींचा पुणे येथे शोध घेण्यात यश आले. पुणे शहरात या पथकाने १ दिवस मुक्काम करून ०१ अल्पवयीन पीडित मुली व तिचे सोबत १ आरोपीला ताब्यात घेतले. मिळून आलेल्या पीडित मुलगी व आरोपीस संबंधित पोलीस स्टेशनला हजर करण्यात आले आहे.

# पालिका उभारणार अत्याधुनिक सभागृह

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ डिसेंबर-**
जिल्हा नियोजन समिती आणि मूलभूत सुविधा योजनेअंतर्गत लातूर महापालिकेत भव्य आणि अत्याधुनिक सभागृह होणार आहे. शंभरपेक्षा अधिक आसनक्षमता असलेल्या या नव्या सभागृहामध्ये वातानुकूलित सर्व सोयी असतील. पाच कोटी रुपये खर्च करून या सभागृहाची वास्तू उभारली जाणार आहे. १८ महिन्यांमध्ये काम पूर्ण होऊन या वास्तूमध्ये सभागृह आणि इतर कामकाजासाठी दालने थाटली जातील.

लातूर महापालिकेत सध्या असलेल्या सभागृहाची दुरवस्था आहे. फर्निचर व्यवस्थित नाही. तसेच पावसाळ्यात या सभागृहाच्या छतातून गळती होते. जागाही अपुरी पडते. सर्वसाधारण सभा घेताना अडचणी निर्माण होतात. आता जिल्हा नियोजन समितीच्या मदतीने तसेच मूलभूत सुविधा योजनेअंतर्गत सभागृहाचे काम पूर्ण केले जाणार आहे. महापालिकेच्या इमारतीच्या बाजूला सभागृहाची भव्य अशी वास्तू उभारली जाणार आहे. सभागृहातच नगर सचिवांचे कार्यालय असेल. आवक, जावक आणि एक खिडकी योजनेचा कक्षही या वास्तूमध्ये थाटला जाणार आहे. मीटिंग हॉलच्या बाजूला नगर सचिवाचे कार्यालय असणे अपेक्षित असते. त्यानुसार या नव्या सभागृहात नगर सचिवाचे कार्यालय असेल, असे महापालिकेच्या बांधकाम विभागातून सांगण्यात आले.

सभागृहामध्ये महिला, पुरुषांना बसण्याची व्यवस्था स्वतंत्र असेल. लोकप्रतिनिधी आणि अधिकारी कर्मचारी यांच्याही आसनाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात येणार आहे. तळमजल्यात पार्किंग व्यवस्था करण्यात आली असून बाजूला आवक, जावक कक्ष असेल, अशी माहिती नगर विभागाचे अभियंता नवनाथ केंद्रे यांनी दिली.



**जिल्हा नियोजनकडून १ कोटी प्राप्त**

जिल्हा नियोजन समितीकडून सभागृहाच्या कामासाठी एक कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. मूलभूत सुविधा योजनेत चार कोटी रुपये मंजूर झाले असून खाजगी एजन्सीकडून काम करून घेण्यात येणार आहे. त्यानुसार महापालिकेच्या इमारतीच्या बाजूला सभागृहाच्या कामाला प्रारंभ झाला आहे. मनपाच्या इमारतीच्या सभागृहात जागा अपुरी पडत आहे. शिवाय, त्याची दुरवस्था झालेली आहे. त्यामुळे नवीन सभागृह होत आहे.

# नायलॉन मांजा जप्त; दोघांविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ डिसेंबर-**
स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नायलॉन मांजा विक्रीप्रकरणी दोघांविरुध्द गुन्हे दाखल करून पाच हजार ३६५ रुपयांचा नायलॉन मांजा जप्त केला आहे. गुलाब सरदार शेख (रा. खाडगाव रोड, लातूर) व फसीउद्दीन शेख (रा. कंधार वेस, उदगीर) अशी आरोपींची नावे आहेत.

नायलॉन मांजाची विक्री, वापर व साठा करण्यावर प्रतिबंध आहे. नायलॉन मांजामुळे अनेकांना जीव गमवावे लागले असून, गंभीर दुखापतीही होत आहेत. तसेच पक्ष्यांचेही जीव जात आहेत. त्यामुळे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी शहरासह जिल्ह्यात नायलॉन मांजा विक्री, साठा करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश पोलिसांना दिले आहेत. त्यानुसार अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून दोघांना पकडले. प्रतिबंधित चायनीज मांजा, नायलॉन मांजा, काचेच्या चुऱ्याचे कोटिंग असलेल्या मांजाचे विक्रेते व वापरणारे यांच्यावर कठोर कारवाई होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. मकरसंक्रात सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. बाजारात ठिकठिकाणी पतंग, मांजाची दुकाने थाटली आहेत. या पार्श्वभूमीवर चायनीज मांजा, नायलॉन मांजा, काचेच्या चुऱ्याचे कोटिंग असलेल्या मांजाच्या विक्रीवर शासनाकडून प्रतिबंध करण्यात आले असून या प्रकरणी दोषींवर कडक कारवाईचा इशारा पोलीसांनी दिला आहे.

# दंत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना चार पारितोषिके

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ डिसेंबर-**
इंडियन असोसिएशन ऑफ कंझर्वेटिव्ह डेंटिस्ट्री अँण्ड एंडोडोन्टिक्स, मुंबई या संघटनेच्या वतीने मुंबई येथे घेण्यात आलेल्या '३५ आएसीडीई २०२४' राष्ट्रीय परिषदेत लातूर येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील कंझर्वेटिव्ह डेंटिस्ट्री आणि एंडोडोन्टिक्स विभागातील एम. डी. एस. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पेपर, पोस्टर्स व टेबल क्लिनिक्स या सादरीकरणास अनुक्रमे प्रथम, व्दितीय अशी चार पारितोषीके मिळाली आहेत.

या यशाबद्द्ल एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते विजेत्या यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र भेट देऊन सत्कार सन्मान करण्यात आला. यावेळी विभाग प्रमुख डॉ. अमोल बडगिरे, डॉ. माधुरी अग्रवाल, डॉ. अभिषेक बादाडे, डॉ. अजित शिंदे हे उपस्थित होते.

मुंबई येथील जिओ कन्वेन्शन सेंटर येथे झालेल्या राष्ट्रीय परिषदेत विद्यार्थ्यांनी विविध प्रबंध सादर केल्यामुळे त्यांना पारीतोषिके देण्यात आली आहेत.

# 'मुक्तांगण'मध्ये विद्यार्थ्यांचे प्रकल्प सादरीकरण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ डिसेंबर-**
शहरातील विशाल नगर परिसरातील मुक्तांगण इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी प्रकल्प सादरिकरण केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे श्रीकृष्ण लाटे, कविता लाटे, दिपाली किरण कांबळे, अश्विनी रत्नदीप सरवदे, सारिका सदाशिव कांबळे, संध्याराणी धम्मशील गुंजरगे, श्रीदेवी शिवकुमार माकणे यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या सुमेरा शेख, पालक, व विद्यार्थी उपस्थित होते.



शाळेच्या विद्यार्थ्यांनी ख्रिसमस ट्री. हॉस्पिटल, गार्डन, जंगल, टेम्पल, कॉम्पुटर, चर्च, बास्केट ऑफ वेजिटेबलस, बास्केट ऑफ फूटस, प्राणीसंग्रहालय, माय होम, माझे कुटुंब, माझी शाळा, भौमितिक आकार, बर्डस अँनीमल, अशा विविध प्रतिकृती तयार करून प्रदर्शनात सादर केल्या. या सारख्या प्रकल्पांच्या माध्यमातून सामाजिक तसेच पर्यावरण वाचविण्याचा संदेश देण्याचा प्रयत्न व्दियार्थ्यांनी आपल्या प्रोजेक्टमध्ये पालकांच्या मदतीने केला. विद्यार्थ्यांनी सादर केलेले प्रोजेक्ट हे त्यांच्या अभ्यासक्रमाशी निगडीत होते. मुलांच्या भाव विश्वातील कल्पना या प्रकल्पाच्या माध्यमातून प्रत्यक्ष उतरविण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. प्रोजेक्टच्या माध्यमातून निरीक्षण क्षमता, नवनिर्मितीला चालना मिळते. टाकावू पासून वस्तू बनविण्याची दृष्टी विद्यार्थ्यांना मिळते. प्रदर्शन सर्वांसाठी खुले ठेवण्यात आलले होते. या एक्झिबिशनला पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांनी भेट दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सुवर्णा माळवदकर यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# 'स्मार्ट'कार्डसाठी महिलांची मोठी गर्दी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ डिसेंबर-**
देशात पहिल्यांदाच लातूर महापालिकेतर्फे महिलांसाठी सिटीबस प्रवास मोफत देण्याची सुविधा देण्यात आली आहे. मागील तीन वर्षांपासून शहरात महिलांना मोफत प्रवास करता येतो. यात अधिक पारदर्शकता आणण्यासाठी महापालिकेने १ जानेवारीपासून स्मार्टकार्ड असणाऱ्या महिलांना या सेवेचा फायदा घेता येईल, असे स्पष्ट केले आहे. यासाठी महापालिकेने शहरात दोन ठिकाणी स्मार्टकार्डसाठी आधारकार्ड जमा करण्याचे आवाहन केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत गंजगोलाई येथील मुख्य स्थानकावर व क्रीडा संकुलासमोरील बसस्थानकासमोर महिलांची प्रचंड गर्दी होत आहे.



महिलांना मोफत प्रवास योजना लातूर महानगरपालिकेने मागील तीन वर्षांपासून सुरू केली आहे. ही योजना अद्यापही अविरतपणे सुरू आहे. ही योजना देशात पहिल्यांदा राबविणारी लातूर महापालिका आहे. मोफत प्रवास योजनेत आजपर्यंत महिलांना कुठल्याही कागदपत्रांशिवाय त्यांना ही सेवा उपलब्ध होत होती. परंतु, येणाऱ्या नवीन वर्षांपासून या कामात पारदर्शकता आणण्यासाठी महापालिकेतर्फे सिटीबसने प्रवास करणाऱ्या महिलांना स्मार्टकार्ड असल्याशिवाय मोफत प्रवास करता येणार नाही, असे स्पष्ट केले आहे.

याबाबत पालिकेने तीन दिवसांपूर्वीच शहरातील महिलांनी स्मार्टकार्ड काढून घ्यावे, याबाबत सूचना जारी केली आहे. स्मार्टकार्ड काढण्यासाठी महापालिकेच्यावतीने आधारकार्ड जमा करून घेण्यात येत आहेत. सदर आधारकार्ड गंजगोलाईतील मुख्य बसस्थानक व क्रीडा संकुलसमोरील बसस्थाकावर जमा करण्यासाठी महिलांची तोबा गर्दी दिसून येत आहे. स्मार्टकार्ड सहज उपलब्ध व्हावे यासाठी प्रत्येक प्रभागात स्वतंत्र केंद्र आणि ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून द्यावी. जेणेकरून अधिकाधिक महिलांना मोफत सिटीबस सेवेचा लाभ घेता यावा, याबाबत माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी आयुक्तांकडे मागणीही केली आहे. आधारकार्ड जमा केल्यानंतर पुढील दहा दिवसांत ज्या ठिकाणी आधारकार्ड जमा केले आहे, त्याच ठिकाणी स्मार्टकार्ड मिळणार असल्याचे प्रशासनाच्यावतीने सांगण्यात आले.

# मानद प्रोफेसर म्हणून डॉ. भराटे यांचा गौरव होणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ डिसेंबर-**
येथील प्रसिद्ध श्वसनविकार व -हदयरोग तज्ज्ञ तथा गायत्री हॉस्पीटल लातुरचे संचालक डॉ. रमेश भराटे यांना ईंडियन मेडिकल असोशिएशन (आय. एम. ए.) दिल्ली यांच्याकडुन मानद प्रोफेसर म्हणुन गौरविण्यात येणार आहे.

हैदराबाद येथे दि. २६ ते २८ डिसेंबरदरम्यान राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली असुन या परिषदेमध्ये देशातील नामवंत डॉक्टरांची ऊपस्थिती राहणार आहे. या परिषदेमध्ये देशातील वैद्यकिय क्षेत्रात ऊल्लेखनिय कार्य करणा-या चार डॉक्टरांना मानद प्रोफेसर म्हणुन गौरविण्यात येणार असुन यांत डॉ. रमेश भराटे यांचा समावेश आहे. डॉ. भराटे यांनी वैद्यकिय क्षेत्रातील आय. एम. ए., ईंडियन चेस्ट सोसायटी, नॅशनल कॉलेज ऑफ चेस्ट फिजीशियन ईत्यादी संस्थेवर ऊल्लेखनिय कार्य केलेले आहे. नुकतेच त्यांना फेलोशिप पण बहाल करण्यात आलेली आहे. त्यांना युरोपियन रेस्पीरेटरी सोसायटी, अमेरिकन कॉलेज ऑफ चेस्ट फिजीशियन, ए. टी. एस. ईत्यादी संस्थांनी मेंबरशिप बहाल केलेली आहे.विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळींवर त्यांनी मार्गदर्शन केलेले आहे.महाराष्ट्र शासनाने पण त्यांचा गौरव केलेला आहे. त्यांनी रुग्ण सेवेबरोबर विविध सामाजिक ऊपकृम राबविले आहेत. लातुर, बीड, धाराशीव, बीदर, गुलबर्गा, परभणी ईत्यादी जिल्ह्यातील हजारो रुग्णांचे प्राण वाचविले आहेत.

# संशोधन कृतीला प्रज्वलित करते :डॉ.बेल्लाळे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ डिसेंबर-**
दयानंद विज्ञान महाविद्यालयातर्फे सातत्याने राबविण्यात येणाऱ्या वैज्ञानिकांच्या जयंती उपक्रमांतर्गत वैज्ञानिक रॉबर्ट कोच यांची जयंती साजरी करण्यात आली.विविध वैज्ञानिकांच्या अमूल्य कार्यातून विद्यार्थ्यांनी प्रोत्साहित होऊन उत्तम असे संशोधन कार्य करावे. उदा.पायथागोरसचा सिद्धांत अनेक वर्षापूर्वी अस्तित्वात आला,पण त्याचा वापर आजच्या युगात देखील करतो.तसेच वैज्ञानिकांचे कार्य लक्षात घेऊन दररोजच्या कार्यात त्याचा वापर करावा. कारण संशोधन कृतीला प्रज्वलित करते,कृती संशोधनाची माहिती देते,असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी केले.





रॉबर्ट कोच यांची १८१ वी जयंती महाविद्यालयात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,क्रीडा विभागातील प्रा.निशिकांत सदाफुले, विनोद गवरे,डॉ.विश्वनाथ मोटे, प्रा.विजयकुमार मांदळे यांनी वैज्ञानिकाच्या प्रतिमेस वंदन करून केली.कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. कोमल गोमारे यांनी केली.यावेळी आकरावी विज्ञान शाखेत शिकणारा विद्यार्थी रोहन घोडके याने वैज्ञानिकाची माहिती प्रकाशझोतात आणली.

हेनरिक हर्मन रॉबर्ट कोच, ११ डिसेंबर १८४३ रोजी जन्मलेले असून,एक प्रमुख जर्मन चिकित्सक आणि सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ होते जे क्षयरोग, कॉलरा आणि ऍन्थ्रॅक्ससारख्या रोगांचे कारक घटक ओळखण्यासाठी तसेच कोच पॉसिलेट्सच्या संशोधनात आधुनिक बॅक्टेरियोलॉजीमधील प्रमुख व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात.त्यांना लुई पाश्चर यांच्याबरोबर सूक्ष्मजीवशास्त्राचे जनक मानले जाते.१८७६ मध्ये न्थ्रॅक्स बॅक्टेरियम (बॅसिलस न्थ्रेसिस) च्या शोधामुळे या क्षेत्रात लक्षणीय प्रगती झाली. कोचच्या संशोधनाने रोगाच्या जंतू सिद्धांतासाठी महत्त्वपूर्ण पुरावे दिले व सार्वजनिक आरोग्य उपक्रमांवर प्रभाव टाकला आणि लाखो जीव वाचवले.२७ मे १९१० रोजी त्यांचे निधन झाले. याप्रसंगी जैवतंत्रज्ञान विभागातील प्रा.श्वेता मदने,प्रा. अवंती बिडकर,प्रा.अनुराधा शिंदे पाटील,डॉ.नितीन चव्हाण व शिक्षकेत्तर कर्मचारी आदींची उपस्थिती होती.

# ऋतुजा जोशीची राष्ट्रीय हॅन्डबॉल स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ डिसेंबर-**
बुलढाणा येथे झालेल्या राज्य स्पर्धेमधून कु.ऋतुजा जोशी या खेळाडूची दि.१३ ते १६ डिसेंबर २०२४ दरम्यान लुधियांना येथे होणाऱ्या राष्ट्रीय हॅन्डबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

तिला पुढील स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षक डॉ.संध्या वाडीकर, पर्यवेक्षक डॉ.वैशाली पाटील, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव, प्रा.व्यंकट कैले, प्रा.विजयकुमार मांदळे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करून शुभेच्या दिल्या. या खेळाडूला क्रीडा विभाग प्रमुख डॉ.महेश बेंबडे, प्रा.निशिकांत सदाफुले, प्रा.विनोद गवरे,अविनाश पवार यांचे मार्गदर्शन लाभले.

# रेणापूर तालुक्यातील चौघांचा अपघाती मृत्यू



**सदरील घटनेची माहिती मिळताच लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार रमेशआप्पा कराड यांनी तातडीने अंबाजोगाई येथील रुग्णालय प्रशासनाशी संपर्क साधून उपचाराच्या अनुषंगाने सूचना केल्या. त्याचबरोबर मयत बालाजी माने, दिपक सावरे, ऋत्वीक गायकवाड, फारुक शेख यांच्या कुटुंबाशी संपर्क साधून सांत्वन केले.**

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ डिसेंबर-**
अंबाजोगाई शहरापासून जवळ असलेल्या वाघाळापाटी जवळ मंगळवारी सकाळी कार आणि ट्रकचा भीषण अपघात झाला. या अपघातात रेणापूर तालुक्यातील मौजे कारेपूर येथील चौघांचा दुर्दैवी मृत्यू झाला असल्याची घटना घडली असून पुर्ण गावावर शोककळा पसरली आहे.

रेणापूर तालुक्यातील मौजे कारेपूर येथील बालाजी माने, दिपक सावरे, ऋत्वीक गायकवाड, फारुक शेख, शेख मुबारक शेख अजीम हे सहाजण मांजरसुंबा येथे काल सोमवारी एका कारने मित्राकडे गेले होते. रात्री थांबून मंगळवारी सकाळी सहा वाजता गावाकडे परत येत असताना अंबाजोगाई कारखाना नजीक वाघाळा पाटीजवळ कारचा आणि ट्रकचा भीषण अपघात झाला या अपघातात जागेवर दोघांचा मृत्यू झाला तर उर्वरित चौघांना अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याने उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. तर शेख मुबारक आणि शेख अजीम या दोन जखमीना लातूरला पाठवण्यात आले आहे.